टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे ४११०३७
यांना सादर करावयाचा विद्यानिष्णांत राज्यशास्त्र (एम.फिल.)
पदवीसाठी तयार केलेला शोधनिबंध

शोधविषय

# “डॉ. रावसाहेब कसबे यांच्या विचारातील मार्क्स–आंबेडकरांचा वैचारिक समन्वय”


अभ्यासक

**प्रा. गायकवाड संजय पंढरीनाथ**

एम.ए. (राज्यशास्त्र), बी.एड.
स.भू.बा.उर्फ अप्पासाहेब जेधे कला,वाणिज्य व
विज्ञान महाविद्यालय, पुणे–२

मार्गदर्शक

**प्रा.डॉ. शरद घोडके**

एम.ए.बी.एड., एम.फिल., पीएच.डी.
विभागप्रमुख, राज्यशास्त्र विभाग
आबासाहेब गरवारे महाविद्यालय, पुणे–४


एप्रिल २००९

# घोषणापत्रक

## (DECLARATION BY THE CANDIDATE)

मी, गायकवाड संजय पंढरीनाथ, असे घोषित करतो की, “डॉ. रावसाहेब कसबे यांच्या विचारातील मार्क्स–आंबेडकरांचा वैचारिक समन्वय” हा माझा स्वत:चा लघुशोधप्रबंध असून मी हा लघुशोधप्रबंध भारतात किंवा भारताबाहेर कोणत्याही विद्यापीठाला सादर केलेला नाही.

सदर लघुशोधप्रबंधामध्ये नमूद केलेली माहिती आणि संशोधनात्मक विधाने ही मी स्वत: अभ्यासून घेतलेली आहेत.

संशोधक विद्यार्थी

ठिकाण – पुणे
दिनांक – एप्रिल २००९ प्रा. गायकवाड संजय पंढरीनाथ

# CERTIFICATE

Certified that the work incorporated in his VidyaNishant (M.Phil.) Dessertation, "डॉ. रावसाहेब कसबे यांच्या विचारातील मार्क्स–आंबेडकरांचा वैचारिक समन्वय" Submitted by Mr. Sanjay Pandharinath Gaikwad ( PRN: 220610729, Year: 2006-07, Tilak Maharashtra University, Pune) was carried out by the candidate under my supervision, such material as has been obtained from other sources has been duly acknowledged in the dissertation.

Place – Pune

Date - April 2009 Supervisior

Dr. Sharad Ghodke
(Research Guide)
Abasaheb Garware College, Pune-04

# ऋणनिर्देश

प्रस्तुत प्रबंध माझे मार्गदर्शक डॉ. शरद घोडके (विभाग प्रमुख, राज्यशास्त्र विभाग, आबासाहेब गरवारे महाविद्यालय, पुणे) यांचा पाठिंबा व मार्गदर्शनाचेच फलित आहे. आदरणीय घोडके सरांनी आपला बहुमोल वेळ खर्च करून मला माझा शोधप्रबंध विषय सुचविण्यापासून ते संशोधन कार्य पूर्ण करण्यापर्यंत संपूर्ण काम तळमळीने पूर्ण करवून घेतले. प्रथमत: मी विद्यार्थी या नात्याने डॉ. शरद घोडके यांचे मन:पूर्वक आभार मानतो.

प्रबंधाचे काम करताना अनेक व्यक्तींनी मला सक्रीय सहाय्य केले. त्या व्यक्तींमध्ये आमचे प्राचार्य म. ना. कांबळे, स.भू.बा.उर्फ अप्पासाहेब जेधे महाविद्यालय, पुणे यांचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे. कारण संशोधन करणेसाठी वेळोवेळी आवश्यक सहकार्य व प्रोत्साहन देऊन मुलाखत घेण्याची संधीही दिली. त्यांनी संशोधनास अनुकूल वातावरण उपलब्ध करून दिल्यामुळे मी सदैव त्यांचा ऋणी आहे. माझा प्रबंध पूर्ण करत असताना आमच्या महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. प्रतिमा परदेशी यांनी प्रश्नावली तयार करताना, मोलाचा वाटा उचलला, संदर्भ उपलब्ध करून देताना मोलाचे सहकार्य केले. तसेच माझी पत्नी ॲडव्होकेट मंदा गायकवाड  यांच्याबरोबर वेळोवेळी झालेल्या अनौपचारिक चर्चेतून सतत मार्गदर्शन व धैर्य मिळाले. या तीनही व्यक्तींच्या ऋणातून  मुक्त होणे शक्य नसले, तरी त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे मी माझे कर्तव्यच समजतो.

अनेक संस्थांच्या सहकार्यामुळेच प्रबंधाचे काम सुकर झाले आहे. श्री. शिवाजी मराठा सोसायटी पुणे, जयकर ग्रंथालय पुणे विद्यापीठ, राज्यशास्त्र विभाग ग्रंथालय पुणे

विद्यापीठ, जेधे महाविद्यालय ग्रंथालय, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथालय, आबासाहेब गरवारे महाविद्यालय ग्रंथालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्र पुणे विद्यापीठ, ऑल इंडिया इन्स्टिटयुट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट, कोथरूड पुणेचे संचालक चव्हाण सर, सुगावा प्रकाशन, पुणे या आणि इतर संस्थाकडून मिळालेल्या सहकार्याबद्दल त्यांचेही आभार.

मला माझ्या संशोधन कार्यात अनेक मान्यवर विभूतींचे मार्गदर्शन लाभले. त्यात प्रामुख्याने कॉ. शरद ढमाले, कॉ. रणजित परदेशी, प्रा. डॉ. विजय कारेकर, अधिष्ठाता टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, प्रा. माणिक सोनवणे, राज्यशास्त्र विभाग प्रमुख, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, प्रा. डॉ. शोभा कारेकर, डॉ. अपर्णा आगाशे राज्यशास्त्र विभाग, आबासाहेब गरवारे महाविद्यालय पुणे यांचा उल्लेख करता येईल यांचा मी मनापासून आभारी आहे.

आमच्या महाविद्यालयातील सहकारी प्राध्यापक या सर्वांनी तसेच आमच्या महाविद्यालयाचे रजिस्ट्रार मा. एम. के. सातवसाहेब व सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग या सर्वांनी मला मनापासून मदत केली त्यांचा मी आभारी आहे. प्रा. नंदा राशिनकर, प्रा संजय राऊत, प्रा.डॉ. नितीन बिरमल, प्रा. खरात बाळासाहेब, प्रा. सलमा सत्तार, प्रा. संजय अहिरे, उपप्राचार्य प्रकाश पवार, प्रा. दत्ता वाबळे, प्रा.डॉ. सुरेश जाधव, प्राचार्य एस.एन.ठोंबरे व त्यांचा सर्व स्टाफ, उपप्राचार्य व थोर साहित्यिक डॉ. चव्हाण सर यांचेशी वेळोवेळी चर्चा करून शोधप्रबंध पूर्ण करताना बहुमोल मार्गदर्शन लाभले. महत्त्वाचे म्हणजे मुंबई हायकोर्टाचे ॲडव्होकेट सुनिल दिघे, ॲड. विनोद तायडे, ॲड. बी.पी. शिंपी, आदरणीय शिवजीभाई व केरूभाऊ पटेल यांनी माझ्या करिअरच्या विशिष्ट टप्प्यावर वेगळे वळण दिले. त्याबद्दल त्यांचा मी कायमस्वरूपी ऋणी राहील.

आमची संस्था श्री शिवाजी मराठा सोसायटी गुणवत्ता वाढविण्याच्या हेतूने सर्व प्राध्यापकांना नेहमीच प्रोत्साहन देते त्याबद्दल संस्थेचे उपाध्यक्ष मा. ॲड. रणजित चव्हाण, ऑननरी सेक्रेटरी मा. सर्जेराव जेधे आणि सर्व सन्मानीय पदाधिकारी, सदस्य यांचा मी आभारी आहे.

संशोधन कालावधीत माझी दोन मुले जय आणि मंदार यांची खूप वेळा गैरसोय झाली, तो त्रास सहन करत करत व आपला व्यवसाय सांभाळत माझी पत्नी ॲव्होकेट मंदा गायकवाड यांनी मला सांभाळून घेतल्यामुळेच मी संशोधन कार्य पूर्णत्वाला नेऊ शकलो, माझी आई वेणूबाई, वडिल आयु. पंढरीनाथ गायकवाड, मोठे भाऊ पोपट, सुरेश, सुनिल व धनेश गायकवाड यांनी संशोधन कार्याला अनुकूल वातावरण उपलब्ध करून दिले. प्रोत्साहित केले त्याबद्दल त्यांच्या ऋणात राहणे मी माझे कर्तव्य समजतो.

प्रा. किसन कुमरे यांनी माझ्या विषयाची मांडणी करताना वेळोवेळी सविस्तर चर्चा करण्याची संधी दिली. पुस्तकांचे संदर्भ उपलब्ध करून दिले. मांडणी विषय बाहय होणार नाही याची सतत काळजी घेतली. प्रा. डॉ. महालक्ष्मी मोराळे यांनी प्रस्तुत प्रबंधाची संगणकाद्वारे अक्षरजुळणी सुबकपणे करण्याची जबाबदारी पार पाडली. त्यांना सहकार्य प्रविण धोमकर या विद्यार्थीमित्राने केले त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

आमचे प्राचार्य म.ना.कांबळे सर, माझे मार्गदर्शक प्रा.डॉ. शरद घोडके, जेष्ठ विचारवंत डॉ. रावसाहेब कसबे, जेष्ठ विचारवंत कॉ. रणजित परदेशी, कॉ. किशोर ढमाले, प्रा. प्रतिमा परदेशी, डॉ. अलिम वकील, दिवंगत प्रा. दिलीप धर्म, मा. गोसावी सर, मा. अशोक राहिंज सर, मा. माधव रेवगडे सर, मा. मारूती गुंजाळसर आणि इतर मदत केलेल्या व्यक्तींच्या ऋणात राहून मी माझे दोन शब्द संपवितो.

# अनुक्रमणिका

प्रकरण पाहिले
प्रास्ताविक व विषय प्रवेश १०–२३

प्रकरण दुसरे २५–५१
डॉ. रावसाहेब कसबे यांच्या साहित्याचा परिचय

प्रकरण तिसरे
आंबेडकरवादी चळवळीचे मार्क्स आणि
मार्क्सवादाविषयीचे मत ५३–६९


प्रकरण चौथे
कार्ल मार्क्सची डॉ. बाबासाहेब आंबेडकर
आणि आंबेडकरवादी चळवळीविषयीची भूमिका ७१–८५

प्रकरण पाचवे
डॉ. रावसाहेब कसबे यांच्या विचारातील
मार्क्स–आंबेडकर वैचारिक समन्वय ८७–१०८

प्रकरण सहावे
निष्कर्ष, सूचना व सारांश ११०–१३२

संदर्भसूची १३४–१४०

परिशिष्ट १. डॉ. रावसाहेब कसबे यांचा परिचय १४१–१४५
परिशिष्ट २. डॉ. रावसाहेब कसबे यांनी कालक्रमाने
केलेले लिखान १४६–१४८
परिशिष्ट ३. डॉ. रावसाहेब कसबे यांची मुलाखत १५०–१५७



डॉ. रावसाहेब राणोजी कसबे

प्रकरण पहिले

# प्रास्ताविक व विषय प्रवेश

# प्रकरण पहिले

# प्रास्ताविक व विषय प्रवेश

प्रास्ताविक

१.१ संशोधन समस्या

१.२ संशोधनाची उद्दिष्टे

१.३ संशाधनाच्या मर्यादा

१.४ संशोधनाचे महत्त्व

१.५ संशोधन साहित्याचा आढावा

१.६ सैद्धांतिक पार्श्वभूमी

१.७ संशोधनाची गृहितके

१.८ संशोधन पद्धती

१.९ प्रकरण नियोजन

# प्रकरण पहिले

# प्रास्ताविक व विषय प्रवेश

## प्रास्ताविक:—

डॉ. रावसाहेब कसबे यांनी मार्क्सवादाचे मूल्यमापन करताना कोणता हेतू समोर ठेवला हे स्पष्ट होते. आंबेडकरवादी विचार भारतीय सामाजिक प्रश्न विशेषत: जातीयेतेचा प्रश्न सोडविण्यासाठी कसे उपयोगी ठरतात याविषयी डॉ. कसबे यांनी सविस्तर वर्णन आपल्या वेगवेगळ्या ग्रंथांत केलेले दिसून येते. परंतु या बरोबरच ते मार्क्सवादी विचारांकडे कसे पाहतात हेही या ठिकाणी स्पष्ट होते. आंबेडकरी विचारांना 'मार्क्सवादी' विचारांची जोड मिळाली तर सामाजिक स्थितीत परिवर्तन अपेक्षित आहे म्हणूनच रावसाहेब कसबे यांनी 'दास कॅपिटल'वर श्रद्धा दाखविली आहे. एका बाजूला दलितांच्या मते भारतीय जाती या केवळ धर्मांतराने जातील अशी मांडणी पुढे आली तर दुसऱ्या बाजूला भारतातील जाती केवळ आर्थिक परिवर्तनाने जातील अशी मांडणी डाव्या चळवळीने केली. परंतु दोन्ही मांडणीतून मात्र ठोस कार्यक्रम पुढे आला नाही. तर ती श्रमिकांचीच हवाबंद विभागणी आहे असे मानतात आणि मार्क्स जन्माधिष्ठित श्रमविभागणी म्हणजे जात असा विचार समोर ठेवूनच लिखान झाले. डॉ. कसबे यांनी अशी भूमिका मांडली की श्रमिकांची हवाबंद विभागणी वंशपंरपरागत किंवा माणसामाणसातील जन्माधिष्ठित फरक मानल्याशिवाय होऊच शकत नाही. ही परिस्थिती पाहता पुढील विषयाबाबत अभ्यास करण्याची निकड भासते.

## १.१ संशोधन समस्याः—

मी “डॉ. रावसाहेब कसबे यांच्या विचारातील मार्क्स आंबेडकरांचा वैचारिक समन्वय” या विषयावर संशोधन करत असताना मला पुढील काही समस्या जाणवल्या. त्या अशा उदा. आज चळवळींमध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्यांपुढे असा प्रश्न पडलेला आहे की, डॉ. कसबे यांनी मांडणी केली ती नेमकी मार्क्सवादी दृष्टीकोनातून केली की आंबेडकरवादाच्या दृष्टीकोनातून केली? १९६० ते ७० च्या दशकात जी मांडणी झाली त्यात दलित चळवळ आणि मार्क्सवादी चळवळ हया स्वतंत्रपणे चालत होत्या आणि त्यामध्ये त्या स्वतंत्रपणे का चालत होत्या? त्याची काही कारणे आहेत का? सुरूवातीला मार्क्सवादी चळवळीने जातीचा प्रश्न का घेतला नाही? दलित चळवळीचे वर्गीय शोषणाकडे दुर्लक्ष झाले आहे का? सुरूवातीला डॉ. बााबसाहेब आंबेडकरांनी मार्क्सवादाला विरोध केला होता? दलित पॅंथर्सच्या चळवळीविषयी डॉ. कसबे यांचे काय मत आहे? आदरणीय शरद पाटील यांनी जी तुलना केली, त्यांच्या विचारांत आणि डॉ. रावसाहेब कसबे यांच्या विचारांत मूलभूत फरक काय आहे? महाडला डॉ. रावसाहेब कसबे यांनी जो मार्क्स—आंबेडकर समन्वयाचा विचार मांडला त्यावेळी जर विरोधामुळे मांडता आला नसता तर त्यांनी भविष्यकाळात तो मांडण्याचे नियोजन केले असते का? जागतिकीकरणामध्ये हा जो समन्वयाचा विचार मांडला जातो तो किती मर्यादेपर्यंत टिकून राहिल व जागतिकीकरणातील दलित चळवळीचे समन्वयाचे धोरण स्वीकारल्याने परिणाम काय जाणवतील? अशा स्वरूपाच्या अनेक समस्या माझ्या पुढे असल्याने सदरचे संशोधन कार्य हाती घेतले.

## १.२ संशोधनाची उद्दिष्टे

१. डॉ. रावसाहेब कसबे यांना राजकीय विचारवंत का म्हणतात हे अभ्यासणे.

२. डॉ. रावसाहेब कसबे यांच्यावर आंबेडकरी विचारांचा प्रभाव कसा निर्माण झाला आहे याचा शोध घेणे.

३. डॉ. रावसाहेब कसबे यांच्यावर मार्क्सवादी विचारांचा प्रभाव कसा निर्माण झाला आहे याचा शोध घेणे.

४. राजकीय विचारांच्या जडणघडणीत मार्क्सवादी, आंबेडकरवादी चळवळीची भूमिका अभ्यासणे.

५. डॉ. रावसाहेब कसबे यांच्यावर मार्क्सच्या विचारांपेक्षा डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा जास्त प्रभाव झालेला आहे याचा अभ्यास करणे.

## १.३ संशोधनाच्या मर्यादा

सदरचा अभ्यास विषय अभ्यासताना कार्ल मार्क्स आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आणि यातूनच काही विचारवंतांनी केलेला वैचारिक समन्वय पाहता भारताच्या राजकीय विचारांच्या विकास प्रक्रियेत महाराष्ट्राचा वाटा मोठाच आहे असे म्हणावे लागेल. कारण याचा अनुभव आपणास राष्ट्रीय चळवळीमध्येही आला आणि सामाजिक सुधारणेची चळवळ, सशस्त्र क्रांतिकारकांची चळवळ, अस्पृश्यता निर्मूलनाची चळवळ या चळवळीबरोबरच दलितोद्धारक चळवळीमध्ये वैचारिक पातळीवरील चळवळ ही तितकीच उपयुक्त ठरली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर या अव्वल दर्जाच्या राजकीय विचारवंतांसंदर्भात फक्त महाराष्ट्र नव्हे किंवा फक्त भारत नव्हे तर देशी–परदेशी अभ्यासकांनी मोलाचे काम केलेले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा वारसा

घेवून ओपले वैचारिक कार्य महाराष्ट्रातील ज्या विचारवंत, लेखकांनी केले त्या यादीमध्ये डॉ. रावसाहेब कसबे यांचे नाव प्राथम्याने घेतले जाते.

कार्ल मार्क्स आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दोन्हीही युगपुरुष मानले जातात. डॉ. आंबेडकरांचे विचार आणि कार्ल मार्क्सचे विचार यातील प्रवाह वेगवेगळ्या दिशांना जाणारे आहेत. डॉ. कसबे स्वत: दलित कुटुंबात जन्मलेले असल्याने दलित चळवळी त्यांचे वैचारिक योगदान मिळालेच आहे. याबरोबरच त्यांचे मार्क्सवादी प्रवाहालाही मोठे योगदान लाभल्याचे अनेक ठिकाणी अनेक पुस्तकांतून, ग्रंथातून आणि वेळोवेळी प्रसिद्ध झालेल्या साहित्यावरून लक्षात येते. कार्ल मार्क्स आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना एकत्रित बांधणारे विचारवंत अगदी कमी असून त्यांच्यापैकी डॉ. रावसाहेब कसबे यांचे नाव प्राथम्याने घेतले जाते. डॉ. रावसाहेब कसबेंनी आपल्या लिखानात मार्क्स आणि आंबेडकर यांच्यातील दरी कमी करण्याचे अत्यंत महत्त्वाचे काम केले आहे. दलित चळचळीची पार्श्वभूमी असणाऱ्या कुटुंबात जन्म झाला म्हणून फक्त बाबासाहेबांच्या विचारांचा उहापोह न करता 'आंबेडकरी' चौकटीत राहून कार्ल मार्क्सवादविषयी विचार मांडणे म्हणजे जणू काही तारेवरची कसरतच मानावी लागेल. आज अनेक महापुरुषांच्या नावाने वेगवेगळे विचार घेऊन अनेक विचारसरणी निर्माण झालेल्या आहेत. परंतु एकावेळी वेगवेगळ्या दोन विचारसरणींना एकत्र आणून त्याचा फायदा आपल्या दलित चळवळीला करून देणारे विचारवंत अगदी मोजकेच आहेत. डॉ. कसबे यांचे आंबेडकरी विचारांना जसे योगदान लाभले तसे मार्क्सवादी विचारांनाही मोठे योगदान लाभलेले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कार्ल मार्क्स या दोन्हीही महापुरुषांना प्रमाण मानून परस्परांपासून वेगवेगळे दोन प्रवाह निर्माण झाले, दोन वेगवेगळ्या चळवळी निर्माण झाल्या, दोन्ही चळवळींचे उद्दिष्ट वेगवेगळे झाले असे असले तरी आज मात्र दोन्हीही चळवळी आपापल्या विचारसरणीशी कट्टर नाहीत, कडव्या नाहीत.

डॉ. बाबासहेब आंबेडकर असोत वा कार्ल मार्क्स असोत त्यांच्या विचारांना 'प्रचारक' मिळाले आणि त्यांनी स्वत:ला 'आंबेडकरवादी' आणि 'मार्क्सवादी' म्हणवून घेतले. अर्थात ज्यांच्या विचारांना पोटभरू आंधळे प्रचारक मिळतात अशा व्यक्ती आणि त्यांचे विचार मानवतेला शाप ठरण्याचा धोका अधिक आहे. आंबेडकरवादी चळवळीचे मार्क्स बाबतचे मत विचारात घेताना, मार्क्सवादाबाबतचे दृष्टीकोन लक्षात घेता आंधळ्या प्रचारकाच्या नजरेतून मूल्यमापन होऊ नये या अंगाने विचार करणे आवश्यक आहे. डॉ. रावसाहेब कसबे यांनी याच विचाराचा धागा पकडून वैचारिक विश्व प्रगल्भ केले आहे. माणसाला केंद्रबिंदू मानून त्यांनी आपल्या 'आंबेडकर आणि मार्क्स' या ग्रंथात 'आंबेडकर' आणि 'मार्क्स'ची चिकित्सा केली आहे. भारतातील माणसाने मार्क्सबद्दल आपले विचार एकदम घट्ट करून ठेवले आहेत ते असे की, मार्क्सवादाने जातिसंस्थेबद्दल मुळीच विचार केलेला नाही. असे असले तरी डॉ. रावसाहेब कसबे म्हणतात की, या मंडळींच्या मनातील समज हे नुसते गैरसमज नाहीत तर ही त्यांनी स्वत:च स्वत:ची आणि पर्यायाने त्यांच्या चळवळीची करून घेतलेली अक्षम्य फसवणूक आहे. वरील काही मर्यादा मार्क्स आंबेडकर विचारांच्या समन्वयामध्ये दिसून येतात.

## १.४ संशोधनाचे महत्त्व

"डॉ. रावसाहेब कसबे यांच्या विचारातील मार्क्स–आंबेडकरंचा वैचारिक समन्वय" हा संशोधन प्रकल्प लिहिण्यापूर्वी या विषयाच्या अभ्यासाचा जो मुख्य गाभा आहे तो विचारात घ्यावा लागेल.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कार्ल मार्क्स हे दोन्ही विचारवंत फक्त विचारवंत नव्हते तर प्रत्यक्ष चळवळीचे ते निर्मातेही आहेत. दोन्हीही विचारवंत आणि समाजसुधारक असल्यामुळे ते समाज मनात कायमचे स्थान करून राहिले आहेत. दोघांमुळेही समाजात

क्रांती झालेली आहे. दोघेही आपापल्या विचारांचे पक्के समर्थक आहेत. दोघांच्याही विचारांवर आधारित काही संघटना, दबावगट आणि राजकीय पक्ष सुद्धा निर्माण झालेले आहेत. आंबेडकर आणि मार्क्स हे दोन्ही विचारवंत, समाजसुधारक दोन वेगवेगळ्या मार्गाने जाणारे विचारवंत असून त्या दोघांचा विचार एकत्र आणण्याबाबतची आज मोठी समस्या निर्माण होऊ घातली आहे. एका बाजूला परिवर्तनाच्या मर्यादा दलित समाजाला आहे तर दुसऱ्या बाजूला सर्व धर्मपीठांनी मार्क्सला बहिष्कृत मानले. परंतु डॉ. आंबेडकरांनी मार्क्सला बहिष्कृत मानले नाही. म्हणजे डॉ. आंबेडकरांनी कार्ल मार्क्सवर टीका केली परंतु त्यांचे वैचारिक योगदान मान्य केले असे दिसते.

डॉ. रावसाहेब कसबे हे स्वत: दलित असून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर त्यांची बेसुमार निष्ठा आहे. ज्या विभूतीची निष्ठा आंबेडकरी विचारांवर आहे ती मार्क्सच्याजवळ कायमस्वरूपी जाऊ शकत नाही कारण दोन्ही विचार वेगवेगळ्या तात्त्विक आधारांवर उभे आहेत. असे असले तरी डॉ. रावसाहेब कसबे यांनी जे विचार मांडले ते आधुनिक युगात दोन विचारसरणींना एकत्र करून मांडलेले आहेत. त्यामुळे डॉ. रावसाहेब कसबेंचे विचार कार्ल मार्क्सकडे झुकलेले आहेत की डॉ. आंबेडकरांकडे झुकलेले आहेत हे तपासून पाहण्याची आज नितांत गरज आहे. संधोधनाचा हा हेतू स्पष्ट करण्याचा प्रयत्न या संशोधन प्रकल्पामध्ये केला आहे.

## १.५ संशोधन साहित्याचा आढावा

डॉ. रावसाहेब कसबे यांच्या संबंधी, त्यांच्या जीवनावर, जीवनाच्या तत्त्वज्ञानावर आधारित असणारे तसेच त्यांच्या विचारातील क्रांतीकारी चिंतन कसे आहे यासंबंधी मा. उत्तम कांबळे यांनी "रावसाहेब कसबे यांचे क्रांतीकारी चिंतन" ही मुलाखतीवर आधारित असणारी पुस्तिका लिहून सुगावा प्रकाशन, पुणे यांनी जून २००६ मध्ये प्रकाशित केलेली

आहे. यामध्ये डॉ. रावसाहेब कसबे यांच्या बहुश्रुत व्यक्तीमत्त्वाचा वेध घेण्यात आलेला आहे.

मा. सुधाकर गायकवाड यांनी “डॉ. रावसाहेब कसबे एक मूल्यमापन” ही छोटी पुस्तिका लिहिली. ती सुमेध प्रकाशन, पुणे यांनी डिसेंबर २००७ मध्ये प्रकाशित केलेली आहे. या पुस्तिकेमध्ये डॉ. रावसाहेब कसबे यांनी केलेल्या लिखानाचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. कोणत्या सामाजिक पार्श्वभूमीवर कोणते ग्रंथ डॉ. कसबे यांनी लिहिले तसेच ‘झोत’ या पुस्तकाचे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ कार्यकर्त्यांनी जे दहन केले त्याची मीमांसा केलेली आहे. याबरोबरच कालक्रमाने केलेल्या लिखानाचे मूल्यमापन केले आहे.

डॉ. सुहास पळशीकर, डॉ. राजेंद्र व्होरा, कॉ. गोविंद पानसरे, कॉ. शरद पाटील, मा. प्रेमानंद रूपवते इत्यादी महाराष्ट्रातील अनेक विचारवंतांनी, कार्यकर्त्यांनी विविध कार्यक्रमांतून परिषदांतून, चर्चासत्रांमधून, विचारवेध संमेलना मधून, सत्यशोधक संघटक मासिकांतून प्रसिद्ध झालेल्या साहित्यातून डॉ. रावसाहेब कसबे यांच्या विचारांचे चिकित्सक विश्लेषण केलेले आहे. प्रवरा एज्युकेशन संस्था, मुळा एज्युकेशन संस्था यांनी आयोजित केलेल्या वेगवेगळया कार्यक्रमात डॉ. रावसाहेब कसबे यांच्या विचारांची दखल घेतली आहे. डॉ. कसबे यांनी ‘डॉ. आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना’ हे पहिले पुस्तक लिहिले. हा ग्रंथ बाबासाहेब आंबेडकरांच्या राज्यघटनेसंबंधी भारताच्या सामाजिक इतिहासाच्या पार्श्वभूमीवर चर्चा करणारा आहे. एक विश्लेषक म्हणून त्यांनी २००० सालापर्यंत झालेल्या प्रमुख घटना दुरूस्त्या आणि संवैधानिक प्रश्नांवर सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या प्रमुख निकालांचे सविस्तर विश्लेषण केले आहे. एक सामाजिक जबाबदारी म्हणून त्यांनी या ग्रंथाचे विश्लेषण केले आहे. डॉ. कसबेंनी जे लिखान केले त्यात सामाजिक बांधिलकी दिसते, एक विचारवंत दिसतो. एक समाजसुधारक चळवळीमध्ये योगदान देणारे विचारवंत म्हणून विश्लेषण करतात. अरूण शौरी या पत्रकाराला

भारतीय राज्यघटनेचा इतिहास ज्ञात आहे असे त्यांच्या लिखानात कुठेही स्पष्ट होत नाही असे स्पष्ट विवेचन कसबेंच्या लिखानात दिसून येते. जाती संस्थेचा उगम भारतीय इतिहासात कसा झाला यासारख्या एकाही प्रश्नाला स्पर्श केला नाही असे स्पष्ट चिंतन कसबेंनी आपल्या लिखानात शौरींबद्दल केले आहे. अखिल भारतीय समाजवादी अध्यापक सभा स्थापना अधिवेशनातील अध्यक्षीय भाषणात नाशिक येथे २९ सप्टेंबर २००२ रोजी डॉ. रावसाहेब कसबे यांनी ज्या 'शिक्षणाची आव्हाने' चर्चिली आहेत त्याची एक छोटी पुस्तिका तयार केली व प्रकाशित केली. 'पदवी आणि पदव्युत्तर मराठी अभ्यासक्रम: स्वरूप आणि अपेक्षा' या विषयावर संगमनेर महाविद्यालय संगमनेर दि. २७/७/२००३ रोजी झालेल्या चर्चासत्राचा समारोप डॉ. कसबे यांनी जे भाषण केले ते पुस्तकरूपाने प्रसिद्ध करण्यात आले. "मराठी भाषेच्या उज्जवल भवितव्यासाठी" असे शीर्षक असलेल्या पुस्किामध्ये दिलेले संदर्भ पाहता एरिक फ्रॉम यांच्या विचारांचे प्रतिबिंब दिसते. "धर्म: मानवी संस्कृती व विकास" ही पुस्तिका म्हणजे ऑक्टोबर २००३ मध्ये श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर येथे कॉ. गोविंद पानसरे स्मृती व्याख्यानमालेत डॉ. कसबे यांनी दिलेले व्याख्यान आहे. यात ते म्हणतात "आज आपल्याला स्वत:ची ओळख करून घेण्यासाठी मानव जातीच्याच जन्माची जीवघेणी कहाणी समजून घ्यावी लागेल.

६ डिसेंबर १९७६ रोजी नागपूरच्या डॉ. आंबेडकर अध्ययन मंडळाने जे व्याख्यान आयोजित केले होते त्या व्याख्यानात त्यांनी 'आंबेडकरांचे सामाजशास्त्र व मार्क्सचे अर्थशास्त्र' यांचा सुरेख मेळ घातलेला दिसून येतो. मा. सुधाकर गायकवाड डॉ. कसबे यांच्याबद्दल म्हणतात की, त्यांनी 'आंबेडकर आणि मार्क्स' यांच्या विचारांचा समन्वय करणारा ग्रंथच लिहिला. त्यावेळचा काळ हा सामाजिक चळवळीच्या उत्थानाचा काळ होता. आंबेडकरी दलितांचा कम्युनिस्ट विरोधी हा वैचारिकतेबरोबर मानसिकही होता आणि आजही काही प्रमाणात आहे. त्यावेळी मार्क्स आंबेडकरांच्या समन्वयाचा विचार मांडण्याचा

रावसाहेबांचा तो अत्यंत धाडसी प्रयत्न होता. दलित चळवळ आणि डावी चळवळ यांनी एकमेकांचे शत्रू बनून आपल्या मर्यादित शक्तीचा अपव्यय करण्याऐवजी एकमेकांच्या सहकार्याने आपले सामर्थ्य विस्तारत राहावे आणि भारतातील सामाजिक व राजकीय जीवनात क्रांतीकारक परिवर्तन घडवावे. मा. सुधारकर गायकवाड या लेखकाने डॉ. कसबे यांच्या विचारांच्या मूल्यमापनावर एक पुस्तिका लिहिली. त्या पुस्तिकेमध्ये एक विचारवंत म्हणून रावसाहेब कसबे एका उंचीवर पोहचलेले आहेत. त्यांच्या विचारांचा आवाका कसा वैश्विक आहे, डॉ. रावसाहेब कसबे हे फक्त मार्क्स आंबेडकरांचा समन्वय करणारे राहिले नाहीत तर स्वत:च्या स्वतंत्र विचारांचे तत्त्वज्ञ झाले आहेत. याबरोबरच कॉ. शरद पाटील यांनी डॉ. रावसाहेब कसबे यांना आपले वैचारिक गुरूच मानले आहे. डॉ. रावसाहेब कसबे यांनी जो समन्वयवादी विचार मांडला त्यालाा सैद्धांतिक मांडणीत साचेबंद करण्याचे काम मा. शरद पाटील यांनी केलेले आहे.

## १.६ सैद्धांतिक पार्श्वभूमी

कार्ल मार्क्स आणि मार्क्सवाद यांच्या विचारांचा उपयोग डॉ. बाबासाहेबांनी केवळ भगवान बुद्धाला मार्क्सच्याशेजारी किंवा असे म्हणता येईल की, मार्क्सला बुद्धाच्याशेजारी बसविण्यासाठी केला. ध्येय एकच होते मात्र शास्त्र वेगळे होते. डॉ. कसबे यांनी आपल्या लेखनात अनेक विचारवंतांचे दाखले अनेक ठिकाणी दिलेले आहेत. यावरून त्यांचे राष्ट्रवादी विचार लोकशाही बाबतची भूमिका काय होती हे समजते. सामाजिक न्यायाबाबत तो मिळविण्यासाठी भगवान बुद्धाचा मार्ग श्रेष्ठ आहे की कार्ल मार्क्सचा मार्ग श्रेष्ठ याबातची तुलना त्यांच्या लेखनात आल्याने डॉ. कसबे मार्क्सवादी आहेत की आंबेडकरवादी आहेत हा प्रश्न अनेकांना पडला आहे. ते **स्वत: दलित असल्यामुळे ते**

**आंबेडकरवादी विचारांपासून बाजूला जात नाहीत असे वाटते. यातील तथ्य शोधणे हा सदरच्या संशोधन प्रकल्पाचा अंतिम हेतू आहे.**

डॉ. रावसाहेब कसबे यांचे बालपण आंबेडकरी चळवळीत गेले. चळवळीच्या संस्कारातूनच त्यांनी आपले लेखन केले. दलितांच्या प्रागतिक चळवळीबाबतचे विचार, चिकित्सक वृत्ती, जाती बाहेरील त्यांचा मोठा परिवार तसेच मार्क्सवादाबाबतचे मत, बाबासाहेब मुळात समाजवादी समाजरचनेचा पुरस्कार करणारे नेते होते असे असले तरी लोकशाहीद्वारे या समाजरचनेची स्थापना व्हावी. थोडक्यात डॉ. कसबे यांनीही आपले लेखन आंबेडकरीवादी, मार्क्सवादी, मानवतावादी हेतूनेच केलेले आहे.

जागतिकीकरणामध्ये आज भारतात आंबेडकर–मार्क्स समन्वयाशिवाय कुणालाही क्रांती करता येणार नाही. जागतिकीकरणाच्या रेटयात जातीव्यवस्था व वर्गव्यवस्थेचे प्रश्न अधिक गंभीर बनले आहेत. हे वास्तव ओळखून डॉ. कसबे यांनी समन्वयवादी विचार मांडले आहेत. त्यांच्या एकूणच साहित्यातून ते समन्वयवादीच आहेत हे सिद्ध होते. विद्यार्थीदशेत मात्र ते आंबेडकरवादी होते परंतु आज त्यांच्या जीवनाचे सूत्र समन्वयवादीच राहिले आहेत.

साम्यवादाची सुरूवात 'या जगात पिळवणूक आहे' या सिद्धांतापासून होते. जगातील श्रीमंत माणूस आपल्याकडे असणाऱ्या पैशाच्या जोरावर सामान्य जनतेची पिळवणूक करतो. याचा परिणाम असा होतो की, सामान्य माणूस हा दु:खी, दीन आणि दरिद्री होतो आणि कार्ल मार्क्स या परिस्थितीला 'पिळवणूक' म्हणतो. कार्ल मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचा हा आरंभबिंदू मानला जातो. यातून बाहेर येण्यासाठी समाजात कोणालाही खाजगी मालमत्ता असू नये असा उपाय सुचवितात. अतिरिक्त मूल्यावर फक्त श्रीमंताचीच मालकी न राहता ते सर्वांच्या मालकीचे असले पाहिजे आणि हे होण्यासाठी राज्याची मालकीच कामगार वर्गाकडे असावी. अशाच पद्धतीचे विचार बाबासाहेब आंबेडकरांनी

आपल्या भाषणात सांगितलेली आहेत. डॉ. रावसाहेब कसबे आंबेडकरी विचारधारेतून मार्क्सकडे कसा पाहतो यासंबंधी कार्ल मार्क्स ज्याला गरिबांची पिळवणूक म्हणतो त्या संबंधी बुद्धांची भूमिका काय? बुद्धाने धर्माचा जो इमला उभा केला आहे त्याचा मूलाधार काय आहे? बुद्धानेसुद्धा “या जगात दु:ख आहे” असे मान्य केले आहे. परंतु त्यांनी पिळवणूक शब्द वापरला नाही. डॉ. बााबसाहेब आंबेडकरांनी आपल्या तत्त्वज्ञानातून ‘पिळवणूक’ म्हणजेच ‘दु:ख’ आहे हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे व बुद्धांचा कालानुषंगिक एक नवा अर्थ, एक नवे समर्थ विश्लेषण मांडण्याची त्यांना गरज वाटत होती. या गरजेतून बाबासाहेबांच्या ‘बुद्ध आणि त्यांचा धम्म’चा जन्म झाला. ही सैद्धांतिक बाजू लक्षात घेऊन सदर संशोधन विषयाबाबतची मांडणी केलेली आहे.

## १.७ संशोधनाची गृहीतके:—

१. डॉ. रावसाहेब कसबे हे एक राजकीय विचारवंत म्हणून संपूर्ण महाराष्ट्राला परिचित आहेत.

२. डॉ. रावसाहेब कसबे यांच्या विचारांवर आंबेडकरी विचारांचा प्रभाव दिसून येतो.

३. डॉ. रावसाहेब कसबे यांच्या विचारांवर मार्क्सवादी विचारांचा प्रभाव दिसून येतो.

४. डॉ. रावसाहेब कसबे यांच्या राजकीय विचारसरणीवर आंबेडकरवादी आणि मार्क्सवादी चळवळींचा प्रभाव दिसून येतो.

५. डॉ. रावसाहेब कसबे हे आंबेडकरवादी आहेत.

## १.८ संशोधन पद्धती ( अध्ययन तंत्र व पद्धत):—

मी डॉ. रावसाहेब कसबे यांच्या विषयी अभ्यास करत असताना त्यांच्या विचाराचे वैशिष्टये काय आहेत? त्यांनी मार्क्स—आंबेडकरवादी विचारसरणीचा समन्वय कसा साधला आहे. याबाबत तसेच “डॉ. रावसाहेब कसबे यांच्या विचारांतील मार्क्स—आंबेडकरांचा वैचारिक समन्वय” या संशोधन प्रकल्पामध्ये वस्तुनिष्ठता येण्याच्या दृष्टीने माहितीचा प्राथमिक स्त्रोत (Primary data) म्हणून वेगवेगळया विचारवंतांच्या तसेच चळवळीमध्ये कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या मुलाखती घेतल्या तसेच महत्त्वाचे म्हणजे मी ज्यांच्याबद्दल हे संशोधन करत आहे त्यांचीच प्रत्यक्ष मुलाखत घेतली आहे. या संशोधनात मुलाखत तंत्र या पद्धतीचा वापर केला आहे.

सदरच्या संशोधन कार्यात माहितीचा दुय्यम स्त्रोत (Secondary data) म्हणून डॉ. रावसाहेब कसबे यांनी लिहिलेले विविध ग्रंथ, पुस्तिका, विविध ठिकाणी छापून आलेली भाषणे तसेच वर्तमानपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या बातम्या व त्यांच्या पुस्तकांचे परिक्षण या सर्व स्त्रोताचा वापर मी या संशोधन पद्धतीमध्ये केलेला आहे.

## १.९ प्रकरणांचे नियोजन

“डॉ. रावसाहेब कसबे यांच्या विचारातील मार्क्स—आंबेडकरांचा वैचारिक समन्वय” या संशोधन प्रकल्पामध्ये एकूण सहा प्रकरणे असून पहिल्या प्रकरणामध्ये प्रास्ताविक व विषयप्रवेश याचे तसेच या संशोधनाच्या समस्या, उद्दिष्टे, मर्यादा, महत्व, गृहितके, संशोधन पद्धती, संशोधन साहित्याचा आढावा तसेच प्रकरणांचे नियोजन कसे केले आहे याबाबतचे विश्लेषण करण्यात आलेले आहे. निरीक्षण पद्धत आणि मुलाखत तंत्राचा वापर संशोधन प्रकल्पासाठी केला आहे. माहितीचा प्राथमिक स्त्रोत (Primary data) आणि (Secondary data) म्हणून त्यांनी लिहिलेली पुस्तके, त्यांची स्वत:ची पुस्तके, मुलाखत

आणि इतर सामाजिक कार्यकर्ते, विचारवंत व त्यांच्यावर लिहिलेली पुस्तके यांचा संदर्भ घेतला आहे. प्रकरण दोनमध्ये डॉ. रावसाहेब कसबे यांच्या साहित्याचा परिचय देण्यात आला आहे. परिचयामध्ये जीवनपरिचय, एक विचारवंत आणि समाजसुधारक म्हणून परिचय, त्यांच्या वैचारिक भूमिकेवर पडलेला प्रभाव, महाराष्ट्रातील सामाजिक चळवळी आणि राजकीय विचारसरणीचा प्रडलेला प्रभाव, डॉ. कसबे यांचा वैचारिक प्रवास आणि वैचारिक बैठक, कालक्रमाने केलेले लिखान, लिखानास विविध संस्थातर्फे मिळालेले ग्रंथ पुरस्कार, विविध पुरस्कार, तसेच विविध ठिकाणी भूषविलेले अध्यक्षपद या उपघटकांचे विश्लेषण केले आहे. प्रकरण तीनमध्ये आंबेडकरवादी चळवळीचे कार्ल मार्क्स आणि मार्क्सवादाविषयीचे मत काय आहे या विषयीची माहिती नोंदविली आहे. या प्रकरणात आंबेडकरवादी चळवळीच्या तत्त्वज्ञानाची ओळख केली आहे. प्रकरण चार मध्ये कार्ल मार्क्सची डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि आंबेडकरवादी चळवळीविषयीची भूमिका नोंदविले आहे. मात्र या प्रकरणामध्ये मार्क्सवादी तत्त्वज्ञानाचा उहापोह करण्यात आला आहे व मार्क्सवादी दृष्टीकोनातून आंबेडकरवादी चळवळीकडे पाहिले आहे. प्रकरण पाच मध्ये डॉ. रावसाहेब कसबे यांच्या साहित्यातील मार्क्स–आंबेडकर समन्वय या विषयीचा उल्लेख आहे. याच प्रकरणात त्यांच्या साहित्यातील मार्क्सचा प्रभाव, डॉ. आंबेडकरांचा प्रभाव कसा पडला व या दोन्ही विचारांचा समन्वय कसा झाला यांचे सविस्तर स्पष्टीकरण करण्यात आले आहे. प्रकरण सहा मध्ये संधोधन प्रकल्पाच्या अभ्यासाअंती काढलेले निष्कर्ष सूचना व सारांशाची मांडणी केली आहे. त्यानंतर संदर्भसूची दिलेली असून तीन परिशिष्टे जोडलेली आहेत. परिशिष्टांमध्ये डॉ. रावसाहेब कसबे यांचा परिचय, त्यांनी कालक्रमाने केलेले लिखान तसेच त्यांना व त्यांच्या लेखनाला मिळालेले पुरस्कार व छायाचित्रासह मुलाखत मुद्रित केलेली आहे.

प्रकरण दुसरे

# डॉ. रावसाहेब कसबे यांच्या साहित्याचा परिचय

# प्रकरण दुसरे

## डॉ. रावसाहेब कसबे यांच्या साहित्याचा परिचय

प्रास्ताविक

२.१ डॉ. रावसाहेब कसबे यांचा जीवनपरिचय

२.२ डॉ. रावसाहेब कसबे– एक विचारवंत आणि समाजसुधारक

२.३ डॉ. रावसाहेब कसबे यांच्या वैचारिक भूमिकेवर पडलेला प्रभाव

२.४ महाराष्ट्रातील सामाजिक चळवळी आणि राजकीय विचारसरणीचा डॉ. कसबे यांच्यावर पडलेला प्रभाव

२.५ डॉ. रावसाहेब कसबे यांचा वैचारिक प्रवास आणि वैचारिक बैठक

# प्रकरण दुसरे

## डॉ. रावसाहेब कसबे यांच्या साहित्याचा परिचय

### प्रास्ताविकः—

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्नही असेच होते. कारण समाजातील जातीयता रद्द करण्यासाठी, जातीसंस्थेचे उच्चाटन करण्यासाठीचे ध्येय ठरविले होते. कनिष्ठ जाती वरिष्ठ जातीच्या जाचाला कंटाळले होते, व्यथित झाले होते. ही जातीयता संपवून संपूर्ण भारत आणि जग समानतेच्या पायावर उभे करून आदर्श बनवायचे होते यासाठी पिळवणूक नाहीशी करायची असल्याने अनेक सामाजिक आंदोलने उभी केली होती. कार्ल मार्क्सचा लढा वर्गाचा आहे आणि डॉ. बाबासाहेबांचा लढा जातीचा आहे असे अनेक विचारवंत म्हणतात. डॉ. रावसाहेब कसबे यांच्या मते भांडवलशाहीच्या आक्रमक पवित्र्यामुळे विकलांग होत चाललेली साम्यवादी व्यवस्था आणि ऱ्हास पावत असलेला बौद्ध धर्म या दोघांना आधार देण्यासाठी आणि त्यांच्यात नवचैतन्य निर्माण करण्यासाठी आज नव्या चिंतनाची आवश्यकता आहे. दलित चळवळीच्या सुरू झालेल्या समीक्षेच्या प्रक्रियेतच आंबेडकरांच्या बरोबर कार्ल मार्क्सचेही नाव पुढे आले. यामुळे डॉ. रावसाहेब कसबे यांच्या विचारातील मार्क्स—आंबेडकरांचा वैचारिक समन्वय अभ्यासण्याची मला आवश्यकता वाटते.

## २.१ डॉ. रावसाहेब कसबे यांचा जीवनपरिचयः–

१२ नोव्हेंबर १९४४ रोजी आंबेडकरी विचारांची पार्श्वभूमी असणाऱ्या, दारिद्रयात जीवन जगणाऱ्या एका दलित कुटुंबात रावसाहेब कसबे यांचा जन्म झाला. वडिल राणोजी सावळेराम कसबे हे स्वत: डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीतील एक अशिक्षित 'सैनिक' होते. सारा अस्पृश्य समाज बलुतेदारीवर जीवन कंठित असताना मेलेली जनावरे ओढणे, त्यांचे मांस सर्वांनी समान वाटून घेणे, सुगीच्या दिवसांत शेजाऱ्यांच्या खळ्यावर जाऊन तेथील बलुते घेणे व ते वाटून घेणे अशी सामाजिक परिस्थिती रूढ असणाऱ्या काळात औरंगपूर ता. अकोले जि. अहमदनगर या अतिदुर्गम गावात, आदिवासी भागात रावसाहेबांचा जन्म झाला. त्या गावात अस्पृशांची फक्त पाचच घरे होती. आई दगडाबाई राणोजी कसबे यांच्यासहित आपल्या घरातील इतर लोकांना देखील घराघरातून भाकरी मागून आणताना रावसाहेबांनी पाहिले आहे. शेताच्या बांधावर बसून ढोरे फाडताना त्यांनी पाहिले आहे. आजही रावसाहेबांना कुत्री, गिधाडे, कावळे ढोराला फाडताना जसेच्या तसे आठवतात. अकोले तालुक्यात विठे हे राजूरजवळ असणारे छोटे गाव की ज्या गावात रावसाहेबांची आत्या राहात होती. त्या गावात जनावर फाडताना रावसाहेबांच्या अंगावर कावळ्याने चोचीत धरलेला डोळा पडला.[१] आणि तेव्हापासून विठे गाव रावसाहेबांना कायमचे सुटले.

१९५० च्या दरम्यान दादासाहेब रूपवते यांनी गावागावात आंबेडकरी चळवळ घेऊन जाण्याचे काम केले. भीमजयंतीलाच नव्हे तर कोणतेही अगदी लग्नाचे सुद्धा निमित्त करून दादासाहेब रूपवते चळवळीच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार घराघरात पोहचविण्याचे काम केले. परिणामी मेलेल्या जनावरांचे मांस तोडताना दादासाहेबांच्या वडिलांनीच पाहिले व ठरल्याप्रमाणे डॉ. कसबेंच्या वडिलांना भोक पडलेला एक पैसा दंड भरावा लागला. हे सर्व रावसाहेबांनी जवळून अनुभवले आहे.

आजचे 'विचारवंत' रावसाहेब यांनी दारिद्रयात जीवन जगत जगत आपला शैक्षणिक प्रवास केला. सर्वोदय विद्यामंदिर, राजूर तसेच मॉडर्न हायस्कूल अकोले, अहमदनगर महाविद्यालय, अहमदनगर आणि संगमनेर महाविद्यालय, संगमनेर येथे पदवी शिक्षण तर पदव्युत्तर शिक्षणासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद (मराठवाडा विद्यापीठ) गेले आणि याच ठिकाणी त्यांच्या विचाराला चालना मिळाली. आंबेडकरी चळवळीची सुरूवात खऱ्या अर्थाने येथेच झाली. एका बाजूला समाज सुधारणेची तळमळ मनात ठेवून खूप शिकावे, खूप वाचावे असा विचार करत असताना आई गावकीची सर्व कामे करत, वडिल गवंडीकाम, सुतार काम करत. गरिबीला तोंड देत होते. अशा वेळी रावसाहेबांनी पोलिस भरतीचा अयशस्वी प्रयत्न केला. शेवटी अहमदनगर येथे २५ रु. पगाराची बहुजन शिक्षण संघात नोकरी मिळविली. नंतर सिद्धार्थ विद्यालय, संगमनेर येथे मातोश्री रमाबाई आंबेडकर विद्यालय येथे राज्यशास्त्राचे प्राध्यापक म्हणून ते सेवानिवृत्त होऊन सध्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्र, पुणे विद्यापीठ, पुणे येथे ते प्रमुख म्हणून कार्यरत आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या एका अशिक्षित 'सैनिकाने' अपार काबाडकष्ट करून, अनेक संकटांच्या मोठमोठया पर्वतरांगांना पार करत करत दारिद्रयाला तोंड देत रावसाहेब व त्यांच्या भांवडांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. ज्या दारिद्रयात रावसाहेबांचे आई—वडिल मरण पावले त्याचे दु:ख रावसाहेबांच्या मनात सारखेच बोचत आहे. आई—वडिलांसाठी काही करता आले नाही म्हणूनच तर त्यांनी आपले 'डॉ. आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना' हे पुस्तक आई—वडिलांना अर्पण केले आहे.

डॉ. रावसाहेब कसबे हे फक्त अभ्यासातच हुशार होते असे नव्हे तर ते हायस्कूलच्या शिक्षणापासून त्यांच्यात नेत्याचे गुण दिसून येत होते. अकोल्याच्या मॉडर्न हायस्कूलचा जनरल सेक्रेटरी होण्याचा मान त्यांना मिळाला होता. लता मंगेशकरांच्या

गाण्यावर ते अती प्रेम करतात. गाणी म्हणणे, नाटकात काम करणे, वक्तृत्व स्पर्धेत सहभागी होणे असे विविधांगी, बहुश्रुत व्यक्तीमत्त्व त्यांना लाभले आहे. सुरूवातीच्या काळात अस्पृशांना मंदिरामध्ये जरी प्रवेश नव्हता तरी देखील मंदिरांची उभारणी करण्यामध्ये रावसाहेबांच्या वडिलांचे योगदान मोठे होते. तेव्हापासूनच रावसाहेबांना चिकित्सा करण्याची सवय जडली होती. त्यांचे वडिल राणोजी कसबे अस्पृश्य असून त्यांना देखील गावामध्ये एका अर्थाने मान होता. स्पृश्य मंडळींचे तंटे सोडविण्याचे काम त्यांच्या घरामध्ये त्यांच्या वडिलांच्या सहकार्याने गावातील मंडळी करत असत आणि रावसाहेब हे त्यांना जवळून अनुभवत असत. परिणामी विविध गुण त्यांनी आपल्या लहान वयातच अंगीकारले होते. या आठवणी, अनुभवांना व परिस्थितीला बरोबर घेऊनच त्यांनी शिक्षकी पेशावर प्रेम केले. सॉक्रेटिस पासून ते कार्ल मार्क्स पर्यंत सर्वच विचारवंतांचा अभ्यास त्यांनी केला आहे. एक राज्यशास्त्राचा विद्यार्थी म्हणून तसेच आपल्या विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी सखोल आणि शिस्तबद्ध वाचन करण्याची आवश्यकता आहे अशी भावना मी त्यांचा एक विद्यार्थी असल्यापासून ते त्यांच्याबरोबर काही काळ प्राध्यापक म्हणून काम करताना जवळून जाणवली होती.

महाविद्यालयीन जीवन सुरू होण्यापूर्वी पासून त्यांना वाचनाची प्रचंड आवड होती. मॅट्रीकची परीक्षा पास होईपर्यंत त्यांनी मराठी ललित साहित्य, ह.ना.आपटे, नाथमाधव, खांडेकर, फडके, माडखोलकर, पेंडसे, अत्रे, कुसुमाग्रज, विभावरी शिरूरकर, पु.ल. देशपांडे इत्यादींच्या साहित्याचे वाचन केले आहे. कॉलेज जीवनात त्यांना प्रभावित करणारी अत्यंत महत्त्वाची पुस्तके म्हणजे आचार्य जावडेकरांचे 'गांधीवाद', डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे 'ॲनिहिलेशन ऑफ कास्ट', कार्ल मार्क्स व फ्रेड्रिक एंजल्सचे 'कम्युनिस्ट मेनिफेस्टो' या तीन पुस्तकांनी रावसाहेबांना विशेष प्रभावित केले होते.याबरोबरच एम.ए. राज्यशास्त्राचा अभ्यास चालू असताना त्यांनी पी. लक्ष्मीनरसु यांचे 'इसेन्स ऑफ

बुद्धीझम', के. पी. जायस्वाल यांचे 'हिंदू पॉलिसी' व डी. डी. कोसंबी देखील अभ्यासले. रावसाहेबांचे आयुष्य घडविण्यात अनेक विभूतींचा हात आहे असे त्यांच्या अनेक ठिकाणच्या लिखानातून दिसते.त्यामध्ये प्रामुख्याने दया पवार, दादासाहेब रूपवते, प्राचार्य म. भि.  चिटणीस, प्राचार्य म. वि. कौडिंण्य, प्रा. डॉ. गंगाधर पानतावणे यांच्याशी झालेल्या वेळोवेळी चर्चेतून जीवन संघर्षाचे धडे रावसाहेबांना शिकायला मिळाले. वाचनाची, चिंतनाची आवड निर्माण होऊन सुप्त गुणांचा विकास त्यांना करता आला. अर्थात ते फक्त वरील  गोष्टींत  अडकून  न  पडता  त्यांनी लता मंगेशकर यांच्या गाण्यांवर त्यांनी असीम प्रेम केले आहे. बालपणापासून चळवळीचे अंग असणाऱ्या रावसाहेबांनी हेही आपले वेगळेपण जपले आहे. आपल्या आयुष्यामध्ये विविध विषयातील गाढे अभ्यासक जेष्ठ विचारवंत, विविध क्षेत्रातील नामवंत यांच्या विचारांतील गहनता, मिश्किलपणा, फिरकी घेण्याची खुमखुमीचा परिणाम व प्रभाव रावसाहेबांवर पडलेला दिसतो.

अहमदनगरला १९६५ मध्ये बौद्ध साहित्य संमेलन झाले. कवी कुसुमाग्रज हे उद्‌घाटक, कर्मवीर दादासाहेब गायकवाड हे प्रमुख पाहुणे व रावसाहेब कसबे स्वागताध्यक्ष होते. तेव्हा रावसाहेब २० वर्षाचे असताना त्यांनी केलेले भाषण अतिशय गाजले. वैचारिक क्षेत्रात अतिशय आदराचे आणि दबदबा असलेले नाव जगाला माहित झाले ते 'झोत' लिहूनच. हा ग्रंथ लिहून महाराष्ट्राचे अवघे वैचारिक विश्व ढवळून निघाले.

थोर विचारवंत डॉ. रावसाहेब कसबे हे स्वत: दलित असून अगदी बालपणापासून ते आंबेडकरी चळवळीत वाढलेले आहेत. दलित जातीच्या काही मर्यादा आहेत असे काही विचार मानत असल्यामुळे डॉ. आंबेडकर आणि कार्ल मार्क्स यांच्या विचारांतील सुरांचा एकत्रित अभ्यास करण्याची गरज काही विचारवंतांना वाटली. डॉ. कसबे यांच्या लिखानावरून आपणास असे म्हटले तर फारसा फरक पडणार नाही की, डॉ. आंबेडकरांनी

मार्क्सला बहिष्कृत मानले नाही. कार्ल मार्क्स आणि डॉ. आंबेडकर यांच्यातील वैचारिक वाद प्रचंड आहेत. परंतु रावसाहेबांच्या दृष्कोणातून कार्ल मार्क्स आणि डॉ. आंबेडकर समजून घेणे आवश्यक आहे. आज त्यांना एकत्रित अभ्यास करण्याची आवश्यकता आहे.

आंबेडकरवाद आणि मार्क्सवाद यांचे संयुक्तीकरण असणारे विचारवंत महाराष्ट्रामध्ये अगदी मोजकेच आहे. डॉ. कसबे दलित चळवळीत जन्मलेले असून मार्क्सवादी प्रवाहालाही त्यांचे मोठेच योगदान लाभले आहे. डॉ. आंबेडकर आणि कार्ल मार्क्स या दोन्हीही युगपुरूषांना प्रमाण मानून परस्परांपासून वेगवेगळे दोन प्रवाह निर्माण झाले आणि दोन्हीही विचारवंतांनी जे विचार मांडले त्यावरून समाजामध्ये दोन वेगवेगळ्या चळवळी निर्माण झाल्या आहेत. या चळवळी अत्यंत कडव्या किंवा कट्टर आहेत असे आज म्हणता येणार नाही. कारण डॉ. रावसाहेब कसबे यांच्यासारख्या विचारवंतांनी या दोन्ही चळवळीतील ही दरी कमी केली ती आपल्या लिखानातून. त्यामुळे विविध चळवळींमधील कार्यरत असणारे कार्यकर्ते मार्क्सवादाविरूद्ध बोलताना दिसत नाहीत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर या अव्वल दर्जाच्या राजकीय विचारवंतासंदर्भात फक्त महाराष्ट्र नव्हे किंवा फक्त भारत नव्हे तर देशी—परदेशी अभ्यासकांनी मोलाचे काम केलेले आहे. डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा वारसा घेऊन आपले वैचारिक कार्य महाराष्ट्रातील ज्या विचारवंतांनी, लेखकांनी केलेले आहे त्या यादीमध्ये डॉ. रावसाहेब कसबे यांचे नाव पहिल्या क्रमांकावर घेतले जाते. यामुळेच असे म्हटले गेले की बालपणापासून चळवळीचे अंग असणाऱ्या रावसाहेबांनी आंबेडकरी चळवळीचे संस्कार घेऊनच आपल्या लेखनास सुरूवात केलेली आहे.

थोडक्यात आपणास असे म्हणता येईल की एका अतिदुर्गम भागात जन्म झालेल्या, अठरा विश्व दारिद्रयात जीवन जगणाऱ्या, आंबेडकरी पार्श्वभूमी असणाऱ्या

कुटुंबात रावसाहेबांचा जन्म झाला. देशाच्या वैचारिक क्षेत्रात अतिशय आदराचे आणि दबदबा असलेला विचारवंत म्हणून वेगळा ठसा उमटवला. प्रत्यक्ष चळवळ करताना ज्या वैचारिक पार्श्वभूमीची गरज असते अशी वैचारिक पार्श्वभूमी मांडण्याचे काम डॉ. कसबेनी आपले विचार मांडून केले. व्यक्तीगत जीवनात त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानीत केले गेले. त्यांच्या लिखानास वेगवेगळ्या संस्थांमार्फत, महाराष्ट्र शासना मार्फत गौरविण्यात आले आहे. याबरोबरच अनेक ठिकाणी संमेलनांचे अध्यक्षपद डॉ. रावसाहेब कसबे यांनी भूषविलेले आहे.

भारताच्या आणि ओघानेच महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात अस्पृश्यता, वर्णव्यवस्था, स्त्रियांचे सामाजिक स्थान या प्रश्नांना महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. सध्य परिस्थितीत सुद्धा जातीव्यवस्थेचा प्रश्न कळीचा बनला आहे आणि जेथे जातीव्यवस्थेच्या प्रश्नांची चर्चा होते तेथे 'आंबेडकरवाद' येतो. डॉ. रावसाहेब कसबेंनी अशा विविध प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी मार्क्सवाद, आंबेडकरवाद इत्यादी विचारसरणींचा आधार घेतला आहे. प्रामुख्याने या निमित्ताने आंबेडकर विरूद्ध मार्क्सवाद अशी वैचारिक संघर्षाची सुरूवात जेथे जेथे आपणांस पहावयास मिळते तेथे डॉ. रावसाहेब कसबे यांनी मांडलेली भूमिका अभ्यासण्यास संधी मिळते. माणूस हा अंतर्बाहय बदलला पाहिजे यावर ते आपल्या लिखानातून भर देतात. त्यांच्या मते माणूस अंतर्बाहय बदलला तरच उदयाच्या सर्वव्यापी पुरोगामी आंदोलनाला जन्म देऊ शकेल. ती एक चळवळ बनू शकेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तिलाच धार्मिक क्रांती म्हटले होते आणि यावरच राजकीय क्रांती यशस्वी होऊ शकते व टिकू शकते.[२] या विचारांना आधारभूत मानून डॉ. रावसाहेब मांडताना दिसतात.

थोडक्यात आजच्या काळात महाराष्ट्राबरोबरच भारतात सुद्धा 'आंबेडकर' आणि 'मार्क्स' यांची चिकित्सा टाळता न येण्याजोगी निकड जाणवते आहे. ती या दृष्टीकोणातून

डॉ. रावसाहेब कसबे यांनी आपले विविध ग्रंथ लिहून, चळवळीस वैचारिक खाद्य पुरवून विशद केली असून सध्याच्या मानवी विकासाच्या संधीकालात जीवन जगण्यातील नवा अर्थ कशाप्रकारे प्रतिपादन करू शकेल याचे विवेचन केले आहे, करत आहेत.

## २.२ डॉ. रावसाहेब कसबे—एक विचारवंत आणि समाजसुधारक

डॉ. रावसाहेब यांचा व्यक्तीगत जीवनाचा परिचय करून घेताना त्यांच्या विचारांचा पाया काय असू शकतो याचा अंदाज येतो. प्रतिकूल परिस्थिती असताना परिस्थितीला तोंड देत देत आंबेडकरी चळवळीला पुढे नेण्याचे काम डॉ. कसबेंनी केलेले आहे. शाळा महाविद्यालयामध्ये शिक्षण घेत असल्यापासून विविध विषयांवर टीका—टिप्पणी करणे, विविध विषयांवर आपले स्वतंत्र विचार मांडणे, विद्यार्थ्यांचे नेतृत्व करणे इत्यादी स्वरूपाचे छोटे—मोठे कार्य त्यांनी लहान वयापासूनच केले. त्यांच्याबद्दल विचार मांडताना ते एक विचारवंत कसे होते, अभ्यासक कसे होते आणि चिकित्सक विश्लेषक कसे होते याबरोबरच त्यांनी समाजसुधारणेबाबत काय विचार मांडले व ते कसे अंमलात आणले याविषयी जाणून घेणे आवश्यक आहे. त्यांची या दृष्टीकोणातून ओळख करून घेण्यासाठी पुढीलप्रमाणे काही दाखले पहावे लागतील. पुढील काही संदर्भ पाहिले तरच आपणास त्यांची एक विचारवंत किंवा एक समाजसुधारक म्हणून ओळख होईल.

डॉ. कसबे यांनी 'डॉ. आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना' हे पहिले पुस्तक लिहिले. हा ग्रंथ बाबासाहेब आंबेडकरांच्या राज्यघटनेसंबंधी भारताच्या सामाजिक इतिहासाच्या पार्श्वभूमीवर चर्चा करणारा आहे. एक विश्लेषक म्हणून त्यांनी २००० सालापर्यंत झालेल्या प्रमुख घटना दुरूस्त्या आणि संवैधानिक प्रश्नांवर सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या प्रमुख निकालांचे सविस्तर विश्लेषण केले आहे. एक सामाजिक जबाबदारी म्हणून त्यांनी या ग्रंथाचे विश्लेषण केले आहे. एक समाजसुधारक म्हणून त्यांचे पुढील

विचार महत्त्वाचे वाटतात. "जातीसंस्थेत वर्ग निर्माण होताना व्यक्तीगत व जातीय पातळीवरील महत्त्वाकांक्षा वाढू लागल्या त्यामुळे भारतीय राजकारणाला जातीय पाया मिळाला. या जातीय पायामुळे दलित चळवळींना विघटित करण्यास सुरूवात केली."[३] प्रतिगामी आणि पुरोगामी यांचे विषयी बोलताना गांधीवादी आणि समाजवादी हे प्रतिगामी कसे बनले. प्रतिगाम्यांची व्यूहरचना कशी होती तसेच आजही आंबेडकरवादयांना आंबेडकरवादाची व्याख्या करण्यात यश आले नाही. याबद्दल डॉ. कसबेंनी जे लिखान केले त्यात सामाजिक बांधिलकी दिसते, एक विचारवंत दिसतो. एक समाजसुधारक चळवळीमध्ये योगदान देणारे विचारवंत म्हणून आपणास याच पुस्तकातील पान नं. ११ वर त्यांनी जे विचार मांडले यावरून आपणास ते एक सुधारक आहेत हे सिद्ध होते. त्यांच्या मते, "विरोधी विचारांचा मुकाबला पहिल्यांदा विचारांनीच करायचा असतो. त्यानंतर त्याविरोधी आणि आपल्या बाजूने जनमत घडविण्यासाठी प्रबोधन करावे लागते. त्या जनमतातून लाभलेला जनाधाराच त्या विचारांचा व्यवहारात पराभव करीत असतो. म्हणूनच कोणत्याही चळवळीत विचारवंत आणि लोकनेते यांच्यात सुसंवाद असावा लागतो. केवळ विचार जसे वांझ ठरतात तसेच विचारहिन बनून भरकटत जातात. विचारांना चळवळी सर्जनशील बनवितात आणि विचार चळवळींना अपेक्षित दिशा देण्याचे काम करीत असतात. वरील पथ्ये ज्या चळवळी पाळतात त्या संघटित, गतिमान बनतात. त्या चळवळी त्यांच्याकडे दुर्लक्ष करतात. त्या विघटित व दिशाहीन आणि विकलांग बनतात."[४] डॉ. कसबे या चळवळीबाबत विश्लेषण करताना भारतातील उजव्या शक्तींची वाढ आणि डाव्या शक्तींचे दौर्बल्य याची कारणे या पथ्यात शोधली पहिजेत असेही करतात. यावरील देखील डॉ. कसबेंचे चिंतन कसे आहे, ते एक समाजाचे नेते, सुधारक कसे आहेत हे समजते.

एखाद्या परिस्थितीविषयी एखाद्या लेखकाने विचार मांडले असतील तर त्याचे चिकित्सक विश्लेषण करण्याची डॉ. रावसाहेब कसबेंची असून याचे दर्शन १९७५ ते ८५ च्या दरम्यान जे लिखान केले त्यावरून दिसून येते. डॉ. कसबेंच्या मते अरूण शौरी या पत्रकाराला भारतीय राज्यघटनेचा इतिहास ज्ञात आहे असे त्यांच्या लिखानात कुठेही स्पष्ट होत नाही असे स्पष्ट विवेचन कसबेंच्या लिखानात दिसून येते. जाती संस्थेचा उगम भारतीय इतिहासात कसा झाला यासारख्या एकाही प्रश्नाला स्पर्श केला नाही असे स्पष्ट चिंतन कसबेंनी आपल्या लिखानात शौरींबद्दल केले आहे.

कॉ. किशोर ढमाले यांनी आपल्या मुलाखतीमध्ये महाराष्ट्रातील १९६० च्या अगोदरची स्थिती पाहिली तर कम्युनिस्ट व दलित चळवळी वेगवेगळया होत्या, एकमेकांना शत्रू मानत होत्या या पार्श्वभूमीवर डॉ. कसबे यांनी व्यामिश्र भूमिका मांडून या विचारांची कोंडी फोडली. याचा आवर्जून उल्लेख केला. जोपर्यंत दलितांच्या संपूर्ण चळवळी आर्थिक पायावर उभ्या राहत नाहीत तोपर्यंत सामाजिक–आर्थिक परिवर्तनासाठी आवश्यक असणारा संघटित दबाव सरकारवर आणता येणारी नाही असे कसबे ठामपणे मांडतात. यातून रावसाहेब कसे यांच्यातील 'चळवळ्या' कार्यकर्ता दिसून येतो. एका बाजूला विचारवंत म्हणून त्यांचे चिंतन अभ्यासत असतानाच त्यांच्यातला 'कार्यकर्ता' दृष्टीस पडतो. "धर्म: मानवी संस्कृती व विकास" या पुस्तिकेमध्ये डॉ. कसबेंनी धर्माला राजकीय सत्ताप्राप्तीचे आणि इतर धार्मिक समुदायावर वर्चस्व प्राप्त करण्याचे हत्यार मानले जात आहे हे स्पष्ट करताना धर्माच्या दोन भूमिकांबाबत स्पष्ट विवेचन केले. माणसांना जगण्याचे प्रयोजन शिकविणारी भूमिका आणि राजकीय तत्त्वप्रणालीची जागा घेण्याची धर्माची भूमिका महत्त्वाची मानून त्याबद्दल त्यांचे चिंतन मानवाबद्दल, त्याच्या संस्कृतीबद्दल महत्त्वाची आहेत. 'झोत' या ग्रंथाचे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने दहन केले त्याचे मुख्य कारण त्यांच्या चिंतनाचा "ॲंगल" होय.

"आपण क्रांतीसाठी कामगार, शेतकरी यांच्या संघटना उभ्या केल्या. त्यांना पुरोगामी विचार दिले. परंतु या वर्गाचे वैचारिक पोषण एकेकाळी ग्रामदेवतांनी आणि संतांच्या अभंगांनी भजनांतून, कीर्तनांतून, प्रवचनांतून परंपरा टिकविण्यासाठी झालेले होते हे आपण विसरून गेलो. याच अभंगाची परंपरा मोडण्यासाठी, प्रत्यक्ष जगण्यातील संघर्षाचे भान येण्यासठी उपयोग करता येऊ शकतो, याकडे आपले लक्षच गेले नाही म्हणूनच आपल्या देशातील पुरोगामी चळवळ नेहमीच दुभंगलेली, द्विधा मनस्थितीत राहिली." [५] माणूस आपले जीवन जगत असताना त्याने कोणत्या मूल्यांना, तत्त्वांना महत्त्व दिले पाहिजे याविषयी अखिल मानव जातीच्या कल्याणाचा विचार करून त्याबद्दलचे चिंतन सुधारणा, विकास या दृष्टीकोनातून महत्त्वाचे वाटतात. सैद्धांतिक पातळीवरचे विचार प्रत्यक्ष जीवन जगण्यामध्ये कसे उपयोगी पडावेत याविषयी विचार मांडून त्यांनी समाजसुधारकाची भूमिका मांडली आहे.

हिंदुत्ववादी लेखकांनी हिंदू—मुस्लिम प्रश्नांची आणि हिंदुराष्ट्रवादाची ज्या पद्धतीने मांडणी केली. त्याचा मूळ स्त्रोत तपासून त्या प्रश्नांची मुळातूनच चिकित्सा करण्याच्या हेतूने डॉ. रावसाहेब कसबे यांनी १९९४ मध्ये "हिंदू— मुस्लिम प्रश्न आणि सावरकरांचा हिंदू राष्ट्रवाद" हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथामध्ये प्रा. स. ह. देशपांडे यांच्या 'सावरकर ते भा. ज.प.' या पुस्तकाचा चांगलाच समाचार घेतला. "ज्या पूर्वसूरींच्या लिखानाचे संदर्भ आपण वापरतो त्या पूर्वसूरींच्या विचारांना संदर्भाची एक साखळी असते. त्या संदर्भ साखळीचा वापर वैचारिक लिखान करणाऱ्याने वैचारिक शिस्त पाळून करावयाचा असतो. ती शिस्त स. ह. देशपांडे यांनी मोडली आहे. डॉ. आंबेडकरांच्या 'बहिष्कृत भारतांतील अनेक उतारे देऊन स. ह. नी ही शिस्त कशी मोडली आहे याची उदाहरणे डॉ. कसबे यांनी दिली आहेत. साखळकरांनी केलेल्या परीक्षणामध्ये डॉ. कसबे सामाजिक भान ठेवून एक विचारवंत म्हणून चिंतन करतात.

मा. उत्तम कांबळे यांनी डॉ. रावसाहेब कसबे यांची जी मुलाखत "कसबे यांचे क्रांतिकारी चिंतन" या शीर्षकाखाली प्रसिद्ध करण्यात आले. पुस्तकाच्या मलपृष्ठावर मा. उत्तम कोबंळे यांनी एक डॉ. कसबेंबद्दल थोडक्यात मत प्रदर्शित केले ते असे की, "प्रा. रावसाहेब कसबे हे महाराष्ट्रातील विचारवंतातील एक प्रमुख नाव. त्यांच्या 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना' या ग्रंथाने विचारी वाचकांना एक नवी दृष्टी दिली तर 'झोत' ने महाराष्ट्रात एक वैचरिक वादळ निर्माण केले. त्यांच्या 'आंबेडकरवादा'त बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार आणि चळवळीची सूत्रबद्ध मांडणी आहे आणि 'दलित चळवळीची वाटचाल' ही दलित आणि पुरोगामी चळवळींना या संक्रमणावस्थेत दिग्दर्शन करणारी आहे.

'आंबेडकर आणि मार्क्स' हा त्यांचा ग्रंथ गेल्या पंधरा वर्षातील या विषयावरील अभ्यास आणि चिंतनाचा परिपाक आहे. त्यांच्या 'आंबेडरवादः तत्त्व आणि व्यवहार' या ग्रंथात त्यांनी डॉ. आंबेडकरांच्या विचारांची चर्चा वरच्या पातळीवर नेली आहे. डॉ. रावसाहेब कसबे यांच्या लिखानात मूलभूत चिंतन असते याचा अनुभव वाचकांना त्यांच्या प्रत्येक पुस्तकात वाचताना येईल. यावरून आपणास डॉ. रावसाहेब कसबे हे अभ्यासक, विश्लेषक आणि समाजसुधारक कसे आहेत याचा परिचय होतो. डॉ. कसबेंनी आपिल्या चिंतनात नव्या समाजाचे चित्र रंगविले आहे हे चित्र प्रत्यक्षात उतरविण्यासाठी त्यांच्या कुवतीप्रमाणे योगदान देईल असेही ते म्हणतात. "एक सामान्य माणूस जेवढे योगदान देऊ शकतो तेवढे सर्वशक्तीनिशी देऊ शकेन. या देशातील प्रागतिक शक्ती माझ्याकडून माझ्या कुवतीप्रमणे जे योगदान मागतील ते देईन. आजवर ज्यांनी ज्यांनी ते मागितले त्या सर्वांना माझ्या कुवतीप्रमाणे देत गेलो. शरीर साथ देईल तोपर्यंत त्यात खंड पडणार नाही. अपेक्षा एकच आहे, देशातील सर्व प्रागतिक, धर्म निरपेक्ष, लोकशाहीवादी आणि समतावादी शक्तीनी लवकरात लवकर एक होण्याची प्रक्रिया सुरू करावी."

समाजाबाबतची खरी तळमळ आणि नव्या समाजाच्या निर्मितीची स्वप्न पाहणारी परिस्थिती तसेच एक कार्यकर्ता, समाजसुधारक म्हणून 'समाजनेता' ही भूमिका बजावली आहे.

## २:३ डॉ. रावसाहेब कसबे यांच्या वैचारिक भूमिकेवर पडलेला प्रभाव–

अखील भारतीय समाजवादी अध्यापक सभा स्थापना अधिवेशनातील अध्यक्षीय भाषणात नाशिक येथे २९ सप्टेंबर २००२ रोजी डॉ. रावसाहेब कसबे यांनी ज्या 'शिक्षणाची आव्हाने' चर्चिली आहेत त्याची एक छोटी पुस्तिका तयार केली व प्रकाशित केली. त्यामध्ये महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाबाबत ज्या अडचणींची चर्चा केली, उपाययोजना व महत्त्व सांगितले या विचारांचा परिणाम डॉ. कसबेंच्या विचारावर झालेला दिसतो. ते म्हणतात, "शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे एक प्रभावी साधन आहे. परंतु समाज परिवर्तनाची दिशा कोणती असावी हे निशिचत केल्याशिवाय त्याचा अचूक आणि परिणामकारक उपयोग करून घेता येत नसतो. सामाजिक बांधिलकी नसलेल्या दिशाहीन राष्ट्रतील शिक्षण माणसाला स्वार्थी, कुपमंडूक, अहंकारी आणि मूर्ख सुद्धा बनवू शकते. म्हणूनच शिक्षण हे दुधारी हत्यार आहे. त्याचा उपयोग समाज विकासाच्या दिशेने विधायक मार्गाने करायचा की स्वार्थ साधण्यासाठी विध्वंसक मार्गाने करायचा हे ठरविणारी प्रभावी यंत्रणा राष्ट्राजवळ असली पाहिजे. बर्ट्रांड रसेल यांनी म्हणूनच एकदा अतिशय उद्विग्न होऊन अशा स्वार्थी विद्याविभूषितांबद्दल म्हटले होते, "Men are born ignorant not stupid; they are made stupid by education" [६] डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षकांसाठी, शिक्षकांबद्दल व शिक्षण व्यवस्थेबाबत जे मत नोंदविले आहे त्याचाच आधार डॉ. रावसाहेब कसबेंच्या विचारांना वाटतो. सामाजिक बांधिलकी ठेवून समाजवादी विचारांचा पगडाही त्यांच्या विचारांत दिसून येतो. तो असा की, ते म्हणतात "ज्या क्षणी प्राचीन भारतातील विद्याविभूषित वर्ग स्वार्थी बनला त्याक्षणी

भारतातील शिक्षण हे सामाजिक आर्थिक पिळवणूकीचे साधन बनले." [७] कार्ल मार्क्सने आपले आयुष्य आर्थिक सामाजिक पिळवणूकीपासून मानव मुक्त करण्यासाठी खर्च केले. त्यानुसार समाजात कोणत्याही 'नाहीरे' घटकाची सामाजिक आणि आर्थिक पिळवणूक होता कामा नये असे डॉ. कसबेंना वाटते. यावरून डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कार्ल मार्क्स, महात्मा फुले यांच्याच तत्त्वज्ञानात डॉ. कसबेंच्या मतांची पाळेमुळे आढळतात. डॉ. कसबें स्वत: दलित कुटुंबात जन्माला आले त्यामुळे समाजातील जातीयतेचे चटके त्यांनी अनुभवलेले आहेत. त्यातही जो वर्ग शिकला, विद्वान झाला तो देशाला आणि भारतीय समाजाला कसा दगा देवू शकतो याचीही चर्चा डॉ. कसबे करतात. ते म्हणतात की, "आपल्या देशातील ब्राम्हणांची सारी विद्वत्ता वर्ग आणि जातींच्या समर्थनासाठी वापरली गेली आणि क्षत्रियांचे सर्व सामर्थ्य आणि शक्ती, जाती आणि वर्ण टिकविण्यासाठी पणाला लावले गेले. भारतात शक, कुशााण, हून यांच्यापासून ते ब्रिटिशांच्या आक्रमणापर्यंत या वर्गाकडून हेच प्रयत्न चालू होते. ब्राम्हणांची विद्वत्ता आणि क्षत्रियांचे सामर्थ्य जर भारतीय बहुजन समाजाच्या विकासाठी खर्च झाले असते तर आपण आज जगातील एक महासत्ता असतो." [८] डॉ. कसबेंमध्ये 'क्रांतकारी'पणा प्रकर्षाने जाणवतो. भारतातील, महाराष्ट्रातील बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी म. फुले, राजर्षि शाहू महाराज, बाबासाहेब आंबेडकरांशिवाय पर्यायच नाही. यांनी सुरू केलेल्या प्रबोधनाच्या चळवळींचा प्रभाव डॉ. कसबेंवर प्रकर्षाने झालेला आहे. याबरोबरच ब्रिटिश साम्राज्यशाहीने हा देश आधुनिक बनला यालाही ते मान्यता देतात. भारतीय राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये १४ वर्षाच्या आतील सर्व मुलामुलींना शिक्षण मोफत व सक्तीचे करण्याचे अभिवचन भारतीयांना दिले. याचा डॉ. कसबे आपल्या लिखानात उल्लेख करतात म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राज्यघटनेमध्ये जी तरतूद करून घेतली तिचाही प्रभाव डॉ. कसबेंच्या वैचारिक भूमिकेवर पडला. बिहारमध्ये शंभरातले ५३ पुरुष आणि शंभरापैकी

६७ स्त्रिया आजही निरक्षर आहेत. ही बाब अगदी शरमेची असल्याची तळमळ डॉ. कसबेंना वाटते. यावरून बहुजन समाजाला शिक्षण मिळणे. सामाजिक न्यायाच्या दृष्टीकोनातून समाजातील स्त्री–पुरुषांना समान हक्क शिक्षणाबाबत असला पाहिजे.

एरिक फ्रॉम यांनी शिक्षण क्षेत्रात केलेली क्रांती महत्त्वाची आहे. त्यांनी education (शिक्षण) चा अर्थ 'e-ducere', 'to bring out', that which is within man सांगितला. डॉ. कसबे असे मानतात की, माणसाच्या 'माणूस' म्हणून ज्या गरजा असतात त्या पूर्ण करण्याचे एक साधन म्हणजे शिक्षण असते. माणूस विकृतीपासून वाचविण्यासाठी शिक्षणाचा आधार घेतो. म्हणजे समाजाविकासाठी एरिक फ्रॉमचे विचार किती महत्त्वाचे वाटतात हे डॉ. कसबेंच्या विचारांवरून दिसून येते.

पदवी आणि पदव्युत्तर मराठी अभ्यासक्रम: स्वरूप आणि अपेक्षा या विषयावर संगमनेर महाविद्यालय संगमनेर दि. २७/७/२००३ रोजी झालेल्या चर्चासत्राचा समारोप डॉ. कसबे यांनी जे भाषण केले ते पुस्तकरूपाने प्रसिद्ध करण्यात आले. "मराठी भाषेच्या उज्जवल भवितव्यासाठी" असे शीर्षक असलेल्या पुस्किामध्ये दिलेले संदर्भ पाहता एरिक फ्रॉम यांच्या विचारांचे प्रतिबिंब दिसते. संत तुकाराम महाराज यांच्या अभंगाचा प्रभाव डॉ. कसबेंवर झालेला दिसतो. जीवनाचे तत्त्वज्ञान सांगताना व्यक्तीचे संपूर्ण जीवन म्हणजे दुसरे तिसरे काहीही नसून स्वत:ला माणूस म्हणून जन्म देण्याची ती एक अखंड प्रक्रिया आहे. याचेही महत्त्व विशद करताना एरिक फ्रॉमने लिहिलेल्या Man for Himself आणि The sane Society या दोन्ही ग्रंथांचा आधार घेतला. सर जे. जी. फ्रेजर यांनी लिहिलेल्या social change in Modern India हा ग्रंथ आज उपेक्षित झाला. दलित साहित्याचा अभ्यास करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने अमृतलाल नागर यांनी लिहिलेली 'नाचौ बहुत गोपाल' ही कादंबरी वाचलीच पाहिजे असा आग्रह धरतात.

"धर्म: मानवी संस्कृती व विकास" ही पुस्तिका म्हणजे ऑक्टोबर २००३ मध्ये श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर येथे कॉ. अवि पानसरे स्मृती व्याख्यानमालेत डॉ. कसबे यांनी दिलेले व्याख्यान आहे. यात ते म्हणतात "आज आपल्याला स्वत:ची ओळख करून घेण्यासाठी मानव जातीच्याच जन्माची जीवघेणी कहाणी समजून घ्यावी लागेल. चार्लस डार्विनने १८७२ साली 'The Descent of Man' हा ग्रंथ लिहून उत्क्रांतीचा सिद्धांत मांडला."

'मानव आणि धर्मचिंतन' हा ग्रंथ लिहिताना प्राचीन धार्मिक साहित्यावर अनेक विद्ववानांशी चर्चा केली. अनेक विद्वानांच्या चर्चेतून त्यांनी विचार मांडले. ते म्हणतात, "ज्याला हिंदू लोक ज्ञानाचे भांडार म्हणतात त्या ऋग्वेदात तर माणसाची उत्पत्ती कशी झाली हे सांगितलेलेच नाही. त्यांच्यात वर्णाची, जातींची उत्पत्ती कशी झाली हे सांगितलेले आहे. ब्राम्हण परमेश्वराच्या मुखातून तर क्षत्रिय त्यांच्या बाहूतून. वैश्य त्यांच्या जांघेतून तर शूद्र त्यांच्या पायातून उत्पन्न झाले असे हे उत्पत्तीशास्त्र आहे. काशीतल्या काही पंडितांच्या जेव्हा मी हे लक्षात आणून दिले की ऋग्वेद माणसाचा विचार करतच नाही आणि त्यानंतरची सारी धर्मशास्त्रे तर फक्त वर्ण किंवा जातींचाच विचार करतात तेव्हा ते पंडित बरेच अस्वस्थ झालेले दिसले." यावरूनही डॉ. कसबेंच्या विचारांत कोणकोणाचे योगदान आहे हे स्पष्ट कळते. माणसाने फक्त बाहेरून बदलून चालत नाही तर त्याने आतूनही बदलले पाहिजे. ज्याक्षणी माणूस आतून नि बाहेरून बदलेल त्याक्षणी तो सर्वव्यापी पुरोगामी आंदोलनाला जन्म देऊ शकेल. ती एक चळवळ बनू शकेल. मध्ययुगीन संतांच्या चळवळीचे आधुनिक उत्क्रांत रूप असू शकेल. "बाबासाहेब आंबेडकरांनी तिलाच धार्मिक क्रांती म्हटले होते. तिच्या पायावरच राजकीय क्रांती यशस्वी होऊ शकते आणि टिकाऊ बनू शकते असे त्यांचे प्रतिपादन होते. न्यायमूर्ती रानडेसुद्धा हीच गोष्ट वेगळ्या शब्दांत सांगत होते. रशियात या धार्मिक क्रांतीशिवाय राजकीय क्रांती

केली गेली म्हणून ती अल्पजीवी ठरली.” [९] मानवाबाबतचे तत्त्वज्ञान, पुरोगामी विचार त्यांनी मांडताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डार्विन आदींच्या विचारांना पायाभूत मानले आहे. त्यांनी धर्मचिंतन करताना मानवी संस्कृतीचा संबंध जोडण्याचा प्रयत्न केला आहे. ते म्हणतात, “आपण संस्कृतीचा संबंध धर्माशी, कर्मकांडाशी जोडून फार मोठी चूक केली आहे. धार्मिक माणसाला आपण फार सुसंस्कृत आणि नीतिमान असण्याचा अहंकार त्यातूनच जन्माला आला. हाच अहंकार जेव्हा विशिष्ट धर्मसमूहात एकत्र होतो तेव्हा आपण इतरांपेक्षा वेगळे, श्रेष्ठ,सुसंस्कृत असल्याचा अभिमान पसरतो.”[१०] अखिल मानव जात एकच असून श्रेष्ठ—कनिष्ठ असे भेद त्यात नाहीत. परंतु चातुवर्ण्यव्यवस्था जातिव्यवस्थेने या अहंकाराची जोपासना करून माणसाला सत्यापासून दूर नेले. डॉ. कसबे यांनी धर्म चिकित्सा करताना विविधांगांनी केली. त्यात त्यांनी लालकृष्ण अडवाणींच्या रथयात्रेचा संदर्भ देवून प्रत्यक्ष हालाखीचे जीवन जगणाऱ्या वडार समाजाच्या ‘त्या’ बाईच्या कथेचा संदर्भ दिला आहे. माणूस कितीही मोठा झाला तरी अखील मानवजातीबद्दल सुखदु:खाबद्दलच्या संवेदना आपल्या मनात निर्माण होणार नाही तोपर्यंत आपला अहंकार कमी होणार नाही. धर्माचा सुद्धा आपण चुकीचा अर्थ कसा लावतो याचे उदाहरण डॉ. कसबे यांनी दिले. ते म्हणतात ‘धर्म ही अफूची गोळी आहे’ या वचनाचा आपण चूकीचा अर्थ लावलेला आहे हे स्पष्ट करताना तुकारामांच्या ‘गाथा’चा प्रचंड प्रभाव पडला आहे. या गाथेचा उपयोग प्रत्यक्ष जगण्यातील संघर्षाचे भान येते हे सांगताना डॉ. बांबेडकरांनी सांगितलेला बुद्ध धम्म महत्त्वाचा वाटतो. धर्मचिंतन करताना नीति, विवेक, विज्ञान, समता, स्वांतत्र्य, बंधुता या धर्माच्या कसोटया सांगितल्या. या कसोटयांच्या आधारे धर्मचिकित्सा करणे आवश्यक आहे. तरच माणसांतला ‘गुलाम’ नष्ट होईल, मानवतेची उंची वाढेल. डॉ. कसबे यांनी धर्मचिंतन करताना, संस्कृतीबद्दल लिहिताना “धर्माचा उद्देश या जगाच्या उगमाचे स्पष्टीकरण देणे हा आहे. परंतु धम्माचा उद्देश मात्र जगाची पुनर्रचना करणे हा

आहे.” असे बाबासाहेबांनी म्हटले आहे. यावरून बुद्ध धम्माचा प्रभाव डॉ. कसबेंवर कसा पडला हे त्यांच्या लिखानात प्रकर्षाने जाणवते.

अखिल भारतीय रिपब्लिकन पक्ष हे महाराष्ट्रातील जनतेकडे असलेले महत्त्वाचे हत्यार (राजकीय) आहे. हा पक्ष महाराष्ट्राची राजकीय समीकरणे बदलू शकतो. डॉ. कसबे म्हणतात या पक्षाला राजकीय परिणामाबरोबर सामाजिक आणि सांस्कृतिक परिमाणेही लाभलेली आहेत. पुढे असेही म्हणतात की या रिपब्लिकन पक्षाचे उद्दिष्टे मर्यादित असल्याने इतर राजकीय पक्षांप्रमाणे या पक्षाला जनाधार वाढविण्यासाठी खास प्रयत्नांची गरज वाटत नाही. बाबासाहेब आंबेडकरांना मानवी जीवनाचा सामग्र अभ्यास करावयाचा असल्यानेच त्यांनी अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, मानववंशशास्त्र, इतिहास, धर्मशास्त्र, तत्त्वज्ञान, साहित्य आणि विज्ञान या सर्वांचा अभ्यास केला. त्यामुळे डॉ. कसबेंचा डॉ. बाबासाहेबांकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदललेला दिसतो. ते म्हणतात की, बाबासाहेबांनी ज्ञानक्षेत्रातील आपला दरारा टिकून राहण्यासाठीच रिपब्लिकन पक्षाच्या हातात संरक्षक कवच दिले. “बाबासाहेबांचा ॲनिहिलेशन ऑफ कास्ट हा दस्तऐवज कम्युनिस्ट आणि समाजवादी विचारवंतांच्या नजरेतून निसटला हे त्यांचे दुर्दैव होते.”[११] जातीसंस्थेने केवळ अस्पृश्यांच्याच जीवनाचा विध्वंस केला असे नाही तर तिच्यामुळे संपूर्ण भारत देशच उध्वस्त झालेला आहे. जाती नष्ट करण्यासाठी आंतरजातीय विवाहांना बाबासाहेबांनी जे प्रोत्साहन दिले त्याचा विशेष उल्लेख डॉ. कसबे आपल्या लिखानात करतात. म्हणजेच डॉ. कसबे यांच्या विचारांवर बाबासाहेबांच्या ‘बहिष्कृत हितकारीणी सभा, भारतीय रिपब्लिकन पक्ष’ यांचा विशेष प्रभाव पडलेला दिसतो. डॉ. कसबे पुणे कराराचे समर्थन करत असताना असे म्हणतात की, “पुणे कराराचा तपशील ही त्या अर्थाने बाबासाहेबांच्या राजकीय विचारसूत्राची विजयी पताका होती.” [१२] बाबासाहेबांनी घटना तयार केल्यानंतर जे मत मांडले त्याचा विशेष उल्लेख डॉ. कसबे आपल्याला

लिखानात करतात तो असा की, “प्रत्यक्ष झालेली स्वतंत्र भारताची राज्यघटना काहीशी वेगळी होती. तिच्यातील अनेक तरतुदी बाबसाहेबांच्या मनाविरूद्ध झालेल्या आहेत. हे खरे; परंतु बहुमताच्या पडलेल्या मर्यादा होत्या.”[१३]

## २:४ महाराष्ट्रातील सामाजिक चळवळी आणि राजकीय विचारसरणीचा डॉ. कसबे यांच्यावर पडलेला प्रभावः—

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वावर डॉ. कसबेंची अपार निष्ठा असून डॉ. आंबेडकरानंतर रिपब्लिकन पक्षाला बाबासाहेबांप्रमाणे 'मास लिडर' जरी मिळाले नसले तरी काही लोकनेत्यांचा ते उल्लेख आवर्जून करतात. “बाबासाहेबानंतर आलेले दादासाहेब गायकवाड एक मास लिडर, लोकनेते होते. त्यांनी १९६४—६५ साली केलेल्या भूमिहिनांच्या सत्याग्रहात जेवढे लोक तुरुगांत नेले तेवढे क्वचितच कोणत्या राजकीय आंदोलनात तुरुगांत गेले असतील. बॅ. खोब्रागडे आणि रा. सु. गवई यांनी अनुक्रमे राज्यसभा आणि विधानपरिषद उपसभापती/सभापती म्हणून उत्तम काम केलेले आहे. गवईंना तर आमच्या पिढीने विदर्भ केसरीच्या रूपात संघर्षरत असलेले पाहिले आहे. ॲड. बी. सी. कांबळे यांचे विविधमंडळातील काम दीर्घकाळ स्मरणात राहील असेच होते. ढाले — ढसाळ हे विद्रोही लेखक काही कमी ताकदीचे नव्हते. नामांतरासारखा लढा दीर्घकाळ चिवटपणे लढविणारे आणि त्यात यश संपादन करणारे रामदास आठवले हीं दादासाहेब गायकवाडांच्या काळातील स्मूती जागृत व्हाव्यात इतके गतिमान होते. नामांतराच्या लढयात तन—मन—धनाने स्वत:ला झोकून देणारे आणिा ज्यांच्या ओठावरील हसू निदान पूर्ण एक दशक मावळून गेलेले आणि डोळे अंगार बनलेले प्रा. जोगेंद्र कवाडे काही कमी निष्ठावंत नाहीत. आपल्या राजकारणाची सुरूवात समाज आंदोलनापासून करणारे आणि जनतेच्या मूलभूत प्रश्नांना हात घालणारे त्यााठी लॉगमार्च काढणारे ॲड.

प्रकाश आंबेडकर रिपब्लिकन पक्षाचा जनाधार जातीच्या मर्यादा बाहेर वाढविताना दिसत आहेत. निदान आज तरी आंबेडकर आणि आठवले हे दोघेच जनाधार असलेले नेते आहेत हे अनेकदा सिद्ध झालेले आहे.” [१४] डॉ. आंबेडकरांनी सुरू केलेले सामाजिक चळवळ, तिचे भविष्य कसे असेल आणि या चळवळींचा कार्यक्रमाचा महाराष्ट्राच्या विचारसरणीवर प्रभाव कसा पडू शकेल याविषयीचे चिंतन डॉ. कसबे करताना कोणत्या नेत्याला जनाधार मिळू शकतो कोणत्या नेत्याने, ‘मास लिडर’ने कशी चळवळ केली या विषयीचे विश्लेषण करतात. ते म्हणतात की रामदास आठवले आणि प्रकाश आंबेडकर हे दोन नेते एकत्र आले तर, एकत्र राहिले तर किंवा एक दिलाने चळचळ विकसित केली तर भारतीय रिपब्लिकन पक्ष एक सत्ताधारी शक्ती बनेल आणि खऱ्या अर्थाने बहुजन समाज ‘राजकीय’ बनेल. १९५६ च्या सुमारास बहूजन समाज हितसंबंध आणि आकांक्षांमुळे संघटित होता. नेत्यांमध्ये स्पर्धा नव्हती त्यामुळेच महाराष्ट्रातील राजकीय पक्षांवर रिपब्लिकन पक्षाचा प्रभाव होतो.

जनतेच्या मूलभूत प्रश्नांवर आंदोलन छेडले तर माणसे जातीपातीचा विचार न करता, वर्गीय भूमिकेवर राजकीय प्रक्रियेत सहभागी होऊ शकतात. दलित साहित्याचा उल्लेख डॉ. कसबे आवर्जून करतात. याचे कारण असे की, प्रत्यक्ष जीवनातील घुसमटीला लेखनाच्या माध्यमातून व्यक्त करण्याचे महत्त्वाचे काम या दलित साहित्यिकांनी केले. त्यांच्या साहित्य आणि वाङ्मयाचा प्रभाव डॉ. कसबेंच्या वैचारिक भूमिकेवर झालेला दिसून येतो. यामध्ये प्रामुख्याने बाबुराव बागुल, दया पवार, नामदेव ढसाळ, अर्जुन डांगळे, यशवंत मनोहर आणि गंगाधर पानतावणे यांचा उल्लेख करता येतो. या साहित्याच्या माध्यमातून मोठी चळवळी उभी राहिली. आपली राजकीय विचारसरणी शुद्ध असावी. ‘राजकीय शील’ जर प्रत्येक सामाजिक गटाने अथवा राजकीय पक्षाने सांभाळले नाही तर राजकारणातील शेवट दुर्दैवी असतो. राजकारणाचा मार्ग हा संकटांनी भरलेला असतो.

जनतेचे मूलभूत प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी बहुजन समाजातील नेत्यांनी समर्थपणे मार्ग काढावा.

डॉ. रावसाहेब कसबे यांच्या विचारांवर आणि एकूण विचारसरणीवर अनेक लेखकांच्या विचारांचा, विचारवंतांचा आणि आलेल्या अनुभवांचा परिणाम दिसून येतो. ते म्हणतात, "माझे वडील बाबासाहेबांच्या चळवळीतील एक अशिक्षित सैनिक होते त्यांनी उभी हयात संकटांना आणि दारिद्रयाला तोंड देवून आम्हा मुलांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. आमच्याबद्दल खूप अपेक्षा बाळगल्या. भविष्याची सुंदर स्वप्ने पाहिली. त्यावेळी नोकरी मिळविण्याइतके शिक्षण झाले तरी त्यांनी आम्हाला नोकरही करू दिली नाही. काबाडकष्ट करून आम्हाला शिकवित राहिले. आज विद्यापीठीय शिक्षण संपवून नोकरी लागली. परंतु त्यापूर्वी ते कायमचे निघून गेले. ज्या दारिद्रयात जन्मले त्याच दारिद्रयात मरणाला सामोरे गेले. आईने त्यांना जन्मभर कष्ट उपसण्यात साथ दिली. आईवडिलांच्यासाठी काहीही करता आले नाही. ही आयुष्यभर टिकणारी वेदना सतत उरात सांभाळावी लागणार आहे म्हणून हा ग्रंथ त्यांनाच अर्पण केला आहे."[१५] आईवडिलांपासून घेतलेली प्रेरणा आलेले अनुभव आणि वाटयाला आलेली गरिबी यांमुळे डॉ. रावसाहेब कसबेंचे विचार क्रांतीकारी स्वरूपाचे आहेत.

## २:५ डॉ. रावसाहेब कसबे यांचा वैचारिक प्रवास आणि वैचारिक बैठक:–

डॉ. रावसाहेब कसबे यांनी महाविद्यालयीन जीवन सुरू होण्याअगोदरच मराठी साहित्याचा अभ्यास केला होता. ह. ना. आपटेंपासून ते पु. ल. देशपांडे पर्यंतच्या साहित्याचा प्रभाव डॉ. कसबेंच्या विचारांवर पडलेला दिसतो. महाविद्यालयीन जीवनात डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित 'ॲनिहिलेशन ऑफ कास्ट', कार्ल मार्क्स व फ्रेडरिक एंजल्सचे 'कम्युनिस्ट मेनिफेस्टो' तसेच आचार्य जावडेकरांचे 'गांधीवाद' या तीन पुस्तकांनी

रावसाहेबांना विशेष प्रभावित केल्याचे दिसते. दया पवार, गंगाधर पानतावणे, दादासाहेब रूपवते यांच्याबरोबर चर्चा करताना डॉ. रावसाहेब कसबे यांनी संघर्षाचे धडे घेतले. विचारांची बैठक तयार होताना त्याला संघर्षाची जोड असावी आणि ती याठिकाणी दिसते. आपल्या आयुष्यातील अनेक विषयांतील गाढे अभ्यासक, चिकित्सक यांच्या विचारामधील गहनता व फिरकी घेण्याची खुमखुमी यांचा परिणाम व प्रभाव डॉ. कसबे यांच्या विचारांवर पडलेला आहे.

कार्ल मार्क्स आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दोन्हीही युगपुरुष मानले जातात. डॉ. आंबेडकरांचे विचार आणि कार्ल मार्क्सचे विचार यातील प्रवाह वेगवेगळ्या दिशांना जाणारे आहेत. डॉ. कसबे स्वत: दलित कुटुंबात जन्मलेले असल्याने दलित चळवळी त्यांचे वैचारिक योगदान मिळालेच आहे. याबरोबरच त्यांचे मार्क्सवादी प्रवाहालाही मोठे योगदान लाभल्याचे अनेक ठिकाणी अनेक पुस्तकांतून, ग्रंथातून आणि वेळोवेळी प्रसिद्ध झालेल्या साहित्यावरून लक्षात येते. कार्ल मार्क्स आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना एकत्रित बांधणारे विचारवंत अगदी कमी असून त्यांच्यापैकी डॉ. रावसाहेब कसबे यांचे नाव प्राथम्याने घेतले जाते. डॉ. रावसाहेब कसबेंनी आपल्या लिखानात मार्क्स आणि आंबेडकर यांच्यातील दरी कमी करण्याचे अत्यंत महत्त्वाचे काम केले आहे. दलित चळचळीची पार्श्वभूमी असणाऱ्या कुटुंबात जन्म झाला म्हणून फक्त बाबासाहेबांच्या विचारांचा उहापोह न करता 'आंबेडकरी' चौकटीत राहून कार्ल मार्क्सवादविषयी विचार मांडणे म्हणजे जणू काही तारेवरची कसरतच मानावी लागेल.

अर्वाचीन ते आधुनिक भारतातील राजकीय विचारांचा विकास विशिष्ट प्रकारचा झालेला दिसून येतो. भारताच्या राजकीय विचारांच्या विकास प्रक्रियेत महाराष्ट्राचा वाटा मोठाच आहे असे म्हणावे लागेल. कारण याचा अनुभव आपणास राष्ट्रीय चळवळीमध्येही आला आणि सामाजिक सुधारणेची चळवळ, सशस्त्र क्रांतिकारकांची चळवळ, अस्पृश्यता

निर्मूलनाची चळवळ या चळवळीबरोबरच दलितोद्धारक चळवळीमध्ये वैचारिक पातळीवरील चळवळ ही तितकीच उपयुक्त ठरली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर या अव्वल दर्जाच्या राजकीय विचारवंतांसंदर्भात फक्त महाराष्ट्र नव्हे किंवा फक्त भारत नव्हे तर देशी—परदेशी अभ्यासकांनी मोलाचे काम केलेले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा वारसा घेवून ओपले वैचारिक कार्य महाराष्ट्रातील ज्या विचारवंत, लेखकांनी केले त्या यादीमध्ये डॉ. रावसाहेब कसबे यांचे नाव प्राथम्याने घेतले जाते.

१८८५ साली रावसाहेब कसबे यांनी 'आंबेडकर आणि मार्क्स' हा ग्रंथ लिहिला. हे पुस्तक आल्यापासून जागतिक राजकारणात होत असलेले झंझावाताबद्दल सोविएत रशियाचे विघटन समाजवादापुढील आव्हाने जागतिकरणाने अखिल मानव जातीपुढे उभे राहिलेले प्रश्न चर्चेसाठी पुढे आले आहेत. डॉ. रावसाहेब कसबे यांनी विविध ग्रंथांतून मांडलेले विचार हे प्रागतिक असल्यामुळे प्रागतिक चळवळीतील कार्यकर्त्यांना मार्गदर्शक तर ठरतातच परंतु आपणास अंतर्मुख बनवितात. त्यांच्या काही पुस्तकांचे भाषांतर कानडी आणि तेलगू भाषेतही झाली आहेत. त्यांनी वेगवेगळ्या ठिकाणी अध्यक्षपण भूषविले आणि त्यांच्या भाषणाने समाजपरिवर्तनाच्या चळवळीतील कार्यकर्त्यांना, साहित्यिकांना आणि विचारी वाचकांना व्यापक पायावर उभ्या असलेल्या पुरोगामी विचारांची तर्कशुद्ध आणि स्पष्ट दिशा प्राप्त झाली आहे.

**डॉ. रावसाहेब कसबे यांनी आंबेडकरवाद आणि मार्क्सवाद या विषयी लिहिताना मार्क्सवाद ही अशा प्रकारची जीवनदृष्टी आहे की, मार्क्सवादी जीवन दृष्टीपासून कोणतेही पिडितांची, शोषितांची आणि स्त्रियांची चळवळ अलिप्त राहू शकत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित, पिडितांचे नेतृत्व केले आहे. या अस्पृश्य, पिडितांच्या मुक्तीचा मार्ग 'मार्क्सवाद' होऊ शकतो. यामुळे आंबेडकरवाद आणि मार्क्सवाद या परस्पर विरूद्ध दोन टोकांचा एकत्रित विचार करण्याचे धाडस बाबासाहेबांनी केले. याचे प्रतिबिंब डॉ. कसबे**

**यांच्या ग्रंथातून दिसून येते. यामुळे डॉ. कसबे यांच्या दृष्टीकोनातील मार्क्स आणि आंबेडकर अभ्यासणे अत्यंत महत्त्वाचे आहे.**

प्रबोधनाची चळवळ अलिकडे मंदावत चालली आहे असे अनेकदा म्हटले जाते ही मंदावत चाललेली प्रक्रिया शिक्षणाने अधिक गतिमान करता येईल. महात्मा फुले यांचे शैक्षणिक क्षेत्रातील तसेच सामाजिक क्षेत्रातील योगदान डॉ. कसबेंवर प्रभाव टाकतात ते त्यांच्या अखिल भारतीय समाजवादी अद्यापक सभेच्या अधिवेशनातील अध्यक्षीय भाषणातून दिसून येते. डॉ. कसबेंच्या मते, “शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे एक प्रभावी साधन आहे. परंतु समाज परिवर्तनाची दिशा कोणती असावी हे निश्‍चित केल्याशिवाय त्याचा अचूक आणि परिणामारक उपयोग करून घेता येत नसतो. ”[१६] यावरून डॉ. रावसाहेब कसबे यांच्या क्रांतीकारी चिंतनाचा अनुभव येतो.

## सारांश–

डॉ. रावसाहेब कसबे यांनी विविध गुण आपल्या लहान वयातच अंगीकारले होते. या आठवणी, अनुभवांना व परिस्थितीला बरोबर घेऊनच त्यांनी शिक्षकी पेशावर प्रेम केले. सॉक्रेटिस पासून ते कार्ल मार्क्स पर्यंत सर्वच विचारवंतांचा अभ्यास त्यांनी केला आहे. एक राज्यशास्त्राचा विद्यार्थी म्हणून तसेच आपल्या विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी सखोल आणि शिस्तबद्ध वाचन करण्याची आवश्यकता आहे अशी भावना मी त्यांचा एक विद्यार्थी असल्यापासून ते त्यांच्याबरोबर काही काळ प्राध्यापक म्हणून काम करताना जवळून जाणवली होती. महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात जातीव्यवस्थेचा प्रश्‍न कळीचा बनला आहे आणि जेथे जातीव्यवस्थेच्या प्रश्‍नांची चर्चा होते तेथे ‘आंबेडकरवाद’ येतो. डॉ. रावसाहेब कसबेंनी अशा विविध प्रश्‍नांची सोडवणूक करण्यासाठी मार्क्सवाद, आंबेडकरवाद इत्यादी विचारसरणींचा आधार घेतला आहे. प्रामुख्याने या निमित्ताने

आंबेडकर विरूद्ध मार्क्सवाद अशी वैचारिक संघर्षाची सुरूवात जेथे जेथे आपणांस पहावयास मिळते तेथे डॉ. रावसाहेब कसबे यांनी मांडलेली भूमिका अभ्यासण्यास संधी मिळते. आजच्या काळात महाराष्ट्राबरोबरच भारतात सुद्धा 'आंबेडकर' आणि 'मार्क्स' यांची चिकित्सा टाळता न येण्याजोगी निकड जाणवते आहे. ती या दृष्टीकोणातून डॉ. रावसाहेब कसबे यांनी आपले विविध ग्रंथ लिहून, चळवळीस वैचारिक खाद्य पुरवून विशद केली. यामुळे ते एक विचारवंत, एक समाजसुधारक आणि एक क्रांतीकारक आहेत.

## संदर्भ टीपा


१. कांबळे उत्तम, **रावसाहेब कसबे यांचे क्रांतीकारी चिंतन,** सुगावा प्रकाशन, पुणे, प्र.आ. जून २००६.

२. डॉ. कसबे रावसाहेब**, धर्म: मानवी संस्कृती व विकास**, लोकवाङ्मय गृह, मुंबई, फेब्रुवारी २००५, पान १०,११.

३. डॉ. कसबे रावसाहेब, **डॉ. आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना**, सुगावा प्रकाशन, पुणे, ति. आ. २००१, पान ५.

४. **तत्रैव**, पान ११.

५. **उनि**, डॉ. कसबे रावसाहेब, पान २५.

६. डॉ. कसबे रावसाहेब, **शिक्षणाची आव्हाने**, सुगावा प्रकाशन, पुणे, २००२, पान ३.

७. **तत्रैव**, पान ४.

८. **तत्रैव**, पान ४.

९. **उनि,** पान १०,११.

१०. **तत्रैव,** पान १४

११. डॉ. कसबे रावसाहेब, **रिपब्लिकन पक्ष ऐक्य, वास्तव आणि भवितव्य,** सुगावा प्रकाशन, पुणे, १९९८, पान ८.

१२. **तत्रैव,** पान १०.

१३. **तत्रैव,** पान १०.

१४. **तत्रैव,** पान १४.

१५. **उनि**, पान १२३.

१६. **उनि**, पान ३.

प्रकरण तिसरे

# आंबेडकरवादी चळवळीचे मार्क्स आणि मार्क्सवादाविषयीचे मत

# प्रकरण तिसरे

# आंबेडकरवादी चळवळीचे कार्ल मार्क्स आणि मार्क्सवादाविषयी मत

## प्रस्तावना–

महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय चळवळींचा अभ्यास करत असताना आपणास 'कार्ल मार्क्स' आणि 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' यांचा विचार केल्याशिवाय पुढे जाता येत नाही. दलित चळवळीच्या निमित्ताने महाराष्ट्रात जे नेतृत्व निर्माण झाले त्यात त्यांनी तरुणांना सामावून घेण्यात फारसे यश मिळविले नाही. दलित पॅंथरच्या रूपाने ज्यांनी ज्यांनी चळवळीचे नेतृत्व केले, त्यांनी स्वत:ला 'आंबेडकरवादी' म्हणवून घेतले. त्यांनी आंबेडकरांशी नाते सांगत जाती, पोटजाती आणि धर्मांधता यातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतल्यानेच रिपब्लीकन पक्षाचे नेतृत्व अपंग होत गेले. ज्या ज्या नेतृत्वाने 'जाती' ऐवजी 'वर्ग' व्यवस्था स्वीकारली. त्या त्या नेतृत्वाला 'मार्क्सवादी' ठरविण्यात आले. रिपब्लिकन पक्ष आणि दलित पॅंथर यांच्या अंतर्गतच जात आणि वर्ग यावरून मतभेद निर्माण झाले होते. साधारणत: १९६६–६७ पर्यंत कार्ल मार्क्सचे नाव घेणे दलित समाजात आंबेडकरी विचार मानणारे एका अर्थाने पाप समजत होते. परंतु १९७० नंतरच्या सामाजिक घडामोडींमुळे आंबेडकरांबरोबरच मार्क्सचे नाव घेण्याबाबतची चर्चा सुरू होण्यास अनुकूल परिस्थिती निर्माण झाली.

"दलित समाजात मार्क्स व मार्क्सवादी चिंतनासंबंधी अनेक चूकीच्या समजूती जाणीवपूर्वक प्रसृत करण्यात आलेल्या आहेत. हे जसे खरे आहे, तसेच

बाबासाहेबांबद्दलही अनेक गैरसमजूती या ना त्या कारणाने दलित व दलित्तेतर समाजात घट्ट रूतून बसलेल्या आहेत.” [१]

१५ नोव्हेंबर १९५६ पासून जागतिक बौद्ध भ्रातृसंघाची चौथी परिषद खाटमांडू येथे सुरू झाली होती. बाबासाहेब आंबेडकर या परिषदेला एक प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते. २० नोव्हेंबर १९५६ रोजी दुपारच्या सत्रात बाबासाहेब ‘बौद्ध धर्मातील अहिंसा’ या विषयावर भाषण देणारे होते. परंतु देशी परदेशी प्रतिनिधींच्या आग्रहामुळे नियोजित विषयाऐवजी ‘बौद्ध धम्म व साम्यवाद’ या विषयावर बोलण्यास बाबासाहेब तयार झाले. दलित समाजात मार्क्स आणि मार्क्सवादाबाबत चूकीच्या समजूती प्रसारित करण्यासाठी या भाषणाचा संदर्भ मुक्तपणे देण्यात येतो. डॉ. रावसाहेब कसबे यांच्या बाबतीत नेहमी महाराष्ट्रामध्ये चर्चा केली जाते ती अशी की, डॉ. रावसाहेब कसबे ‘आंबेडकरी’ आहेत की ‘मार्क्सवादी’. परंतु याठिकाणी डॉ. कसबे ‘आंबेडकरी’ विचारधारेतूनच कार्ल मार्क्सकडे पाहतात हे स्पष्ट होते. ते आपल्या ‘आंबेडकर आणि मार्क्स’ या पुस्तकात लिहितात की, “बाबासाहेबांनी खाटमांडू येथे जागतिक भ्रातृपरिषदेत जे ‘बौद्ध धर्म आणि साम्यवाद’ या विषयावर भाषण दिलेले आहे याचा दलित समाजात मार्क्स आणि मार्क्सवादाबाबत चूकीच्या समजूती प्रसृत करण्यासाठी मुक्तपणे वापर केलेला आहे प्रसंगी त्याला ‘बुद्ध की मार्क्स’ या नावानेही संबोधण्यात आलेले आहे.” यावरून डॉ. रावसाहेब कसबे फक्त आंबेडकरवादी किंवा फक्त मार्क्सवादी नाहीत हे स्पष्ट करण्यास मदत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धर्म व मार्क्सवादाची काही वैशिष्टये सांगितली आहेत असे असले तरी या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेले ‘बुद्ध की कार्ल मार्क्स’ अभ्यासणे अपरिहार्य आहे. कार्ल मार्क्स एक नव्या अर्थशास्त्रीय पद्धतीचा शिल्पकार तर दुसऱ्या बाजूस भगवान गौतम बुद्ध एका धर्माचा संस्थापक, परंतु या दोनहींची तुलना अभ्यासण्याचे कारण म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भगवान बुद्धांचे

तत्त्वज्ञान स्वीकारले होते आणि डॉ. बाबासाहेबांचे तत्त्वज्ञान स्वीकारले होते ते डॉ. रावसाहेब कसबे यांनी. बुद्ध आणि मार्क्स यांच्या कालावधीमध्ये कमालीचा फरक असला तरी मार्क्सवादयांनी त्यांचे पूर्वग्रह मागे सारले आणि बुद्धाचा अभ्यास केला व त्यांची भूमिका काय होती हे समजून घेतले तर मार्क्सवादयांचा रोख बदलेल. त्रिपिटिकाचा आधार घेऊन बुद्धाच्या तत्त्वप्रणालीमध्ये स्वतंत्र समाजासाठी धर्म आवश्यक मानला गेला आहे. कार्ल मार्क्सला वैज्ञानिक समाजवादी मानले गेले. यांची तुलना करताना दु:खाचे कारण वर्गकलह आहे याबरोबरच अनेक मुद्दे पुढे येतात. जग हे दु:खाने आणि दैन्याने भरलेले आहे आणि हे दु:खाचे कारण दूर करण्यासाठी त्याने पंचशील तत्त्वांचे आचरण करण्याचा आग्रह धरला. "भाषा वेगळी आहे परंतु अर्थ तोच आहे. जर दु:खाचा अर्थ 'पिळवणूक' असा घेतला तर बुद्ध व मार्क्स यांमध्ये अंतर नाही." [२] आणि साम्यवादयांनी जी साधने सांगितलेली आहेत ती साधने म्हणजे हिंसा आणि कामगारांची हुकूमशाही होय. "बुद्ध व कार्ल मार्क्स यांच्या मधील साम्य व भेद आता स्पष्ट आहे. भेद साधनांबाबत आहे. दोघांचे ध्येय समान आहे."[३] डॉ. रावसाहेब कसबे यांना विद्यार्थीदशेत असतानाच आंबेडकरी राजकीय विचारांची ओळख होत होती. आंबेडकरी चळवळीतील तो कालखंड मोकळ्या वातावरणात तात्त्विक चर्चेचा होता. ते म्हणतात,"डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या निधनानंतर दलित चळवळीचा जसजसा विकास होत गेला तसतशी दलितांच्या राजकीय चळवळीला सुस्पष्ट राजकीय सिद्धांताची आवश्यकता जाणवू लागली या आवयश्यतेपोटीच 'आंबेडकरवाद' या नव्या संकल्पनेने भारतीय राजकीय विचारविश्वात जन्म घेतला." दलित चळवळीची वाटचाल किंवा निकोप वाढीसाठी, विकासासाठी आंबेडकरी विचारांच्या दृष्टीकोनातून केलेली विचारांची मीमांसा समजून घेतली पाहिजे. या बरोबरच **डॉ. रावसाहेब कसबे यांनी मार्क्सवादासंबंधी जे विचार मांडलेले आहेत ते आंबेडकरी विचारधारेतूनच अजमावून पाहिले पाहिजेत कारण मुळात डॉ. कसबे यांनी**

**कार्ल मार्क्सने ज्या अवस्थांचे विश्लेषण केले आहे त्या सर्व अवस्था अनुभवल्या आहेत तरीही त्यांच्या विचारांचा शेवटचा टप्पा म्हणजे आंबेडकरी विचारधारा होय. १९७१ साली महाड येथे झालेल्या बौद्ध साहित्य संमेलनात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मार्क्स आणि आंबेडकर यांच्या समन्वयाचा विचार जाहीरपणे मांडलेला दिसून येतो.** अर्थात याचा संदर्भ पुढील अभ्यासकांनी वेगवेगळ्या पद्धतीने मांडला आहे. धर्मातंरानंतर दलित पॅंथरची जी विचारासरणी होती त्या विचारसराणीमध्ये आंबेडकर विरूद्ध मार्क्सवाद असे दोन प्रवाह तयार झालेले होते. डॉ. रावसाहेब कसबे यांनी मे—जून १९७५ च्या समाजप्रबोधन पत्रिकेमध्ये 'दलित चळवळीचे भवितव्य' हा लेख लिहिला होता. त्या लेखामध्ये डॉ. कसबे अशी मांडणी करतात की, दलितांचे प्रश्न सोडविण्यासाठी मार्क्सवादी अर्थशास्त्र स्वीकारले पाहिजे. मे—जून १९७६ च्या समाजप्रबोधन पत्रिकेच्या अंकात डॉ. रावसाहेब कसबे यांनी 'डॉ. आंबेडकरांच्या धर्मातराचे स्वरूप' हा लेख प्रसिद्ध केला आहे. या लेखातही त्यांनी व्यक्ती व समाज यांचे मार्क्सवादाच्या दृष्टीकोनातून काय संबंध आहे यावर प्रकाश टाकला आहे.

मा. सुधाकर गायकवाड या लेखकाने डॉ. कसबे यांच्या विचारांच्या मूल्यमापनावर एक पुस्तिका लिहिली. त्या पुस्तिकेमध्ये एक विचारवंत म्हणून रावसाहेब कसबे एका उंचीवर पोहचलेले आहेत. त्यांच्या विचारांचा आवाका कसा वैश्विक आहे, डॉ. रावसाहेब कसबे हे फक्त मार्क्स आंबेडकरांचा समन्वय करणारे राहिले नाहीत तर स्वत:च्या स्वतंत्र विचारांचे तत्त्वज्ञ झाले आहेत. ६ डिसेंबर १९७६ रोजी नागपूरच्या डॉ. आंबेडकर अध्ययन मंडळाने जे व्याख्यान आयोजित केले होते त्या व्याख्यानात त्यांनी 'आंबेडकरांचे सामाजशास्त्र व मार्क्सचे अर्थशास्त्र' यांचा सुरेख मेळ घातलेला दिसून येतो. मा. सुधाकर गायकवाड डॉ. कसबे यांच्याबद्दल म्हणतात की, 'त्यांनी 'आंबेडकर आणि मार्क्स' यांच्या विचारांचा समन्वय करणारा ग्रंथच लिहिला. त्यावेळचा काळ हा सामाजिक चळवळीच्या

उत्थानाचा काळ होता. आंबेडकरी दलितांचा कम्युनिस्ट विरोधी हा वैचारिकतेबरोबर मानसिकही होता आणि आजही काही प्रमाणात आहे. त्यावेळी मार्क्स आंबेडकरांच्या समन्वयाचा विचार मांडण्याचा रावसाहेबांचा तो अत्यंत धाडसी प्रयत्न होता. 'दलित चळवळ आणि डावी चळवळ यांनी एकमेकांचे शत्रू बनून आपल्या मर्यादित शक्तीचा अपव्यय करण्याऐवजी एकमेकांच्या सहकार्याने आपले सामर्थ्य विस्तारत राहावे आणि भारतातील सामाजिक व राजकीय जीवनात क्रांतीकारक परिवर्तन घडवावे' [४] असा त्यांचा त्यावेळी उद्देश होता.

ब्रिटिशपूर्व कालखंडातील भारतामध्ये जी सामाजिक परिस्थिती होती ती प्रामुख्याने वर्णीय आणि जातीय अशा स्वरूपाची होती आणि मार्क्सवादी दृष्टीकोनाचा विचार केला तर आपणास मार्क्सवादी दृष्टीकोन हा वर्गीय आहे. डॉ. आंबेडकरांनी अनेकदा युरोपच्या इतिहासातून निघालेले निष्कर्ष भारतीय इतिहासाला आणि वास्तवाला जसेच्या तसे लावू नयेत असे सांगितले होते.[५] भारतीय इतिहासाचे आकलन या दृष्टीने कॉ. शरद पाटील यांच्याकडून झालेले आहे आणि या अन्वेषण पद्धतीला मार्क्सवादी–फुले–आंबेडकरवादी अन्वेषण पद्धती म्हटले गेले. याबरोबरच त्यांचे 'दास आणि स्लेवरी' हा इंग्रजी भाषेतील ग्रंथ या दृष्टीने महत्त्वाचा आहे.[६] डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी इतिहासविषयक दृष्टीकोन आपल्या 'रानडे, गांधी आणि जीना' या पुस्तिकेत मांडलेला आहे. कार्ल मार्क्स यांनीही इतिहासविषयक दृष्टीकोन मांडलेला आहे. कार्ल मार्क्सच्या मते इतिहास हा आर्थिक शक्तीचा परिणाम आहे. आंबेडकरांच्या मते मार्क्सच्या म्हणण्यात सत्यांश असला तरी त्यांचे म्हणणे पूर्ण सत्य नाही. त्यांनी व्यक्तीऐवजी व्यक्तिनिरपेक्ष शक्तींना इतिहासनिर्मितीत जे स्थान दिलेले आहे ते चूक आहे. परंतु बाबासाहेबांच्या मते इतिहासनिर्मितीत व्यक्तिनिरपेक्ष शक्तींना निर्णायक स्थान असते हे कोणीही नाकारू शकत नाही. परंतु व्यक्तिनरिपेक्ष शक्तीचा परिणाम हा माणसावर अवलंबून असतो हे सुद्धा

मान्य केले पाहिजे.[७] डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धर्माचा अभ्यास करताना त्या धर्माकडे सामाजिक दृष्टीने पाहिले. या धर्मात वर्गावर्गाच्या संबंधाऐवजी व्यक्तीव्यक्तीतील संबंधांना प्राधान्य आहे. बाबासाहेबांना समाज निर्मितीसाठी समाजबंधनाची आवश्यकता वाटली. परंतु ही बंधने व्यक्तिविकासाला मारक ठरणार नाहीत या कडेही लक्ष देतात. डॉ. रावसाहेब कसबे आपल्या 'आंबेडकरवाद: तत्त्व आणि व्यवहार' या पुस्तकात म्हणतात, "'ऑन लिबर्टी' या आपल्या जगप्रसिद्ध ग्रंथात पूर्णपणे व्यक्तिवादी विचार मांडणाऱ्या जॉन स्टुअर्ट मिलला सुद्धा व्यक्तिवादी विचारसरणी हळूहळू विकसित करावी लागली." घटना समिती अस्तित्वात आल्यानंतर शेडयूल्ड कास्ट फेडरेशनच्या वतीने जो अहवाल बाबासाहबोंनी दिला त्यात त्यांनी म्हटले होते की व्यक्ती आणि समाज यांचा विचार दोन परस्परविरूद्ध टोकांवर उभे राहून केला जात होता. लोकशाही व समाजवाद यांनाही परस्पर विरूद्ध तत्त्वप्रणाली मानले जात होते. डॉ. आंबेडकरांनी समाजवाद आणि लोकशाही यांना एकत्रित करणारी योजनाही आठवली होती परंतु त्यावर चर्चा होवू शकली नाही.[८]

आंबेडकरवादी चळवळीचे कार्ल मार्क्स आणि मार्क्सवादाविषयीचे मत जाणून घेत असताना डॉ. रावसाहेब कसबे यांनी आपल्या 'आंबेडकर आणि मार्क्स' या ग्रंथातील पान नं. २७७ वर सविस्तर स्पष्टीकरण दिलेले आहे. यावरून डॉ.रावसाहेब कसबे यांचा देखील दृष्टीकोन काय होता हे स्पष्टपणे समजून येते. साम्यवादाची सुरूवात 'या जगात पिळवणूक आहे' या सिद्धांतापासून होते. जगातील श्रीमंत माणूस आपल्याकडे असणाऱ्या पैशाच्या जोरावर सामान्य जनतेची पिळवणूक करतो. याचा परिणाम असा होतो की, सामान्य माणूस हा दु:खी, दीन आणि दरिद्री होतो आणि कार्ल मार्क्स या परिस्थितीला 'पिळवणूक' म्हणतो. कार्ल मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचा हा आरंभबिंदू मानला जातो. यातून बाहेर येण्यासाठी समाजात कोणालाही खाजगी मालमत्ता असू नये असा उपाय सुचवितात.

अतिरिक्त मूल्यावर फक्त श्रीमंताचीच मालकी न राहता ते सर्वांच्या मालकीचे असले पाहिजे आणि हे होण्यासाठी राज्याची मालकीच कामगार वर्गाकडे असावी. अशाच पद्धतीचे विचार बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या भाषणात सांगितलेली आहेत. डॉ. रावसाहेब कसबे आंबेडकरी विचारधारेतून मार्क्सकडे कसा पाहतो यासंबंधी कार्ल मार्क्स ज्याला गरिबांची पिळवणूक म्हणतो त्या संबंधी बुद्धांची भूमिका काय? बुद्धाने धर्माचा जो इमला उभा केला आहे त्याचा मूलाधार काय आहे? बुद्धानेसुद्धा "या जगात दु:ख आहे" असे मान्य केले आहे. परंतु त्यांनी पिळवणूक शब्द वापरला नाही. डॉ. बााबसाहेब आंबेडकरांनी आपल्या तत्त्वज्ञानातून 'पिळवणूक' म्हणजेच 'दु:ख' आहे हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे व बुद्धांचा कालानुषंगिक एक नवा अर्थ, एक नवे समर्थ विश्लेषण मांडण्याची त्यांना गरज वाटत होती. या गरजेतून बाबासाहेबांच्या 'बुद्ध आणि त्यांचा धम्म'चा जन्म झाला.

२० नाव्हेंबर १९५६ रोजीच्या 'बौद्ध धम्म व साम्यवाद' या विषयावर जे भाषण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिले ते उत्स्फूर्त भाषण होते. त्या भाषणात ते म्हणतात, "The word Dukkha, no doubt, has been interpreted to mean rebirth, the round of life, that is Dukkha, I do not agree with that, I think there are a lot of places in Buddhist literature where the Buddha has used the word Dukkha in the sense of poverty. Therefore, so for as the foundation is concerned, there is a really no difference at all"[१] "बौद्ध तत्त्वज्ञानातील दु:ख या शब्दाचे विश्लेषण आजपर्यंत वेगवेगळ्या पद्धतींनी केलेले आहे यात वाद नाही. बुद्धाला अभिप्रेत असलेल्या दु:खाचे विश्लेषण पुनर्जन्म, जीवन मरणाचा फेरा या अर्थाने केलेले आहे. परंतु हे विश्लेषण मला मान्य नाही. मला वाटते बौद्ध वाङ्मयात अशा अनेक जागा आहेत की ज्यातून 'दु:ख' हा शब्द 'दारिद्र्य' या अर्थाने वापरलेला आहे. म्हणून बुद्ध आणि कार्ल मार्क्स यांच्या तत्त्वज्ञानाचा विचार करावयाचा झाला तर असे लक्षात येईल की या दोन्हीच्या तत्त्वज्ञानाचा

आधार एकच आहे. खरोखर त्यात कोणताही फरक नाही.” अशा वैचारिक भूमिकेमुळे बौद्ध धर्माचे नवे रूप उलगडून दाखविणाऱ्या त्यांच्या ‘बुद्ध आणि त्यांचा धम्म’ या ग्रंथाला विशेष महत्त्व आहे. आपल्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुढे म्हणतात, ‘जर बुद्ध आणि मार्क्स यांच्या विचारांचा मुलाधार एकच आहे तर बौद्ध धर्मीयांनी कार्ल मार्क्सकडे जाण्याचे कारण काय? तरीही ज्यांना कार्ल मार्क्सचे आकर्षण आहे त्यांनी बुद्धांच्या ‘धम्मचक्रप्रवर्तन सुत्ताचा’ अभ्यास करावा आणि बुद्ध काय म्हणतो हे समजावून घ्यावे. डॉ. रावसाहेब कसबे यांनी अनेक ठिकाणी जी व्याख्याने दिली, अनेक ग्रंथांतून जे विचार मांडले यावरून वाचकांच्या पुढे असा प्रश्न उभा ठाकला आहे की, डॉ. कसबे मार्क्सवादी आहेत की आंबेडकरवादी? परंतु या ठिकाणी आपणास त्यांचे ‘आंबेडकर आणि मार्क्स’ विचारात घ्यावे लागते कारण त्यांनी विचार मांडताना डॉ. आंबेडकरांच्या भाषणाचा संदर्भ देत देत स्वत: मार्क्सवादी विचारांपेक्षा ‘आंबेडकरवादी विचारांशी’ कशी जवळिक साधली हे वाचकांच्याही लवकर लक्षात येत नाही. सारासार विचार केला तर बौद्ध भिक्खुसंघाचे नियम साम्यवादी रशियाच्या नियमांपेक्षाही अधिक कडक आहेत. “खाजगी मालमत्ता नाकारणे हेच साम्यवादाने आकृष्ट केलेले आहे, त्यांना साम्यवादातील खाजगी मालमत्तेसंबंधीचे नियम विनयपिटकातही सापडतील या ठिकाणी प्रश्न एवढाच आहे की खाजगी मालकी नष्ट करण्याचा नियम हा संपूर्ण समाजाला किती प्रमाणात लावता येईल ही गोष्ट अर्थातच या नियमांच्या उपयुक्ततेवर, काळ आणि परिस्थितीवर वर मानवी समाजाच्या विकासावर अवलंबून आहे. परंतु एक सिद्धांत म्हणून जरी खाजगी मालकी नष्ट करण्यात काही चूका असल्या तरी खाजगी मालमत्ता नष्ट करू इच्छिणाऱ्यांच्या मार्गात बौद्ध धर्म अडसर म्हणून उभा राहणार नाही कारण त्याने यापूर्वी बौद्ध भिक्खुसंघासारख्या संघटनेत या तत्त्वाला मान्यता दिलेली आहे.” डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते बुद्ध आणि मार्क्स यांच्यामध्ये साम्यवादाची निर्मितीसाठी साम्यवादी

हिसेंच्या मार्गाचा अवलंब करतात तर दुसऱ्या बाजूला मानसिक परिवर्तन, नैतिक शिकवण आणि प्रेम या साधनांच्या साहाय्याने बुद्ध आपल्या विरोधकांना जिंकतो. संघर्ष करून नव्हे तर प्रेमाने काहीही जिंकता येते. या आणि इतर अनेक कारणांमुळे भगवान गौतम बुद्धांचा मार्ग हा खरा लोकशाहीचा मार्ग आहे. भाषणाच्या शेवटी बाबासाहेब स्पष्ट संकेत देतात की, "साम्यवाद्यांच्या यशाने हुरळून जावू नका. आपण सर्वजण बुद्धांच्या एक दशांशाने जरी ज्ञानी झालो तरही कम्युनिस्टांनी जे यश प्राप्त केले तेच आपण सदिच्छा प्रेम आणि न्याय या साधनांचा उपयोग करून प्राप्त करू. हार्दिक आभार." एवढेच नव्हे तर दलित चळवळीला देखील साम्यवादी व सामजवादी चळवळीपासून अलिप्त रहण्याचा मार्ग सांगतात.

डॉ. रावसाहेब कसबे यांनी आपल्या 'आंबेडकर आणि मार्क्स' या ग्रंथात एक ठळक मुद्दा दिला तो असा की, "साम्यवादाला पर्याय" या मुद्द्यामध्ये डॉ. कसबे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेल्या विचारांचा संदर्भ घेऊन मांडणी केली की साम्यवादाला उत्तर देऊ शकणारा धर्मच जिवंत राहील. भारतीय कम्युनिस्टांवर बाबासाहेब टीकेचे प्रहार करतात व म्हणतात की, 'साम्यवादाचे ध्येय गाठण्यासाठी बौद्ध धर्म हा एक निर्विवाद मार्ग आहे.' कार्ल मार्क्सच्या अनुयायांच्या मते 'धर्म' हाच साम्यवादाला पर्याय आहे. साम्यवादाला पर्याय म्हणून जसा इस्लाम, ख्रिस्ती, हिंदू आणि पारंपरिक बौद्ध धर्म असू शकत नाहीत तसेच फॅसिझम, नाझिझम आणि भांडवलशाहीसुद्धा असू शकत नाही. साम्यवादाच्या विरूद्ध या सर्वांनीच आपली ऐतिहासिक भूमिका पार पाडली आहे. याबरोबरच संपूर्ण जगाचा चेहरा बदलायचा असेल तर बुद्धाची शिकवण अनुसरली पाहिजे. कार्ल मार्क्सने धर्मासंबंधीचे विचार अनेक वेळा मांडले असले तरी इ.स. १८४४ साली लिहिलेल्या 'क्रॉंट्रिब्युशन टु द क्रिटिकल ऑफ हेगेल्स फिलॉसॉफी ऑफ राईट' या लेखात 'दास कॅपिटल'च्या पहिल्या खंडात आणि 'दि जर्मन आयडिऑलॉजी' या ग्रंथात

त्याने धर्मासंबंधी महत्त्वपूर्ण विचार मांडलेले आहेत. त्यांच्या मते धर्माची निर्मिती माणूस करतो, धर्म माणसाला निर्माण करीत नाही. मार्क्सवाद धर्माकडे अफूची गोळी म्हणून पाहतो याचे कारण धर्माचा सामान्य माणसांना अंधश्रद्धेत ठेवण्याचा, त्यांची पिळवणूक करण्याचा, विज्ञान आणि बुद्धीवादाविरूद्ध असलेल्या साऱ्या भूमिकांचा इतिहास समोर होता. डॉ. कसबे हे मार्क्सवादी विचारांचा साधन म्हणून वापर करून 'आबेंडकरी' विचारांचेच स्वप्न पहात होते असे त्यांच्या लिखानावरून दिसून येते. त्यांच्या मते, "बाबासाहेब आंबेडकरांचा जातिसंस्थेवरील शोधनिबंध हे भारतीय इतिहासाच्या दृष्टीने केलेले अतिशय मौलिक मार्क्सवादी भाष्य आहे. त्यात मार्क्सवादी आग्रही नसेल, परंतु दृष्टी मात्र मार्क्सवादी आहे. कारण 'संपूर्ण जगाचा इतिहास हा वर्गीय समाजाचाच इतिहास आहे आणि भारत त्याला अपवाद नाही' अशीच या विषयाला स्पर्श करताना आंबेडकरांची सुरूवात आहे. हे संपूर्ण विवेचन मार्क्सवादाच्या छायेत केलेले आहे. त्यांची बंदिस्त वर्गाची कल्पना, मनु वर त्यांनी केलेले भाष्य आणि देशी आणि परदेशी विचारवंतांच्या या विषयाच्या संदर्भात दाखविलेल्या मर्यादा हे सारेच भारताच्या इतिहासाचे मार्क्सवादी आकलन आहे. भारतीय जातिसंस्थेच्या उगम विकासासंबंधी हे १९१६ साली केलेले पहिलेच मार्क्सवादी विशलेषण असावे. याचा अर्थ आंबेडकर सुरूवातीला मार्क्सवादी होते असा जर कोणी काढला तर तो विपर्यास्त होईल याचा अर्थ एवढाच की इतिहासाच्या आकलनासाठी आणि भविष्य घडविण्यासाठी जे परिस्थितीचे मूल्यमापन करणे आवश्यक असते. त्याच्यासाठी मार्क्सवादी दृष्टीच्या उपयोगाचे अनन्यसाधारण महत्त्व त्यांना वाटत होते. कार्ल मार्क्स आणि मार्क्सवादाचे सूप्त आकर्षण आंबेडकरांच्या संपूर्ण जीवनात, भारतीय कम्युनिस्टांच्या विरोधात जाऊनही टवटवीत राहिले आहे." [९] एवढेच नव्हे तर 'ॲनिहिलेशन ऑफ कास्ट'मध्ये 'भारतातील समाजवादी हे समाजव्यवस्थेतून निर्माण होणाऱ्या समस्यांचा विचार करणार की नाही?' असाही डॉ. आंबेडकर प्रश्न

उपस्थित करतात. त्यानंतर डॉ. कसबे आपल्या 'आंबेडकर आणि मार्क्स' या पुस्तकात असा प्रश्न उपस्थित करतात की सामाजिक सुधारणापूर्वी आर्थिक सुधारणा यशस्वी करू शकाल काय? आणखी एक प्रश्न डॉ. कसबे समाजवादयांना असा विचारतात की, एक समाजवादी म्हणून विविध वर्गांना मिळणारी वागणूक पूर्ण समतेवर आधारलेली असली पाहिजे असा विश्वास बाळगणे एवढेच समाजवाद्यांच्या दृष्टीने पुरेसे आहे का? समाजवादी ज्या आर्थिक सुधारणेचे स्वप्न उरी बाळगतात ती सुधारणा, त्यांच्या हातात राजकीय सत्ता देणारी क्रांती झाल्याशिवाय वास्तवात येणे अशक्य आहे. कारण भारतातील कामगार वर्ग संघटित होईल काय? कामगार वर्गाच्या या कृतीमागील प्रेरणा कोणती? डॉ. कसबेच यावर उत्तर देतात की, समता, न्याय आणि बंधुभावाची प्रेरणा याच क्रांतीसाठी कृतिप्रवण बनवितात. सामाजिक सुधारणेचा प्रश्न सोडविल्याशिवाय भारतात समाजवाद्यांना क्रांती करता येणार नाही. 'जाती'चा राक्षस राजकीय, आर्थिक सुधारणा करूच देणार नाही. त्याचा पूर्ण नि:पात केल्याशिवाय ते अशक्य आहे. असे विश्लेषण डॉ. आंबेडकर करतात आणि डॉ. रावसाहेब कसबे ज्याअर्थी वरील विचार स्वीकारतात त्याअर्थी डॉ. कसबे यांनी मार्क्सवादी विचारांपेक्षा जास्त प्रमाणात आंबेडकरवादी विचार स्वीकारले आणि आंबेडकरवादी चळवळीचे मार्क्स आणि मार्क्सवादाविषयीचे मत असे आहे. बाबासाहेब आंबेडकरांनी मार्क्सवादावर हिंसाचाराचा आरोप केलेला आहे या प्रसंगी बुद्धाचा अहिंसेचा सिद्धांत हत्या करू नका असे सांगण्याऐवजी सर्वांवर प्रेम करा असे सांगणारा आहे. समाजवाद जरी हवा असला तरी या समाजवादात संसदीय लोकशाहीची मोडतोड करायची नाही आणि समाजवाद स्थापन करण्याचे काम ते लोकप्रतिनिधीवर सोपवू इच्छित नाहीत. कारण आंबेडकरांच्या मते प्रौढ मताधिकारावर उभ्या असणाऱ्या लोकशाहीतसुद्धा संसदेत श्रीमंत वर्ग किंवा त्यांचे प्रतिनिधी बहुसंख्येत असतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संपूर्ण जीवन अभ्यासता आज आपणास समजते की, हे खरोखरच महापुरुष होते. आपल्या परीने त्यांनी अखील मानवतेची सेवा केलेली आहे. आयुष्यभर त्यांनी संघर्ष केला. काहीच्या मते ते थोर तत्त्वचिंतक होते तर काहींच्या मते ते परिवर्तनाच्या चळवळीतील ते प्रमुख नेते होते. अर्थात त्यांचे तत्त्वज्ञान हे ग्रंथालयात बसून निर्माण झालेले नाही तर जीवनात आलेल्या अनुभवाच्या आणि संघर्षाच्या आधारे नावारूपास आलेले आहे. डॉ. बाबासाहेबांचे विचार या दृष्टीकोनातून अत्यंत महत्त्वाचे आहेत, त्यांचे विचार स्वीकारणारे अनेक समूह आज अस्तित्वात आहेत. या सर्व विचार संप्रदाय स्वीकारणाऱ्यांना 'आंबेडकरवादी' म्हटले गेले आहे. डॉ. बाबासाहेबांचे विचार स्वीकारणारा अनुयायी वर्ग मोठा निर्माण झालेला असला तरी या अनुयायांनी कमी–अधिक प्रमाणात विचारांची मोडतोड चालविलेली आहे. त्यांच्या अनुयायांनी आपापल्या चळवळी वाढविण्याच्या दृष्टीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार किंवा तत्त्वज्ञान तेवढयापुरते स्वीकारले. परिणामी जे स्वत:ला 'आंबेडकरवादी' मानतात त्यांच्यामध्ये कर्मठपणा आला. 'रानडे, गांधी आणि जीना' या प्रसिद्ध भाषणात मॅझिनीला उद्देशून डॉ. आंबेडकर म्हणतात की, 'तुम्ही माणसांना मारू शकता, परंतु विचार मारून टाकू शकत नाहीत.' परंतु बाबासाहेब पुढे असेही म्हणतात की, "मला वाटते हा अतिशय चूकीचा विचार आहे. माणसे जशी नाशवंत आहेत. तसेच विचारसुद्धा नाशवंतच असतात. विचार आपोआप मूळ धरतात हा विचारच चूकीचा आहे. ज्याप्रमाणे झाडाला पण्याची आवयकता असते तशीच विचारालाही प्रचाराची आवश्यकता असते. त्याशिवाय दोघेही लय पावतील" [१०] डॉ. बाबासहेब आंबेडकर असोत वा कार्ल मार्क्स असोत त्यांच्या विचारांना 'प्रचारक' मिळाले आणि त्यांनी स्वत:ला 'आंबेडकरवादी' आणि 'मार्क्सवादी' म्हणवून घेतले. अर्थात ज्यांच्या विचारांना पोटभरू आंधळे प्रचारक मिळतात अशा व्यक्ती आणि त्यांचे विचार मानवतेला शाप ठरण्याचा धोका अधिक आहे. आंबेडकरवादी

चळवळीचे मार्क्स बाबतचे मत विचारात घेताना, मार्क्सवादाबाबतचे दृष्टीकोन लक्षात घेता आंधळ्या प्रचारकाच्या नजरेतून मूल्यमापन होऊ नये या अंगाने विचार करणे आवश्यक आहे. डॉ. रावसाहेब कसबे यांनी याच विचाराचा धागा पकडून वैचारिक विश्व प्रगल्भ केले आहे. माणसाला केंद्रबिंदू मानून त्यांनी आपल्या 'आंबेडकर आणि मार्क्स' या ग्रंथात 'आंबेडकर' आणि 'मार्क्स'ची चिकित्सा केली आहे. भारतातील माणसाने मार्क्सबद्दल आपले विचार एकदम घट्ट करून ठेवले आहेत ते असे की, मार्क्सवादाने जातिसंस्थेबद्दल मुळीच विचार केलेला नाही. असे असले तरी डॉ. रावसाहेब कसबे म्हणतात की, या मंडळींच्या मनातील समज हे नुसते गैरसमज नाहीत तर ही त्यांनी स्वत:च स्वत:ची आणि पर्यायाने त्यांच्या चळवळीची करून घेतलेली अक्षम्य फसवणूक आहे. 'दास कॅपिटल' मध्येही याबाबतचे जवळजवळ पन्नास संदर्भ दिलेले आहेत. या विचारांची जवळिकता पाहिली तर डॉ. कसबे कोणत्या विचारांचे 'प्रचारक' आहेत या बाबत सामान्य माणसाच्या, संशोधकांच्या मनात प्रश्नचिन्ह उभे राहात आहेत.

'मार्क्सवादी' विचारांचे 'आंबेडकरवादी' दृष्टीने मूल्यमापन करावयाचे झाल्यास डॉ. रावसाहबे कसबे यांनी आपल्या लेखनात मांडणी केली ती अशी की, "मार्क्सवाद हे सामाजिक गतीचे तत्त्वज्ञान आहे. त्यात जड जगत, सजीव जगत म्हणजे वनस्पती आणि सचेतन म्हणजे प्राणी यांच्या वैयक्तिक अगर सामूहिक स्पष्टीकरणाला उपयोगी पडेल असे फारसे विवेचन नाही. मानवेत्तरांचा या सिद्धांतात फारसा विचार नाही. मार्क्सवादाने माणसाच्यासुद्धा सर्वच प्रेरणांचा विचार केलेला आहे असे नाही. कामवासना आणि अहंकारासाख्या अतिशय सामर्थ्यशील असलेल्या जीवशास्त्रीय प्रेरणांना त्यात फारसे स्थान नाही. त्यामुळे मार्क्सवाद प्रत्यक्ष राबविणाऱ्या नेत्यांच्या आणि कार्यकर्त्यांच्या अनेक बऱ्या–वाईट कृत्यांचा अन्वयार्थ लावता येत नाही. अशा कृत्यांचा अन्वयार्थ लावण्याची विचरसूत्र आपल्याकडे आपल्या हातात काही शिल्लक नसते याची जाणीवही मार्क्सवादी

विचारवंतात फारशी आहे असे दिसत नाही."[११] कार्ल मार्क्सने भांडवलदारांना किंवा भांडवलशाहीला नष्ट करण्यासाठी कामगारवर्गाची हुकूमशाही स्थापन होईपर्यंत कामगार वर्गाने कोणत्या नीतितत्त्वांना अनुसरून वागेल याबद्दलही काहीच मार्गदर्शन केलेले नाही. 'रावसाहेब कसबे यांचे क्रांतिकारी चिंतन' या मा. उत्तम कांबळे यांच्या पुस्तकात जे "मुलाखतीपूर्वी......" लिहिलेले आहे. यात त्यांन जेव्हा Annihilation of caste आणि कम्युनिस्ट मेनिफेस्टो एकत्रित आणि तौलनिक वाचन केले तेव्हा त्यांना परिवर्तनाची जाणीव झाली, विद्रोहाची धार जाणवू लागली. कम्युनिस्ट मेनिफेस्टोमध्ये भांडवलशाही विरूद्ध मार्क्स व एंगेल्स आक्रमक बनतो. परंतु त्याची आक्रमकता जातिसंस्थेने इथे वांझोटी कशी ठरविली याचे स्पष्टीकरण बाबासाहेबांच्या लिखानात सापडते. १९६८–६९ ला महाड येथे बाबुराव बागूल यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या दलित संमेलनातील परिसंवादात डॉ. रावसाहेब कसबे यांचेकडून आंबेडकर आणि मार्क्सबाबतचे जे सूतोवाच झाले तेव्हापासून डॉ. कसबे वैचारिक संघर्षाच्या, वादाच्या भोवऱ्यात सापडले. बाबासाहेब आंबेडकरांची समाजवादी आणि कम्युनिस्ट यांच्यासंबंधी एक स्पष्ट भूमिका होती. ती भूमिका १२ व १३ फेब्रुवारी १९३८ रोजी मनमाडला जी मजूर परिषद झाली तिच्या अध्यक्ष पदावरून भाषण करताना स्पष्ट केली. "माझ्या मते या देशातील कामगारांना दोन प्रमुख शत्रूंना तोंड दयावयाचे आहे. ते शत्रू म्हणजे ब्राम्हण्यवाद (Brahmanism) व भांडवलशाही (Capitalism) हे आहेत." 'आबंडकरवाद: तत्त्व आणि व्यवहार' या पुस्तकात डॉ. रावसाहेब कसबे यांनी वरील विवेचन केलेले आहे. दि. १३ ऑगस्ट २००७ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आबेडकर अध्यासन आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यास केंद्र, पुणे विद्यापीठ, पुणे यांनी एकत्रित एक दिवसीय चर्चासत्र आयोजित केले होते या चर्चासत्राचा विषय होता. मा. कांशीराम यांचे जीवनकार्य या चर्चासत्रामध्ये सुरूवातीलाच प्रास्ताविक मा. डॉ. रावसाहेब कसबे यांनी केले. या

प्रास्तविकेमध्ये त्यांनी आंबेडकरवादाच्या अनेक छटा आहेत या विषयीचे विश्लेषण केले. आंबेडकरवादाच्या अनेक छटा असून आंबेडकरवादी कोणाला म्हणायचे या विषयीचा प्रश्न वाचकांसमोर व प्रेक्षकांसमोर उभा केला. म्हणजेच डॉ. कसबे यांनी आंबेडकरवादी अनेक गट जरीही अस्तित्वात असले त्यांचा मार्ग जरी एक असला तरही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार मूलभूत मानले पाहिजे व आपल्यातील सांप्रदायिक अभिनिवेष विसरून 'आंबेडकरवादी' विचार समजून घेतले पाहिजेत. 'सत्यशोधक संघटक' या मासिकामध्ये डॉ. रावसाहेब कसबे यांनी 'डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतराची फलश्रुती' नावाचा लेख लिहिला ५९ व्या अंकात त्यांनी म्हटले की, "समाजवादी समाजरचना लोकशाहीच्या मार्गाने होणे ही काही सोपी गोष्ट नाही. भारतासारख्या काटेरी पुंजके असणाऱ्या, लोकशाहीची परंपरा नसणाऱ्या देशात तर हे काम अधिक कठीण आहे. या देशात लोकशाही समाजवादाची राजकीय मूल्य पेलणारा समाज निर्माण करणे हे या डाव्या पक्षांचे पहिले काम आहे." यामध्ये आपणास असे म्हणतो येईल की आंबेडकरवादी विचार स्वीकारणाऱ्या चळवळींना मार्क्सवादी किंवा डाव्या चळवळींकडून या अपेक्षा आहेत.

## सारांश–

कार्ल मार्क्स ज्याला गरिबांची पिळवणूक म्हणतो त्या संबंधी बुद्धांची भूमिका काय? बुद्धाने धर्माचा जो इमला उभा केला आहे त्याचा मूलाधार काय आहे? बुद्धानेसुद्धा "या जगात दु:ख आहे" असे मान्य केले आहे. परंतु त्यांनी पिळवणूक शब्द वापरला नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या तत्त्वज्ञानातून 'पिळवणूक' म्हणजेच 'दु:ख' आहे हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे 'जाती'चा राक्षस राजकीय, आर्थिक सुधारणा करूच देणार नाही. त्याचा पूर्ण नि:पात केल्याशिवाय ते अशक्य आहे. असे विश्लेषण

डॉ. आंबेडकर करतात भारतातील माणसाने मार्क्सबद्दल आपले विचार एकदम घट्ट करून ठेवले आहेत ते असे की, मार्क्सवादाने जातिसंस्थेबद्दल मुळीच विचार केलेला नाही. असे असले तरी डॉ. रावसाहेब कसबे म्हणतात की, या मंडळींच्या मनातील समज हे नुसते गैरसमज नाहीत तर ही त्यांनी स्वत:च स्वत:ची आणि पर्यायाने त्यांच्या चळवळीची करून घेतलेली अक्षम्य फसवणूक आहे. 'दास कॅपिटल' मध्येही याबाबतचे जवळजवळ पन्नास संदर्भ दिलेले आहेत.

# संदर्भ टीपा

१. डॉ. कसबे रावसाहेब, **आंबेडकर आणि मार्क्स**, सुगावा प्रकाशन, दु.आ. नोव्हेबर २००६, पान २७५.

२. शिंदे गौतम (अनु.), **डॉ. आंबेडकर बाबासाहेब**, पान ८.

३. **तत्रेव,** पान १३.

४. गायकवाड सुधाकर, **डॉ. रावसाहेब कसबे: एक मूल्यमापन,** सुमेध प्रकाशन, पुणे, डिसेंबर २००७, पान ६.

५. डॉ. आंबेडकर बाबासाहेब, **ॲनिहिलेशन ऑफ कास्ट**, भिमपत्रिका, पान ३१.

६. डॉ. कसबे रावसाहेब, **आंबेडकरवाद: तत्त्व आणि व्यवहार,** सुगावा प्रकाशन, दु.आ. २००४, पान २०.

७. **तत्रेव,** पान २७.

८. डॉ. आंबेडकर बाबासाहेब, **स्टेट ॲन्ड मायनॉरिटीज,** Thacker, मुंबई, १९४७.

९. **उनि,** डॉ. कसबे रावसाहेब, पान ३११.

१०. डॉ. आंबेडकर बाबासाहेब, **रानडे, गांधी आणि जीना**, भिमपत्रिका, जालंदर, पान ६५.

११. **उनि,** डॉ. कसबे रावसाहेब, पान ३६३,३६४.

प्रकरण चौथे

# कार्ल मार्क्सची डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि आंबेडकरवादी चळवळीविषयीची भूमिका

# प्रकरण चौथे

# कार्ल मार्क्सची डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि आंबेडकरवादी चळवळीविषयीची भूमिका

## प्रस्तावना—

मार्क्सच्या तत्त्वचिंतनाची सुरूवातच वास्तवातील माणसापासून झाली. त्याचे निसर्गाशी संबंध कसे होते हे त्यांनी स्पष्ट केले. संपर्ण मानवी विकासक्रमाचा इतिहास हा माणसांनी आपल्या कृतीने आपल्या जीवन अस्तित्वाला पोषक ठरेल अशा रीतीने, निसर्गात केलेल्या बदलांचा तपशील आहे. मानव हा प्राणीसृष्टीपासून त्यांच्यात असलेल्या जाणीवेमुळे, धर्मामुळे किंवा अन्य कोणत्याही कारणामुळे वेगळा आहे असे आपण म्हणू शकतो. परंतु माणसाने आपल्या शरीररचनेच्या मर्यादेत आपल्या चरितार्थाची साधने स्वत:च निर्माण केली. ही प्राणीसृष्टी आणि मानवसृष्टी यातील व्यवच्छेदक रेषा आहे. माणसांनी आपल्या चरितार्थाची साधने स्वत:च निर्माण करून अप्रत्यक्षपणे आपल्या वास्तविक भौतिक जीवनाची निर्मिती केली. मार्क्स यांनी माणूस आणि समाज यांच्याविषयी जे सूत्रबद्ध आणि सुसंगत विचार त्यांच्या 'इकॉनॉमिक ॲण्ड पोलिटीकल मॅन्युस्क्रिप्ट' पासून ते नंतरच्या 'कॅपिटल'पर्यंतच्या लिखानात व्यक्त केलें आहेत. त्यात 'माणूस' हा त्याच्या स्वत:च्या इतिहासाचा आणि स्वत:चाही निर्माता आहे हेच मुख्य सूत्र आहे.

"मूळात मार्क्सवाद हे एक तत्त्वज्ञान आहे आणि तत्त्वज्ञान म्हटले की त्यात क्लिष्टता ही यायचीच असा सर्वसाधाण गैरसमज असतो. मुळात कोणतेही तत्त्वज्ञान रूक्ष

वा निरस नसते तर त्यांच्या मांडणीवर बरेच काही अवलंबून असते.” [१] मार्क्सवादाची मांडणी सर्वप्रथम कार्ल मार्क्स यांनी फ्रेड्रिक एंगल्स यांच्या सहाय्याने केली. विशिष्ट परिस्थिती (औद्योगिक क्रांती) मार्क्सवादी तत्त्वज्ञान निर्मितीस कारणीभूत ठरली. १८ व्या शतकाच्या मध्यावर आधुनिक कारखान्यांची निर्मिती झाली. या कारखान्यात बेभरवशाच्या शेतीला कंटाळेल्या शेतकऱ्यांना काम मिळू लागले. ते कामगार बनले परंतु थोडयाच कालावधीमध्ये हेच कारखाने शोषणाचे केंद्र बनले. जास्तीत जास्त काम करून घेऊन कमीत कमी मजूरी दयायला सुरूवात झाली. या पिळवणूकीमुळे कारखानदार वर्गाची (भांडवलदार वर्गाची) श्रीमंती खूप मोठया प्रमाणात वाढली. भांडवलदारांच्या पाठिंब्यावर निवडून आलेल्या सरकारने देखील कामगार वर्गाच्या चळवळी दडपून टाकायला सुरूवात केली. या परिस्थितीत कामगार वर्गाच्या दैन्याला वाचा फोडण्यासाठी, त्यांचे शोषण थाबविण्यासाठी अनेक कल्पना, अनेक सिद्धांत पुढे आले आणि हे सिद्धांत पुढे आयुष्यभर कामगारांच्या प्रश्नांना तोंड देत आहेत. कारखानदार आपला नफा वाढविण्यासाठी हरतऱ्हेचे प्रयत्न करतो. मजूरी कमी करून कामाचे तास वाढवितो. अधिकाधिक यंत्रे आणतो व जास्तीत जास्त उत्पादन निर्माण करण्याचा प्रयत्न करतो लोकांची क्रयशक्ती विचारात घेतली जात नाही. कामगार मग बेकार होतात व कामगारांमध्ये मग अराजक माजते. “जगातले दु:ख, दैन्य दूर करण्यासाठी प्रयत्नशील असणारे कार्यकर्ते, सुधारक, संत महात्मे व कम्युनिस्ट या सर्वांचे ध्येय एकच आहे. जगातल्या दु:खाने, दैन्याने, पिळवणूकीने हे सर्वजण व्यथीत झाले आहेत . या सर्वांना हे जग चांगले बनवायचे आहे. या जगातले दु:ख नाहीसे करायचे आहे. या जगातील पिळवणूक नाहीशी करायची आहे.” [२] कॉ. किशोर ढमाले यांनी असे सांगितले की आंबेडकरी चळवळीने जे जे प्रश्न लढयासाठी घेतले त्या लढयात त्यावेळी कम्युनिस्ट उतरले नाहीत. कम्युनिस्टांच्या नाकर्तेपणाचाच हा परिणाम आहे. झापडबंद वर्गवादाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी

विरोध केला पण कम्युनिस्टांनी त्याकडे दुर्लक्ष केले त्यामुळे कम्युनिस्ट चळवळ ही कुंठित झाली व आंबेडकरवादाच्या विरोधात प्रचार सुरू केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्नही असेच होते. कारण समाजातील जातीयता रद्द करण्यासाठी, जातीसंस्थेचे उच्चाटन करण्यासाठीचे ध्येय ठरविले होते. कनिष्ठ जाती वरिष्ठ जातीच्या जाचाला कंटाळले होते, व्यथित झाले होते. ही जातीयता संपवून संपूर्ण भारत आणि जग समानतेच्या पायावर उभे करून आदर्श बनवायचे होते यासाठी पिळवणूक नाहीशी करायची असल्याने अनेक सामाजिक आंदोलने उभी केली होती. कार्ल मार्क्सचा लढा वर्गाचा आहे आणि डॉ. बाबासाहेबांचा लढा जातीचा आहे असे अनेक विचारवंत म्हणतात. प्राचार्य म.ना.कांबळे यांनी आपल्या मुलाखतीमध्ये असे स्पष्ट केले की, डॉ. रावसाहेब कसबे यांच्याही अगोदर समन्वयाचे विचार भदंत आनंद कौसल्यायन यांनी मांडलेले आहेत. डॉ. कसबे यांच्या विचारांची मांडणी पाहता ते आंबेडकरवादापेक्षा मार्क्सवादाच्या अधिक जवळ आहेत असे म्हटले. शोषणमुक्त, सुखी जग निर्माण करण्याच्या अशा सर्व उपायांचा इतिहास मार्क्स आणि एंजल्स यांनी अभ्यासला. मार्क्सवादी विचार म्हणजे ते कोणत्या तत्त्वांशी सांगड घालणारे आहे. ते आपणास पुढील अभ्यासातून समजते. कॉ. प्रसाद सावंत यांच्या मते, “कारखाने व जमिनी यांच्यावरील कारखानदारांची व जमीनदारांची खाजगी मालकी हेच कष्टकऱ्यांचे खरे कारण आहे. भांडवलदारांच्या खाजगी मालकीच्या रक्षणासाठी कायदेमंडळ, प्रशासन, न्यायालये, पोलीस, सैन्य वगैरे सत्तेचे भाग कार्यरत आहेत. त्यामुळे कष्टकऱ्यांचे दु:ख संपवण्यासाठी कारखानदारांची जमीनदारांची खाजगी मालकी संपली पाहिजे, त्यासाठी कष्टकऱ्यांच्या हातात सत्ता येणे आवश्यक आहे. कष्टकरी वर्गाला त्याच संघर्षातून जाणीव होऊ लागली आहे. या जाणीवेतून साम्यवादाचे (कम्युनिझम)चे विज्ञान जन्माला आले. या विज्ञानाने ‘समाज बदलाचे नियम’ अभ्यासून कष्टकऱ्यांच्या उज्वल राज्याचे भाकीत केले. या

भाकीताची चुणूक सोवियत युनियन, चीन आदि देशात दिसली. परंतु इतर सर्व विज्ञानाप्रमाणे हे कम्युनिझमचे विज्ञानदेखील परिपूर्ण नाही. ते देखील विकसीत होत आहे."[३]

'मार्क्सवादी' नेमकी कोणास म्हणावे याविषयीचा संभ्रम वरील विवेचनावरून दूर होण्यास मदत होते. आपणास ही परिस्थिती डॉ. रावसाहेब कसबे मार्क्सवादी विचार शंभर टक्के स्वीकारणारे आहेत की काय याविषयीची वास्तव माहिती कळण्यास मदत होते. क्रांतिकारक म्हणून माणसाचा जन्म होत नाही तर परिस्थिती त्याला क्रांतिकारक बनविते. शोषणाविरूद्धचा प्रत्येक लढा कामगारांची, प्रशिक्षण पाठशाळा असते. याबरोबरच क्रांती फावल्या वेळात करण्याची गोष्टही नाही. कष्टकरी, कामगार, मजूर बांधवांच्या पवित्र रक्ताने लाल झालेला झेंडा उंचावण्याचा सतत प्रयत्न कामगार वर्ग करत आहे. याचा संदर्भ घेवूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर 'आंबेडकरवादी' तत्त्वज्ञान मांडतात. डॉ. आंबेडकरांनी मार्क्सवादी विचारसरणीला विरोधही केलेला दिसून येतो. ही स्थिती लक्षात घेतली तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार मार्क्सवादी विचारधारेतून जातात का? या प्रश्नाचा विचार करावा लागतो. डॉ. रावसाहेब कसबे मार्क्सवाद आणि आंबेडकरवाद या विषयचीचे चिंतन करतात. त्यादृष्टीने आपणास त्यांचे नवीन प्रस्तावनेसह लिहिलेले पुस्तक 'आंबेडकर आणि मार्क्स' अभ्यासणे आवश्यक होते. सदर पुस्तकातील विभाग तीन मध्ये डॉ. रावसाहेब कसबे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची साम्यवादासंबंधीची भूमिका आणि मार्क्सवादाची ओळख विशद केली आहे. हे लिखान मार्क्सवादी चळवळीचे डॉ. आंबेडकर आणि आंबेडकरवादी चळवळीविषयीचे मत अजमावून पाहण्यासाठी उपयुक्त ठरते. डॉ. कसबे कर्मठ आंबेडकरवादी नाहीत. त्यांनी जेवढे लिखान केले त्यात त्यांनी आंबेडकरवादाला इतर विचारांची जोड देण्याची गरज दाखविली आहे असे प्रतिपादन प्राचार्य म.ना.कांबळे यांनी दिनांक २६ मार्च २००९ रोजी मुलाखतीत सांगितले.

डॉ. रावसाहेब कसबे यांच्या मते कम्युनिस्टांनी आणि मार्क्सवादयांनी नवीन पद्धतीने विचार करायला सुरूवात करायला हवी. समाजवादी चळवळीतील नेते सत्तेच्या स्वप्नात मशगूल आहेत. या मार्क्सवादी तत्त्वज्ञानाला एक समर्थ राजकीय संकल्पना मानले जाते. ज्याप्रमाणे आंबेडकरवाद या राजकीय संकल्पनेने समाजातील जातीयतेच्या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी प्रयत्न केले त्याप्रामाणेच मार्क्सवादी तत्त्वज्ञानाने केवळ 'वर्ग' महत्त्वाचे न मानता 'जात' ही महत्त्वाची मानली पाहिजे. परंतु डॉ. कसबे यांच्या मते, "प्रत्यक्ष कृतीविना विचार वांझोटा असतो याचे भान सतत जागरूक असावे लागते. मार्क्स आणि आंबेडकरांच्या नावाने सुरू असलेल्या विविध चळवळीत या भानाच्या अभावाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे ही चिंतेची  बाब आहे" आंबेडकरांबरोबरच तत्कालीन परिस्थितीत कार्ल मार्क्स सुद्धा प्रागतिक चळवळीतील तरूणांच्या आणि तरूण लेखक—कवींच्या जिव्हाळ्याचे आणि आकर्षणाचे विषय होते व पाहता पाहता मार्क्सवादी तत्त्वज्ञानाला एक तृतीयांश जगाने वास्तवात आणले. परंतु दुसरीकरे सृजनशील विचारांची सामाजिक क्षेत्रांतून हकालपटटी होत होती. रशियात उद्‌भवलेल्या परिस्थितीत शब्द आणि कृती, विचार आणि व्यवहार यात ताळमेळ राहिला नव्हता. २० व्या शतकातील मार्क्सवादी चळवळीविषयीचा दृष्टीकोन तपासता आपल्या सहज लक्षात येते की मार्क्सवादी चळवळीपासून कोणतीही चळवळ अलिप्त राहू शकत नव्हती. मग ती पंडितांची, शोषितांची असो वा अथवा स्त्रियांची चळवळ असो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर खऱ्या अर्थाने १९२४ पासून भारतीय अस्पृश्य वर्गाचे नेतृत्व करीत होते. भारतातील अस्पृश्य वर्ग हा खऱ्या अर्थाने शोषित आणि पिडित होता. त्यांच्या मुक्ततेसाठी 'मार्क्सवाद' देखील उपयोगी पडू शकत होता. म्हणजेच शोषित समाजाला पिळवणूकीतून बाहेर काढण्यासाठी एक साधन म्हणून मार्क्सवाद उपयुक्त पडू शकत होता. याविषयीचे सविस्तर विवेचन डॉ. रावसाहेब कसबे यांनी १९९३ साली 'साहित्य आणि संस्कृती

मंडळा'तर्फे प्रसिद्ध झालेल्या बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथातील 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे समाजवादविषयक चिंतन' या निबंधात केले आहे. १९८७ साली महाराष्ट्र शासनाने बाबासहेबांचे काही अप्रकाशित साहित्य Dr. Babasaheb Ambedkar writing and speeches च्या तिसऱ्या खंडात प्रकाशित केले. त्यातील 'Buddha or Karl Marx' हा निबंध या निमित्ताने महत्त्वाचा वाटतो. त्यामध्ये रशियाबद्दलचे मत मांडून ते बुद्ध आणि मार्क्स यांची तुलना केली आहे. ते म्हणतात, "आपली सर्वसाधारणपणे अशी समजूत असते की, 'बुद्ध आणि मार्क्स' ही तर परस्पर दोन टोके. एकाने जडतत्त्वाला प्राधान्य देऊन विचार केला नाही तर दुसऱ्याने आपल्या विचारांचा आधारच जडतत्त्व मानला. एकाने व्यक्तीच्या मुक्तीचा मार्ग सांगितला तर दुसऱ्याने समाजमुक्तीचा. एकाला प्राथमिक गणसमाजातील लोकशाहीचे आकर्षण होते तर दुसरा राज्यच विसरून जाण्याचे स्वप्न पाहत होता. एकाने मानवी मनाचा विविधांगांनी शोध घेऊन मनाची मलिनता नष्ट करण्यासाठी ध्यानाचा मार्ग सांगितला, तर दुसऱ्याने मनाला जडतत्त्वाची आनुषंगिक उत्पत्ती, बाय प्रॉडक्ट मानले. एकाने आयुष्यभर धम्म प्रचार केला तर दुसऱ्याने धर्माला अफूची गोळी मानली. हा परस्पर विरोध अधिक लांबवता येईल. अशा या परस्पर विरूद्ध दोन टोकांचा एकत्रित विचार करण्याचे धाडस बाबासाहेबांनी केले. याचाच अर्थ बाबासाहेबांची या दोघांकडे बघण्याची दृष्टी परंपरेपेक्षा निश्चितच वेगळी होती." [४]

भगवान बुद्धांनी वर्ग संघर्षासंबंधी जो दृष्टीकोन सांगितला तो दृष्टीकोन त्याच्या अष्टांग मार्गातून स्पष्ट होतो व वर्गसंघर्षच दु:खाचे कारण असतो या गोष्टीला मान्यता देतो. डॉ. आंबेडकरांच्या भाषेत, "बुद्ध आणि मार्क्स यांची भाषा तेवढी भिन्न आहे. परंतु अर्थ मात्र एकच आहे जर मार्क्स दु:खासाठी 'पिळवणूक' हा शब्द वापरतो तर बुद्ध मार्क्सपासून वेगळा नाही." डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना बुद्ध आणि मार्क्स यांच्यात

साधर्म्य आढळत होते. परंतु व्यवहारात या दोघांत मात्र त्यांना मतभिन्नता दिसत होती. म्हणून त्यांनी साधनांची भिन्नता स्पष्ट केली आहे.

कम्युनिस्ट हे हिंसा आणि कामगार वर्गाची हुकूमशाही या दोन गोष्टी साम्यवादाच्या प्रस्थापनेसाठी आवश्यक मानतात. डॉ. आंबेडकर बौद्ध धर्माच्या परिभाषेत साम्यवाद समजावून सांगण्याचा प्रयत्न करीत होते. डॉ. कसबे आपल्या आंबेडकर 'आंबेडकर आणि मार्क्स' या पुस्तकात पान नं. ३६ वर सांगतात की, 'आंबेडकर बुद्धाच्या साम्यवादाचा जितका सूक्ष्मपणे उलगडा करून सांगतात तितका मार्क्सचा सांगत नाहीत.' ते म्हणतात, 'कम्युनिस्टांचा व्यवहार डोळ्यासमोर ठेवून एकूण समाजवादाच्या किंवा मार्क्सवादाच्या चिंतनाला जसे आपल्याला बाद ठरविता येणार नाही, तसेच स्वत:ला बौद्ध मानणाऱ्या व्यक्तींचा गैरव्यवहार बघून बौद्ध चिंतनालाही बाद ठरविता येणार नाही. साम्यवादामध्ये हिंसेला महत्त्व दिल्याने बुद्धाचे तत्त्वज्ञान या मार्गाने जाणारे नाही हे स्पष्टपणे जाणवते. बळाचा वापर काढून घेतला तर साम्यवादी व्यवस्थेचे संरक्षण फक्त धर्मच करू शकेन आणि कम्युनिस्ट तर धर्माला प्रचंड विरोध करतात. म्हणजेच डॉ. रावसाहेब कसबे यांच्या मते भांडवलशाहीच्या आक्रमक पवित्र्यामुळे विकलांग होत चाललेली साम्यवादी व्यवस्था आणि ऱ्हास पावत असलेला बौद्ध धर्म या दोघांना आधार देण्यासाठी आणि त्यांच्यात नवचैतन्य निर्माण करण्यासाठी आज नव्या चिंतनाची आवश्यकता आहे. दलित चळवळीच्या सुरू झालेल्या समीक्षेच्या प्रक्रियेतच आंबेडकरांच्या बरोबर कार्ल मार्क्सचेही नाव पुढे आले. रिपब्लिकन पक्षाचे नेते जातींच्या किल्ल्यातच सुरक्षित राहणे पसंत करीत असल्यामुळे ते वर्गीय भूमिकेच्या विरूद्ध होते. परंतु पॅंथरची भमिका वर्गीय बनली अशी टीका झाली कारण एका बाजूला दलित पॅंथर आणि दुसऱ्या बाजूला रिपब्लिकन गट अशी परिस्थिती होती. हा गट म्हणजे कम्युनिस्ट विरोधी गट म्हणून पुढे आला होता. तसे पाहिले तर मार्क्सवादी ही एक सैद्धांतिक विचारधारा आहे गेल्या शतकाच्या मध्य व उत्तर

भागात कार्ल मार्क्स (१८१८– १८८३) फ्रेड्रिक एंगल्सच्या (१८२०–१८९५) मदतीने तिची मांडणी केली म्हणून ती मार्क्सच्या नावाने ओळखली जाते. ही सैद्धांतिक विचारधारा धर्मश्रद्धा, वंशप्रेम व वीरपूजा, व्यक्तीगत कल अगर मनोराज्यवादी स्वप्ने यांच्या विरूद्ध आहे. 'मार्क्सवाद म्हणजे काय?' लेखक एमिल बर्न्सच्या पुस्तकाचा अनुवाद सरला कारखानीस यांनी केला आहे. नवव्या आवृत्तीमध्ये पान नं. २ वर स्पष्ट म्हटले आहे की, "मार्क्सवादाला मान्यता प्राप्त झाली ती तो सत्य आहे म्हणून. जीवनाशी संबंध नसलेल्या अमूर्त नैतिक कल्पनांच्या आधारावर त्याने मान्यता मिळविलेली नाही आणि तो सत्य आहे म्हणूनच आजच्या जगात अनेकांना जी दु:खे व यातना सहन कराव्या लागतात. त्यातून मानव जातीला कायमचे मुक्त करण्यासाठी आणि अधिक उच्च प्रकारच्या समाजात स्वत:चा पूर्ण विकास करून घेता यावा म्हणून सर्व स्त्री–पुरूषांना मदत करण्यासाठी मार्क्सवादाचा उपयोग करता येईल आणि तसा तो केला पाहिजे." जात आणि वर्ग या मुद्दयांवरून आंबेडकरवाद आणि मार्क्सवाद यामध्ये विवाद आहे यामधील वर्गाबाबतचे विश्लेषण करताना, "एकाच पद्धतीने उपजीविका चालविणारे समाजाचे विभाग म्हणजे वर्ग" असा अर्थ सांगितला आहे आणि या तत्त्वज्ञानामध्ये क्रांतीला विशेष महत्त्व दिले आहे. नफा हेच वर्गसंघर्षाचे मूळ मानले गेले. राज्य संस्थेला दमनाचे साधन मानले गेले. मार्क्सवादयांच्या मते कायदा व सुव्यवस्था टिकविणे म्हणजेच प्रस्थापित समाजव्यवस्था टिकविणे होय व सत्ताधारी वर्गाच्या बाजूने कार्य करणारी दडपशाहीची यंत्रणा हे राज्यव्यवस्थेचे एक आवश्यक लक्षण असते. याबरेबरच "जोपर्यंत मानवी समाजाची वर्गामध्ये विभागणी कायम आहे, तोपर्यंत वर्गलढे व राज्यसंस्था इतिहासात कायम राहतील." [५] क्रांतीची फलश्रुती समाजवाद नसते तर समाजवादाच्या उभारणीसाठी कामगार सत्तेची स्थापना असते. ज्याठिकाणी नफा हेच अंतिम उद्दिष्ट असते तेथे अराजक निर्माण होतेच. समाजवाद ही साम्यवादाच्या अगोदरची पायरी मानली जाते व या अवस्थेत 'जो

काम करणार नाही त्याला खायला मिळणार नाही', **'प्रत्येकाकडून त्याच्या शक्तीनुसार आणि प्रत्येकाला त्याच्या गरजेनुसार'** या तत्त्वाचा जेव्हा आपण विचार करू तेव्हा साम्यवादाचे (कम्युनिझचे) समाजवादापासून (सोशलिझमपासून) असलेले वेगळेपण स्पष्ट होऊ लागते. थोडक्यात मार्क्सवाद आपले सर्व सिद्धांत जगाबद्दलच्या भौतिकवादी विचारांवर आधारतो. मार्क्सवादी दृष्टीकोन मूलतः शास्त्रीय आहे. सत्यावर आधारलेला आहे. मानवी समाजासहित सर्व जगाबद्दलच्या हया दृष्टीकोना मुळे मार्क्सवादाचे इतर सर्व दृष्टीकोनांहून असलेले वेगळेपण उठावदारपणे दिसून येते. म्हणून असे म्हटले गेले की 'मार्क्सवाद' हे केवळ पुस्तकी शास्त्र नाही तर जग बदलण्यासाठी माणसाने उपयोगात आणावयाचे ज्ञान आहे.

"...........परंतु ज्या देशात कार्य मार्क्सवादामप्रमाणे चालते, तेथे युद्धाला स्थान नाही, तेथे उद्योगधंदे व शेती उत्पादन द्रुत गतीने पुढे धावत आहे, सामाजिक प्रगतीचा तोच आधार आहे. सोविएत युनियनमध्ये समाजवादाकडून साम्यवादाकडे होणाऱ्या परिवर्तनाच्या पहिल्या खुणा प्रचंड रचनात्मक योजनांच्या रूपाने दिसत आहेत. सुखी व संपन्न भवितव्याच्या आशा व विश्वास तेथील जनतेला स्फर्ती देत आहे." [६] मूळात मार्क्सवादी तत्त्वज्ञान हे वरीलप्रमाणे सैद्धांतिक पातळीवर मांडले गेले असले तरी मार्क्सवादी चळवळीचे आंबेडकरवादी चळवळीशी काय नाते आहे या विषयीचे मूल्यमापन किंवा अभ्यास, चिंतन करण्याचा हेतू महत्त्वाचा वाटतो.

विचारवेध संमेलन अध्यक्षीय भाषणे खंड १ या किशोर बेडकिहाळ यांनी केलेल्या संकलनामध्ये प्रा. डॉ. भास्कर लक्ष्मण भोळे यांनी विसावे शतक आणि भारतातील समता विचार या विषयावर जे भाषण दिले त्या भाषणामध्ये समतेबद्दल भूमिका विशद करताना पुनरूज्जीवनवादी, साम्यवादी, समाजवादी, उदार मतवादी, गांधी–सर्वोदयवादी, आंबेडकरवादी असे अनेक प्रवाह आपल्या भूमिकांसह पुढे आलेले या शतकाने पाहिले

आहेत तसेच रशियन क्रांतीने प्रभावित झालेल्या अनेक भारतीय तरूणांना मार्क्सवादाचे आकर्षण वाटले. १९२१ मध्ये भारतीय साम्यवादी पक्षाची स्थापना मार्क्सवादयांनी केली. आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या भांडवलशाही वर्चस्वाचा मुकाबला आंतरराष्ट्रीय साम्यवादी चळवळीच्या मदतीनेच केला जाऊ शकेल. भारतीय स्वातंत्र्य लढयाचे नेतृत्व करणाऱ्या कॉंग्रेस चळवळीशी कसे संबंध ठेवावेत यासंबंधी वेळोवेळी साम्यवादी नेत्यांत मतभेद झाले असले तरी भारतातील सामाजिक स्तरांचे सर्वंगीण शोषण हे विषय साम्यवादयांच्या कार्यक्रम पत्रिकेवर त्याकाळी तरी ठळकपणे आलेच नव्हते. थोडयाफार सवलती अभिजनांना देण्यात आल्या व जनलढे दडपले गेले. या ठिकाणी आंबेडकरवादी चळवळीचे योगदान महत्त्वाचे वाटणे साहजिकच आहे. शंकरराव देवांपासून जयप्रकाश नारायण यांच्यापर्यंतच्या सर्वच समाजवाद्यांनी सामाजिक समस्यांच्या विशेषत: आर्थिक–सामाजिक विषमता आणि अस्पृश्यता सोडवणूकीसाठी मार्क्सवाद आणि गांधीवाद यांच्यातील व्यूह नीतीचा समन्वय घालण्याची गरज स्पष्ट केली. दलित मागासवर्गीय बहुजनांच्या दृष्टीने समाजवादी चळवळ कायम शहरी–ब्राम्हणी मध्यमवर्गीयच राहिली.

भारतासाठी समाजवादाचा संदर्भ आर्थिक पेक्षा सामाजिक अधिक आहे यावर आंबेडकरवादी विचारप्रवाहाने भर दिला आहे. यातून सामाजिक अन्यायाची पळेमुळे किती खोलवर गेलेली आहेत याचा ऐतिहासिक व समाजशास्त्रीय छडा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना लावायचा होता. जातिव्यवस्था मोडून समाजाधिष्ठित समाजाकडे जाण्याच्या मार्गाचीही चर्चा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लेखनातून होते. डॉ. भोळे म्हणतात, “मार्क्सवादापेक्षा बौद्धधर्माचे श्रेष्ठत्व डॉ. आंबेडकर सांगतात. पण ते सिद्ध होण्यासाठी मार्क्सवादाच्या उद्दिष्टांच्या कसोटयांवर त्याला कसे उतरावे लागेल हेही ते स्पष्ट करतात” [७] जातीसंस्थेच्या उगमविकासासंबंधी १९१६ साली जे मार्क्सवादी विश्लेषण त्यांनी केले याचा अर्थ आंबेडकर सुरूवातीला मार्क्सवादी होते असा जर कोणी काढला तर तो

विपर्यस्त होईल. फक्त परिस्थितीच्या मूल्यमापनासाठी मार्क्सवादी दृष्टीच्या उपयोगाचे महत्त्व आहे. कार्ल मार्क्स आणि मार्क्सवादाचे सूप्त आकर्षण आंबेडकरांच्या संपूर्ण जीवनात भारतीय कम्युनिस्टांच्या विरोधात जाऊनही टवटवीत राहिले आहे कारण कम्युनिस्ट जातीसंस्थेचा विचारच करीत नाही. डॉ. रावसाहेब कसबे यांनी आपल्या 'आंबेडकर आणि मार्क्स' या पुस्तकात पान नं. ३२४ वर असे म्हटले की, "डॉ. आंबेडकर मार्क्सचा ऐतिहासिक भौतिकवाद पूर्णपणे नाकारताना कधीच दिसत नाहीत." हिंसे—अहिंसेसंबंधी बाबासाहेब आंबेडकरांनी 'बुद्ध आणि त्याचा धम्म'च्या चौथ्या भागात चर्चा केली आहे. "भारतातील सामान्य विचारी माणसाच्या मनात मार्क्सबद्दल एक गृहितक घट्ट बसलेले आहे आणि ते म्हणजे कार्ल मार्क्सने भारतापुढील प्रश्नांसंबंधी आजिबात विचार केलेला नाही. भारतातील दलित चळवळीतील कार्यकर्त्यांचाही असा समज आहे की भारतातील जातिसस्थेबद्दल कार्ल मार्क्सने, मुळीच विचार केलेला नाही आणि कम्युनिस्टविरोधी पुरोगामी चळवळींना भारतापुढील प्रश्नांची सोडवणूक करताना मार्क्सचा विचार करणे संयुक्तिक वाटत नाही." [८] डॉ. रावसाहेब कसबे यांनी आपल्या पुस्तकात कार्ल मार्क्सच्या 'दास कफपिटल'चा संदर्भ दिला ते म्हणतात, "कार्ल मार्क्सने फ्रेडरिक एंजल्सशी केलेल्या पत्रव्यवहारात भारतासंबंधीचे आणि भारतापुढील प्रश्नांसबंधीचे अनेक संदर्भ आहेत. इतकेच नव्हे तर कार्ल मार्क्सच्या सर्वात महत्त्वाच्या मानल्या गेलेल्या लिखानापैकी एका म्हणजे 'दास कॅपिटल' या ग्रंथातही भारतासंबंधीचे जवळजवळ पन्नास संदर्भ आहेत. ही वस्तुस्थिती असताना कार्ल मार्क्सबद्दल असे समज का निर्माण व्हावेत हे एक आश्चर्यच आहे. मार्क्सविरूद्ध वेळी—अवेळी दंड थोपटून उभे राहणे हेच ज्यांच्या जीवनाचे आणि अस्तित्वाचे एकमेव प्रयोजन आहे अशा व्यक्ती, त्यांच्या संघटना आणि संस्था व प्रसारमाध्यमाची विविध साधने यांचा विचार या संदर्भात करण्याचे काही कारण नाही." यावरून डॉ. रावसाहेब कसबे यांनी मार्क्सवादाचे मूल्यमापन करताना कोणता हेतू

समोर ठेवला हे स्पष्ट होते. आंबेडकरवादी विचार भारतीय सामाजिक प्रश्न विशेषतः जातीयेतेचा प्रश्न सोडविण्यासाठी कसे उपयोगी ठरतात याविषयी डॉ. कसबे यांनी सविस्तर वर्णन आपल्या वेगवेगळ्या ग्रंथांत केलेले दिसून येते. परंतु या बरोबरच ते मार्क्सवादी विचारांकडे कसे पाहतात हेही या ठिकाणी स्पष्ट होते. आंबेडकरी विचारांना 'मार्क्सवादी' विचारांची जोड मिळाली तर सामाजिक स्थितीत परिवर्तन अपेक्षित आहे म्हणूनच रावसाहेब कसबे यांनी 'दास कॅपिटल'वर श्रद्धा दाखविली आहे. एका बाजूला दलितांच्या मते भारतीय जाती या केवळ धर्मांतराने जातील अशी मांडणी पुढे आली तर दुसऱ्या बाजूला भारतातील जाती केवळ आर्थिक परिवर्तनाने जातील अशी मांडणी डाव्या चळवळीने केली. परंतु दोन्ही मांडणीतून मात्र ठोस कार्यक्रम पुढे आला नाही. तर ती श्रमिकांचीच हवाबंद विभागणी आहे असे मानतात आणि मार्क्स जन्माधिष्ठित श्रमविभागणी म्हणजे जात असा विचार समोर ठेवूनच लिखान झाले. डॉ. कसबे यांनी अशी भूमिका मांडली की श्रमिकांची हवाबंद विभागणी वंशपरंपरागत किंवा माणसामाणसातील जन्माधिष्ठित फरक मानल्याशिवाय होऊच शकत नाही. तसे नसते तर हिंदू धूर्म ग्रंथांनी वर्ण संकराची एवढी धास्ती घेतलीच नसती आणि बाबासाहेब आंबेडकरांना हिंदू धर्माची एवढी कठोर समीक्षा करण्याचे व धर्मांतर करण्याचे कारण नव्हते. १९२४ पासून खऱ्या अर्थाने दलित चळवळ सुरू झाली. या चळवळीचा विकास होत असताना भारतीय कम्युनिस्टांचे या चळवळीकडे दुर्लक्ष झाले. याचे कारण असे की, मार्क्सवादयांनी जात हा इमला मानला व समाजाचा आर्थिक पाया बदलला की इमला आपोआप तुटेल असा सिद्धांत मांडला. भारतीय परिस्थिती समजून घेताना डॉ. कसबे म्हणतात की, दोन प्रमुख चूका अशा झाल्या की 'पाया ' बदलला की 'इमला' आपोआप बदलतो हा त्यांचा समजच चूकीचा होता. 'पाया' बदलला तरी 'इमल्याचे' अनेक अवशेष तसेच शिल्लक राहतात व ते 'जाणीवपूर्वक' नष्ट करावे लागतात. हा खरा मार्क्सवादी विचार आहे.

दुसऱ्या चूकीबाबत मांडणी करताना या बदलत्या वास्तवाच्या आकलनासंबंधीची परिस्थिती आहे. भारतीय उत्पादन प्रक्रियेत जात गुंतलेली असल्यामुळे किंबहुना ती उत्पादन शक्तीच रूपांतरित झालेली असल्यामुळे तिला इमला मानता येणार नाही. समाजातील समुदायात सांस्कृतिक पोकळी भरून काढण्यासाठी इमल्यावर भर देऊन समाज प्रबोधनाची व क्रांतीनंतर करावयाच्या 'जाणीवपूर्वक कृतीची' सुरूवात आताच करावी लागेल असा विचार आणि आंबेडकरांची दृष्टी यांच्या समन्वयी शक्तीत प्रचंड शक्ती आहे आणि या शक्तीचा उपयोग केला तरच आंबेडकरी चळवळीला जातीच्या कोशातून बाहेर पडण्याचे सामर्थ्य येईल. मार्क्सवाद हे सामाजिक परिवर्तनाचे विज्ञान आहेत. ते एका व्यक्तीला लावून त्याचे मूल्यमापन करणे गैर आहे. याबरोबरच आंबेडकर हे केवळ भारतीय दलितांचे नेते आहेत या भ्रमातून बाहेर आले पाहिजे.

## सारांश—

या प्रकरणामध्ये मार्क्सवादी तत्त्वज्ञानाचा उहापोह करण्यात आला आहे व मार्क्सवादी दृष्टीकोनातून आंबेडकरवादी चळवळीकडे पाहिले आहे. संपर्ण मानवी विकासक्रमाचा इतिहास हा माणसांनी आपल्या कृतीने आपल्या जीवन अस्तित्वाला पोषक ठरेल अशा रीतीने, निसर्गात केलेल्या बदलांचा तपशील आहे. मानव हा प्राणीसृष्टीपासून त्यांच्यात असलेल्या जाणीवेमुळे, धर्मामुळे किंवा अन्य कोणत्याही कारणामुळे वेगळा आहे असे आपण म्हणू शकतो. 'कॅपिटल'पर्यंतच्या लिखानात 'माणूस' हा त्याच्या स्वत:च्या इतिहासाचा आणि स्वत:चाही निर्माता आहे हेच मुख्य सूत्र आहे. मार्क्सवाद हे एक तत्त्वज्ञान आहे. कार्ल मार्क्सचा लढा वर्गाचा आहे आणि डॉ. बाबासाहेबांचा लढा जातीचा आहे. डॉ. रावसाहेब कसबे मार्क्सवाद आणि आंबेडकरवाद या विषयचीचे चिंतन करतात. त्यादृष्टीने आपणास त्यांचे नवीन प्रस्तावनेसह लिहिलेले पुस्तक 'आंबेडकर आणि मार्क्स'

अभ्यासणे आवश्यक होते. सदर पुस्तकातील विभाग तीन मध्ये डॉ. रावसाहेब कसबे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची साम्यवादासंबंधीची भूमिका आणि मार्क्सवादाची ओळख विशद केली आहे. हे लिखान मार्क्सवादी चळवळीचे डॉ. आंबेडकर आणि आंबेडकरवादी चळवळीविषयीचे मत अजमावून पाहण्यासाठी उपयुक्त ठरते.

# संदर्भ टीपा


१. कॉ. सावंत प्रसाद, **मार्क्सवादाची गोष्ट, भाग १**, (डॉ. रेडकर अरविंद—प्रस्तावना), पुरोगामी शिक्षण मंडळ, मुंबई, मे २००७.

२. **तत्रेव,** पान ३३.

३. **तत्रेव,** पान ३५.

४. डॉ. कसबे रावसाहेब, **आंबेडकर आणि मार्क्स**, सुगावा प्रकाशन, दु. आ. नोव्हेंबर २००६, पान ३२.

५. एमेल बर्न्स, कारखानीस सरला (अनु.), **मार्क्सवाद म्हणजे काय?,** लोकवाङ्मय गृह, मुंबई,नववी आवृत्ती, पान ४५.

६. **तत्रेव,** पान ८१.

७. बेडकिहाळ किशोर (संकलन), **विचारवेध संमेलन डॉ. भोळे यांचे अध्यक्षीय भाषण**, सुगावा प्रकाशन, पुणे, पान २४८.

प्रकरण पाचवे

# डॉ. रावसाहेब कसबे यांच्या विचारातील मार्क्स–आंबेडकर वैचारिक समन्वय

# प्रकरण पाचवे

# डॉ. रावसाहेब कसबे यांच्या विचारातील मार्क्स–आंबेडकरांचा वैचारिक समन्वय

## प्रस्तावना–

कार्ल मार्क्स आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना एकत्रित बांधणारे विचारवंत महाराष्ट्रामध्ये तसेच भारतामध्येही खूप कमी आहेत. या दोन्ही तत्त्वचिंतकांना वैचारिक दृष्टीकोनातून एकत्रित बांधण्याचे काम ज्या थोडया विचारवंतांनी केले त्यामध्ये डॉ. रावसाहेब कसबे यांचे नाव सर्वप्रथम पुढे येते. व्यवहारातून मार्क्स–आंबेडकर समन्वयाचा विचार पुढे आला आणि समन्वयाच्या विचारातून व्यवहाराला चालना मिळाली. मार्क्स–आंबेडकर समन्वय विचारामध्ये अमूलाग्र बदल झाला असे म्हणता येत नाही. कारण डॉ. कसबे यांनी समन्वयाचा विचार १९७८ सालाच्या अगोदर मांडावयास हवा होता. तरीही आजच्या काळात वास्तवाला तोंड देताना डॉ. कसबेंचे विचार अत्यंत उपयुक्त वाटतात. समन्वयातूनच मार्क्सवादामुळे आंबेडकरवादाला वैश्विक स्वरूप प्राप्त झाले. आंबेडकर आणि मार्क्स यांचा एकत्रित विचार कर्मठ कम्युनिस्टांना आणि सनातनी दलितांना संतप्त करणारा आहे. परतु डॉ. रावसाहेब कसबे यांच्या मते हे दोघेही पूर्ण कर्मठ किंवा पूर्ण सनातनी राहिलेले नाहीत. आंबेडकर आणि मार्क्स हा विषय अतिशय वादग्रस्त आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे या शतकातील भारताचे एक महान नेते आणि तत्त्वचिंतक मानले गेले. भारतासमोर आज उभ्या असणाऱ्या महत्त्वाच्या प्रश्नांच्या

आकलनासाठी आणि ते सोडविण्यासाठी त्यांच्या विचारधनाचा आणि त्यांनी केलेल्या चळवळीचा नव्या संदर्भात विचार करण्याची आवश्यकता आज अनेक विचारवंतांना वाटत आहे. डॉ. रावसाहेब कसबे यांनी विविध ग्रंथांमधून, भाषणांमधून, मुलाखतींमधून जे विचार मांडले त्या विचारांचे अवलोकन करावयाचे झाल्यास १९५६ साली बाबासाहेब आंबेडकरांचे महापरिनिर्वाण झाले. यांनतर ते थेट १९७० पर्यंतच्या काळात भारतीय राजकारणात एक पोकळी निर्माण झाली होती. १९६५ ते १९७० या पाच वर्षाच्या काळात भारतीय राजकारणातील उजव्या आणि डाव्या राजकीय शक्तीतील संघर्षामुळे गोंधळाची स्थिती झाली होती. या संघर्षाचे प्रतिबिंब आपणास भारतीय समाजजीवनातही पडल्याचे दिसून येते. पंडित नेहरूंनी भारतीय राजकारणाला लोकशाही समाजवादाचा दिलेला पाया टिकविणे महत्त्वाचे मानले जाऊ लागले. उजव्या आणि डाव्या विचारांच्या संघर्षाचे प्रतिबिंब भारतीय समााज जीवनावर पडल्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या साहित्य आणि चळवळीचा अभ्यास करणारा एक विद्यार्थी असल्याने व महाराष्ट्रातील दलित आणि पुरोगामी संघटना आणि चळवळीशी संबधित असल्याने या विषयावर मत मांडण्यासाठी डॉ. रावसाहेब कसबे यांना आग्रह करण्यात आला. फक्त ग्रंथ लिहून समाजऋणातून मुक्त होण्याचा इरादा डॉ. कसबे यांचा नाही. डावे आणि उजवे यांच्यातील संघर्षाचे मूळ शोधत असताना आपणास मार्क्स आणि आंबेडकर या दोन तत्त्वचिंतकांचाही विचार करावाच लागतो. आधुनिक काळात भारतीय समाजव्यवस्था जातीबरोबर वर्गावरही आधारित आहे यामुळे दोन्ही विचारांच्या समन्वयाची आवश्यकता आहेच असे प्राचार्य म. ना.कांबळे यांनी आपल्या मुलाखतीत सांगितले. पुढे ते असेही म्हणतात की, आंबेडकरवादी असल्याशिवाय भारतात मार्क्सवादी होता येत नाही. त्यामुळे डॉ. कसबे हे सुरूवातीला आंबेडकरवादीच होते नंतर मात्र ते मार्क्सवादी विचारांकडे आकर्षित झाले. “मार्क्स बुद्ध का छोटा भाई” असे भदंत आनंद कौशल्यायन यांनी डॉ. कसबे यांच्या

अगोदर स्पष्ट केलेले होते. मात्र त्यांचे आजचे समन्वयवादाचे विचार क्रांतीकारी स्वरूपाचे आहेत. अशाप्रकारचे विश्लेषण प्राचार्य म.ना. कांबळे यांनी केले आहे. डॉ. रावसाहेब कसबे यांच्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित 'ॲनिहिलेशन ऑफ कास्ट', कार्ल मार्क्स व एंजल्सचे 'कम्युनिस्ट मेनिफेस्टो' यांचा विशेष प्रभाव पडला. दया पवार, गंगाधर पानतावणे, दादासाहेब गायकवाड यांच्याबरोबर चर्चा करून त्यांच्याकडून संघर्षाचेही धडे घेतले. विचारांची बैठक तयार होताना संघर्षाचीही जोड असावी लागते त्याचा प्रत्यय डॉ. कसबे यांच्या जीवनात आला आहे.

कार्ल मार्क्स आणि बाबासाहेब आंबेडकर या दोन्हीही युगपुरूषांचा कालावधी वेगवेगळा आहे. या दोनही तत्त्वचिंतकांचे विचार वेगवेगळ्या दिशांना जाणारे आहेत. डॉ. रावसाहेब कसबे यांच्याविषयी विचार करताना आपणास या गोष्टीचाही विचार करावा लागेल की, ते स्वत: दलित कुटुंबात जन्मलेले असल्याने दलित चळवळीला त्यांचे मोठे वैचारिक आणि कृतीशील योगदान लाभले आहे. आंबेडकरवादी प्रवाहाबरोबर डॉ. कसबे यांनी मार्क्सवादी विचार प्रवाहालाही मोठे योगदान दिलेले आहे. कार्ल मार्क्स आणि बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना एकत्रित बांधणारे विचारवंत महाराष्ट्रामध्ये तसेच भारतामध्येही खूप कमी आहेत. या दोन्ही तत्त्वचिंतकांना वैचारिक दृष्टीकोनातून एकत्रित बांधण्याचे काम ज्या थोडया विचारवंतांनी केले त्यामध्ये डॉ. रावसाहेब कसबे यांचे नाव सर्वप्रथम पुढे येते. कॉ.किशोर ढमाले यांनी आपल्या मुलाखतीमध्ये असे स्पष्ट केले की, "व्यवहारातून मार्क्स—आंबेडकर समन्वयाचा विचार पुढे आला आणि समन्वयाच्या विचारातून व्यवहाराला चालना मिळाली." डॉ. रावसाहेब कसबे यांनी १ ऑगस्ट १९८५ रोजी 'आंबेडकर आणि मार्क्स' या पुस्तकाची दुसरी आवृत्ती १२ नोव्हेंबर २००६ रोजी प्रकाशित केली. दुसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने प्रास्ताविकाची नव्याने भर टाकली आहे. परंतु कॉ. किशोर ढमाले यांच्या मते मार्क्स—आंबेडकर समन्वय विचारामध्ये अमूलाग्र

बदल झाला असे म्हणता येत नाही. कारण डॉ. कसबे यांनी समन्वयाचा विचार १९७८ सालाच्या अगोदर मांडावयास हवा होता. तरीही आजच्या काळात वास्तवाला तोंड देताना डॉ. कसबेंचे विचार अत्यंत उपयुक्त वाटतात. समन्वयातूनच मार्क्सवादामुळे आंबेडकरवादाला वैशिक स्वरूप प्राप्त झाले. त्यामुळे डॉ. कसबे यांचे सर्व साहित्य पाहिल्यानंतर ते समन्वयवादाचीच भूमिका घेतात हे स्पष्ट होते.

आंबेडकर आणि मार्क्स हा विषय अतिशय वादग्रस्त आहे. त्यांचा विचार आधारभूत मानून अनेक संस्था संघटना, राष्ट्रीय पक्ष निर्माण झालेले आहेत. आंबेडकर आणि मार्क्स यांचा एकत्रित विचार कर्मठ कम्युनिस्टांना आणि सनातनी दलितांना संतप्त करणारा आहे. परतु डॉ. रावसाहेब कसबे यांच्या मते हे दोघेही पूर्ण कर्मठ किंवा पूर्ण सनातनी राहिलेले नाहीत. बौद्ध धर्मीयांच्या व्यासपीठावर आंबेडकरांनी बुद्धाचा धम्म हा मार्क्सला अभिप्रेत असणारा साम्यवाद प्रस्थापित करण्यासाठी किती उपयुक्त आहे हे सांगितले. “बुद्ध आणि मार्क्स यांच्या विचारातील साम्यस्थळे आणि भेदस्थळे दाखवून दिली, बौद्ध भिक्खूंना आपली कार्ल मार्क्सशी तुलना होण्यासाठी कोणत्या सुधारणा करावयाच्या याचा विचार करायला सांगितले आणि पाश्चिमात्य जग व बौद्ध राष्ट्रातील तरूण पिढी मार्क्सला आपला मुक्तीदाता कसे मानते याची कबुलीही दिली. इतर सर्व धर्मपिठांनी मार्क्सला  बहिष्कृत मानले. परंतु आंबेडकरांनी मार्क्सला बहिष्कृत मानले नाही. मार्क्सवर टीका केली परंतु त्यांचे वैचारिक आणि व्यावहारिक योगदानही मान्य केले. बौद्ध भिक्खूंना बाबासाहेबांनी दिलेल्या इशाऱ्याचा आज भारतीय बौद्धांना विसर पडत आहे. त्यामुळे धर्मपीठांचा दृष्टीकोन बाबासाहेबांच्या नवयान अथवा नवबौद्ध धर्मावरही जबरदस्तीने लादणे आंबेडकरांवर अन्याय करण्यासारखे आहे अशी माझी नम्र समजूत आहे.”[१] १९६२ मध्ये कम्युनिस्ट चीनचे भारतावर आक्रमण झाले होते. या काळात आक्रमक शत्रूच्या विरूद्ध जनमत संघटित करताना कम्युनिस्ट आणि पर्यायाने त्यांचे

तत्त्वज्ञान 'मार्क्सवाद' हे आपल्या राष्ट्राचे शत्रू आहेत अशी परिस्थिती होती. अशा परिथितीतही डॉ. रावसाहेब कसबे यांचा विचारविश्वाचा पाया भक्कम होता. स्वत: आंबेडकरवादी तर होतेच परंतु देशातील, देशाबाहेरील कम्युनिस्टविरोधी वातावरणाचा मोह त्यांना झाला नाही. उलट याचा परिणाम असा झाला की डॉ. कसबे हे चिकित्सक पद्धतीने मार्क्सवादाकडे आकर्षित झाले. बाबासाहेबांनी खाटमांडूच्या भाषणात बुद्ध आणि मार्क्स यांची तुलना समजून घेतली याबरोरच बर्ट्रांड रसेलच्या 'प्रिन्सिपल्स ऑफ सोशल रिन्स्ट्रक्शन'वरील बाबासाहेबांची समीक्षा समजून घेतली आणि त्यानंतर खरे तर मार्क्सवादा संबंधीची दुषित भूमिका डॉ. कसबे यांची हळूहळू विलय पावू लागली. म्हणजे आंबेडकर आणि मार्क्स यांचा एकत्रित विचार करायला डॉ. रावसाहेब कसबे यांनी सुरूवात केली. दलितांचा कोणताही राजकीय पक्ष असेल तर त्या पक्षाला अपयश आले तर त्याचां दोष डॉ. आंबेडकरांना देणे अन्यायकारक आहे त्याच पद्धतीने कम्युनिस्ट पक्षाचे अपयश मार्क्सच्या माथी मारणे अन्यायकारक आहे. परंतु त्या काळात मार्क्सवादाच्या समर्थनार्थ उघडपणे कोणी बोलायला तयार होत नव्हते. १९७१ साली महाडला बौद्ध साहित्य सभेने साहित्य संमेलन घेतले. बाबुराव बागुल अध्यक्षपदी असताना या संमेलनात कम्युनिस्ट मंडळी ही मोठया प्रमाणात होती. 'नवशक्ती'चे वार्ताहर म. द. ताम्हणेकर यांनी गोंधळ घालून या ठिकाणी कम्युनिस्टांचे काय काम आहे? असा जाहीर प्रश्न विचारला. यावेळी प्रचंड गोंधळ निर्माण झाला या गोंधळातच डॉ. रावसाहेब कसबे यांचे बोलण्यासाठी नाव पुकारले. आंबेडकर आणि मार्क्स यांचा एकत्रित विचार करणे आवश्यक आहे असे या भाषणाचे सूत्र होते. डॉ. रावसाहेब कसबे यांच्या शब्दात सांगावयाचे झाल्यास ते म्हणतात, "इथून पुढे मात्र, का कुणास ठाऊक बाबासाहेबांच्या बरोबर मार्क्सचे नाव घेताना वाटत असलेली अपराधाची जाणीव क्रमाने नष्ट होत गेली आणि आंबेडकर आणि मार्क्स यांचा एकत्रित विचार करता येऊ शकतो यासंबंधी कोणाशीही चर्चा करण्याइतपत आत्मविश्वास

येत गेला.” पुढे दलित पॅंथरच्या उदयाने वातावरणातील वैचारिक अभिसरणाची प्रक्रिया गतिमान झाली, कॉ. शरद पाटलांनी मार्क्सवाद – फुले – आंबेडकरवादाची मांडणी केली.

डॉ. रावसाहेब कसबे कोणत्याही राजकीय पक्षाचे नसल्याने त्यांना जे वाटते ते स्पष्टपणे बोलतात, लिहितात. १९७७ च्या दरम्यान दलित साहित्य संमेलन प्रसिद्ध विचारवंत प्रा. गं. बा. सरदार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले या संमेलनात डॉ. कसबे यांनी ‘दलित चळवळीचे भवितव्य’ या विषयावर शोधनिबंध वाचला. या शोधनिबंधावर नामदेव ढसाळांनी चर्चेचा आग्रह धरला परंतु चर्चेमुळे वातावरण बिघडण्याची भिती असल्याने अध्यक्षांनी चर्चेस नकार दिला. अशाप्रकारे आंबेडकर आणि मार्क्स यांची खुलेपणाने चर्चा सुरू झाली व डॉ. रावसाहेब कसबे यांनी विविध ग्रंथांतून केलेल्या लिखानातील उणीवा दूर करण्याचा प्रयत्न केला. त्याचा शेवट असा झाला की नवीन प्रस्तावना जोडून डॉ. रावसाहेब कसबे यांनी ‘आंबेडकर आणि मार्क्स’ लिहिले. याची पहिली आवृत्ती सुगावा प्रकाशनाने (पुणे) १९८५ साली व दुसरी आवृत्ती २००६ साली प्रकाशित केली. या ग्रंथाबाबतची त्यांची प्रतिक्रिया त्यांच्याच शब्दात अशी की, “मार्क्सवाद आणि आंबेडकरवाद या दोन्हीही समर्थ राजकीय संकल्पना आहेत असे मी मानतो. परंतु सर्वच राजकीय संकल्पनांचा जसा उगम आणि इतिहास असतो तसाच त्यांना विकासही असतो. येणारी प्रत्येक पिढी आपापल्या मातीतील वास्तवाच्या अनुषंगाने, त्यात कालानुषंगाने भर टाकून, या संकल्पनांचा विकास प्रत्यक्ष कृतीनेच करीत असते असे झाले नाही तर या संकल्पनांच्या पोथ्या बनतात आणि कर्मठ पुजाऱ्याप्रमाणे अनुयायी अधिकाधिक कर्मठ बनून शब्दप्रामाण्यातच अडकतात. प्रत्यक्ष कृतीविना विचार वांझोटा असतो याचे भान सतत जागृत असावे लागते. मार्क्स आणि आंबेडकरांच्या नावाने सुरू असलेल्या विविध पातळीत या भानाच्या अभावाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे ही

चिंतेची बाब आहे. अशा या परिस्थितीत या ग्रंथाचे कर्मठ आणि निष्क्रिय मार्क्सवादी व आंबेडकरवादी म्हणविणारे असे स्वागत करतील याची अंधुकशी कल्पना आहे. परंतु या कर्मठपणातून मुक्त असलेल्या क्रियाशील तरूण मनांच्या प्रतिक्रिया जाणून घेण्यास मात्र मी उत्सुक आहे.” अशा रीतीने १९७१ पासून या विषयावर डॉ. कसबे यांनी उघडपणे बोलायला सुरूवात केली. त्यांचे ‘आंबेडकर आणि मार्क्स’ या ग्रंथाचे प्रकाशन २५ ऑगस्ट १९८५ रोजी पुण्याच्या टिळक स्मारक मंदिरात साथी एस. एम. जोशी यांच्या हस्ते मोठया दिमाखात झाले होते. प्रकाशन समारंभात या ग्रंथावर बोलण्यासाठी कॉ. एस. वाय. कोल्हटकर, मा. दादासाहेब रूपवते आणि जेष्ठ विचारवंत प्रा. राम बापट या मान्यवरांना पाचारण करण्यात आले होते. विधानसभेचे माजी अध्यक्ष ना. वि. स. पागे, समाजवादी चळवळीचे एक अध्वर्यू नानासाहेब गोरे हेही मान्यवर हजर होते. पुढे आजचे जर चित्र पाहिले तर डॉ. रावसाहेब कसबे यांनी आंबेडकर–मार्क्सवर लिहून एक जोखीमच उचलली आहे.

डॉ. रावसाहेब कसबे यांच्या लिखानांवरून, केलेल्या भाषणांवरून, मुलाखतींवरून आणि त्यांच्या व्यक्तीशः केलेल्या चर्चेवरून आपणास पुढील मार्क्स आणि आंबेडकर या दोन्ही विभूतींच्या विचारांचा समन्वय दिसून येतो.

१. पुणे विद्यापीठ, पुणेच्या भारतरत्न डॉ. बाबसाहेब आंबेडकर अध्यासन केंद्र आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यास केंद्राने दि. १४ ते १६ फेब्रुवारी २००९ रोजी “दलित चळवळीचे स्वरूप” या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित केले होते. अध्यासनाचे प्रमुख या नात्याने डॉ. रावसाहेब कसबे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. त्या प्रास्ताविकामध्ये त्यांनी २१ व्या शतकाचे वास्तव काय आहे हे जाणून घेण्यासाठी विचारवंत, कृतीशील कार्यकर्ते अशा वेगवेगळ्या लोकांना एकाच मंचकावर आणले. जागतिकीकरणाचे आव्हान आपल्यासमोर आहे आणि या जागतिकीकरणामध्ये जी धोरणे

ठरविले जातील ती धोरणे जनतेच्या इच्छेच्या आणि कक्षेच्या बाहेरील असतील आणि ही सर्व आव्हाने पेलण्यासाठी फक्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कार्ल मार्क्सचे विचारच उपयुक्त होतील असे आवर्जून सांगितले. कार्ल मार्क्सचे व बाबासाहेबांचे विचार एकत्र केले तरच या परिस्थितीमध्ये नवी साधने वापरून आव्हाने पेलता येतील. आज भारतातील राजकीय पक्षांचा पाया डळमळीत झाला आहे. तत्त्वज्ञानाला त्यांच्याकडे किंमत नाही, याबरोबरच देशापुढील नवीन आर्थिक आव्हाने जनतेच्या हस्तक्षेपातून नवी संस्कृती घडवून विचार करता येईल. थोडक्यात बदललेल्या परिस्थितीमध्ये आपणास मार्क्स आणि आंबेडकरांच्या विचारांचा समन्वय घडवून आणावा लागेल यावर डॉ. रावसाहेब कसबे यांनी भर दिला आहे.

कॉ. गोविंद पानसरे यांनी वरील चर्चासत्रात प्रमुख वक्ते म्हणून भूमिका बजावली. त्यांनीही असे प्रतिपादन केले की, “आपल्या देशातील सामाजिक चळवळी यशस्वी करायच्या असतील तर आपणास वर्गीय आणि जातीय राजकारणाची सांगड घातल्याखेरीज पर्याय नाही.” कम्युनिस्टांना दोष देऊन दलित चळवळीचे भले होणार नाही, जी चळवळ समाजवादाच्या दिशेने जाईल ती चळवळ वाढली जाईल. डॉ. बाबासाहेब ओंबेडकरांच्या विचारांबरोबर जागतिक मंदीमुळे कार्ल मार्क्सच्या विचारांची मागणी वाढत आहे.

२. डॉ. रावसाहेब कसबे हे विचारवेध संमेलनाचे अध्यक्ष असताना ‘परिवर्तनवादी सामाजिक चळवळींची फलश्रुती’ या विषयावर त्यांनी प्रबोधन केले. यामध्ये त्यांनी मार्क्सवादी विचाराने प्रेरित झालेल्या चळवळींपासून ते फुले– आंबेडकरवादी विचारसरणी स्वीकारणाऱ्या सर्व चळवळींचा एकत्रित विचार केलेला आहे याचाच अर्थ असा की मार्क्सवादी आणि आंबेडकरवादी चळवळी या परिवर्तन घडवून आणणाऱ्या चळवळी आहेत. एकोणिसावे शतक माणूस आणि समाज यांसंबंधीच्या चिंतनाला एक नवे क्रांतीकारी वळण देणारे शतक असून या शतकाचे प्रमुख नेते म्हणून डॉ. रावसाहेब कसबे

हे कार्ल मार्क्सचे नाव घेतात. आपल्या युगाला त्या युगाची निकड काय आहे हे सांगण्याचे, ती शब्दबद्ध करण्याचे आणि ती वास्तवात उतरविण्याचे काम महापुरुष करीत असतात आणि असे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कार्ल मार्क्स या दोहोंनीही केले आहे. मार्क्सच्या तत्त्वचिंतनाची सुरूवात माणूस नावाच्या प्राण्यापासून, जिंवत मानवी समाज यांच्यासंबंधीचे जे सूत्रबद्ध आणि सुसंगत विचार त्यांच्या 'इकॉनॉमिक ॲड पोलिटिकल मॅन्युक्रिप्ट'पासून ते नंतरच्या 'दास कॅपिटल' पर्यंतच्या लिखानात व्यक्त केलेले आहेत. डॉ. कसबे आजच्या भारतीय समाजाच्या वास्तवाबाबत म्हणतात की, आजचे भारतीय समाजाचे वास्तव ना केवळ वर्गाचे किवा ना केवळ जातीचे आहे; ते धर्म आणि जाती यांच्या व्यामिश्रतेतून उदयाला आलेल्या नव्या वैशिष्टयपूर्ण जातीवर्ग समाजाचे आहे आणि आपणास माहिती आहे की डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जातीचा प्रश्न आणि कार्ल मार्क्स यांनी वर्गाचा प्रश्न हाताळलेला आहे. प्रा. रणजित परदेशी या जेष्ठ विचारवंताने आपल्या मुलाखतीमध्येही सांगितले की, आजही अनेक जातींमधले अनेक वर्ग निर्माण झालेले आहेत. म्हणून वर्ग आणि जातींचा एकत्रित अभ्यास करण्याची गरज आहे. हेच विचार डॉ. कसबे यांनी सुरूवातीच्या काळात व्यक्त केले होते. मार्क्सवादी विचाराने धर्म पूर्णच नाकारलेला आहे मात्र आंबेडकरवादाने धर्माला वेगळा पर्याय देण्याचे काम केले आहे. तसेच प्रत्येक राजकीय क्रांतीला सामाजिक आणि धार्मिक क्रांतीचा पाया असतो हे जगाच्या इतिहासाने आजवर सिद्ध केले आहे. हे आंबेडकरांच्या इतिहास मीमांसेचे सूत्र होते. डॉ. कसबे परिवर्तनवादी चळवळींबाबत लिहितात की, “परिवर्तनवादी चळवळीतील विविध प्रवाहांचे अनुयायी अशी चिकित्सा करण्यास अद्याप धजत नाहीत ही परिवर्तनवादी चळवळींची प्रमुख मर्यादा स्पष्ट झाली आहे. हे केवळ फुले–शाहू–आंबेडकरांबद्दलच घडते असे नाही तर ते गांधी–लोहिया–नेहरू आणि मार्क्स–लेनिन–माओ यांच्याबद्दलही आपल्या देशात घडले आहे.” [२] म्हणजेच डॉ. रावसाहेब कसबे यांच्या मते प्रत्येक

चळवळीचा संबंध हा व्यवस्थेतील मूलभूत परिवर्तनाशी आहे. याबरोबरच डॉ. कसबे यांनी मांडलेले पुढील विचारही महत्त्वाचे आहेत. "वास्तविक पाहता, मार्क्स यांचे धर्मचिंतन भारतासारख्या धार्मिक प्रेरणा प्रबळ असलेल्या आणि धर्मचिंतनाच्या प्राचीन वारसा असलेल्या देशात फार चांगल्या प्रकारे समजावून सांगता आले असते. मार्क्स यांच्या या धर्मचिंतनाला बुद्ध तत्त्वज्ञानाची आणि मध्ययुगीन संतमंडळाच्या कवितांची पार्श्वभूमी देऊन ते स्पष्ट झाले असते."[३] डॉ. आंबेडकर हे भारताच्या इतिहासाने पाहिलेले शेवटचे आणि श्रेष्ठ दर्जाचे समाज क्रांतिकारक होते. नव्या जगात माणूस धर्माशिवाय जगू शकणार नाही आणि जुने धर्म तर कालबाहय ठरविले गेले. आंबेडकरांनाही कार्ल मार्क्स प्रमाणे राजकीय क्रांती व्हावी असे वाटत होते परंतु फरक एवढाच होता की राजकीय क्रांतीला धार्मिक आणि सांस्कृतिक क्रांतीचा पाया देणे आवश्यक वाटत होते. परंतु हे होताना डॉ. कसबे यांनी दि. २९ सप्टेंबर २००२ मध्ये अखिल भारतीय समाजवादी अध्यापक सभेची स्थापना अधिवेशन नाशिक येथे भरले होते. या अधिवेशनाच्या अध्यक्षीय भाषणात सांस्कृ तिक राष्ट्रवादाबद्दल सांगितले की, भारत प्रजासत्ताक बनल्यानंतर विविध जातीजमातींत एकमेकांबद्दल विश्वास निर्माण करण्याची जी प्रक्रिया सुरू झाली होती, ती पूर्णपणे थांबते की काय आणि भारतात 'सांस्कृतिक राष्ट्रवादाच्या' नावाने जातीयवादाचा राक्षस तरुण पिढीचा बळी घेतो की काय अशी शंका निर्माण झाली.

३. डॉ. रावसाहेब कसबे यांनी आपल्या 'रिपब्लिकन पक्ष ऐक्य, वास्तव आणि भवितव्य' या पुस्तिकेमध्ये पान पं. २२ वर 'महाराष्ट्राच्या राजकारणातील बदलते वास्तव' याविषयी लिहिताना डाव्या आणि पुरोगामी चळवळींबद्दल जनमनात अद्यापही आदरभाव आहे. महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य असून १९६० पासून समाजातील कामगार वर्गाला डाव्या शक्तीपासून बाजूला काढण्यासाठी कॉंग्रेस, शिवसेनेने प्रयत्न केले यामुळे डाव्या आणि

प्रागतिक शक्ती विकलांग होऊन श्रमजीवी, भमिहीन, शेतमजूर, असंघटित जनसमूह यांची शक्ती कमजोर झाली. मार्क्सवादी आणि आंबेडकरवादी दृष्टीकानातून परिवर्तनवादी व्यक्ती आणि संघटना यांच्या दृष्टीने दु:खद गोष्ट आहे. याबरोबरच आपणास ९ जून १९७८ च्या घटनेकडेही लक्ष दयावे लागेल, जनता पक्षाच्या पुण्यातील दि ९ जून १९७८ च्या अधिवेशनात आर.एस.एस.च्या उत्साही कार्यकर्त्यांकडून डॉ. रावसाहेब कसबे यांच्या 'झोत' पुस्तकाची होळी करण्यात आली. जनता पक्षातील समाजवादयांना त्यांच्या या मागणीला विरोध होता. त्यामुळे समाजवादी आणि संघ स्वयंसेवक यांच्यात संघर्ष झाला. आणि तो पुढे विकोपाला जाऊन त्याची परिणती जनता पक्ष विघटित होण्यात झाली. याचा परिणाम आंबेडकरांचे विचार कार्ल मार्क्सच्या विचारांबरोबर जोडण्यासाठी, सांगण्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण झाली.

डॉ. रावसाहेब कसबे यांनी 'आंबेडकरवाद: तत्त्व आणि व्यवहार', सुगावा प्रकाशन, पुणे ची पहिली आवृत्ती लिहिली. तिच्या प्रस्तावनेमध्ये डॉ. कसबे म्हणतात की, "दलित आणि प्रागतिक शक्तीचे स्वरूप असेच वाढीस लागावे व तसे ते लागेल अशी आशेची किरणे दिसू लागली आहेत. म्हणूनच या पुस्तकाचा दलित चळवळीतील अग्रणी नेते प्रकाश आंबेडकर, रामदास आठवले आणि कांशीराम यांनी अंतर्मुख होऊन विचार करावा असे वाटते." ही घटना आहे १९८९ ची मात्र डॉ. रावसाहेब कसबे यांनी पुणे विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्राचे संचालक (प्रमुख) झाल्यानंतरही दि १४, १५ आणि १६ फेब्रुवारी २००९ रोजी 'दलित चळवळीचे स्वरूप' या विषयावरील चर्चेच्या निमित्ताने प्रकाश आंबेडकर यांना निमंत्रित केले. याबरोबरच डाव्या विचारसरणीचे कॉ. गोविंद पानसरे यांनाही निमंत्रित केले. तसेच या अगरेदर १३ ऑगस्ट २००८ रोजी 'कांशीराम यांचे जीवनकार्य' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन केले, चर्चा घडवून आणली. यावेळी देखील भाई वैद्यांसारखे डावे विचार असलेल्यांना निमंत्रित केले

होते. वरीलप्रमाणे घटनाक्रम पाहता असे दिसते की दलित चळवळीबद्दल डॉ. कसबे कम्युनिस्टांना बोलण्यासाठी बोलवितात व विचार मांडायला सांगतात. यावरून हेच स्पष्ट म्हणता येईल की, दलित चळवळीचा किंवा आंबेडकरी विचारांचा विकास हा कम्युनिस्ट विचारांना बरोबर घेऊनच करता येईल आणि दोन्ही विचार एकत्रित आणले तरच चळवळ पुढे जाईल.

४. 'ओबंडकरवाद: तत्त्व आणि व्यवहार' मध्ये डॉ. रावसाहेब कसबे पान नं. ३८ वर 'राज्यघटना आणि समाजवाद' या बाबतचे विचार मांडताना समाजवादा बाबत डॉ. आंबेडकरांनी केलेला प्रयत्न कसा अयशस्वी झाला याचा दाखला देतात. तो असा की, "बाबासाहेबांनी समाजवाद आणि लोकशाही या दोन्ही पद्धती एकत्रित कार्यरत कशा होतील यादृष्टीने एक योजना तयार केली होती आणि ती घटना परिषदेसमोर विचारार्थ ठेवली होती. दुर्दैवाने अनेक वेळा प्रयत्न करूनही या योजनेसमोर घटना समितीत चर्चा होऊ शकली नाही." भारतीय अर्थव्यवस्था राज्यसमाजवादी असावी आणि ही अर्थव्यवस्था प्रस्थापित करण्याचे काम विधिमंडळाच्या इच्छेवर न सोपविता ते राज्यघटनेनेच करावे हे तर आहेच परंत खुद्द बाबासाहेब हेच समाजवादी विचारांना कसबे जवळ करत होते हे वाचकांच्या पुढे स्पष्ट करण्याचा प्रयत्न डॉ. कसबे यांनी केला आहे. म्हणजेच डॉ. कसबे स्वत: दलित कटुंबात जन्मलेले, दलित चळवळीत वाढलेले परंतु ते देखील कम्युनिस्ट विचारांना जवळ करतात किंवा मार्क्सवादी विचारांचे महत्त्व पटवून देतात.

५. "आंबेडकरोत्तर काळात दलित चळवळीने घडविलेले एक मोठे विचारवंत म्हणजे डॉ. रावसाहेब कसबे. गेली साडेतीन तपे ते दलित चळवळीचेच नव्हे तर, एकूणच परिवर्तनवादी चळवळीचे दिशादर्शक राहिले आहेत. बाबासाहेबांचे विचार हे समतावादी असून, समताधिष्ठीत सामाजिक पुनर्रचना हाच त्यांच्या विचारांचा खरा केंद्रबिंदू आहे असे त्यांनी आग्रहीपणे प्रतिपादले. सामाजिक पुनर्रचनेचा विचार मग एका समाजापुरता वा

राष्ट्रापुरता मर्यादित राहू शकत नाही तर; तो वैश्विक विचार बनतो. मग जगाची पुरर्रचना करू पाहणाऱ्या जागतिक तत्त्वज्ञानाच्या तुलनेत, त्यांनी बाबासाहेबांच्या विचारांकडे पाहिले भारतातील विशिष्ट सामाजिक परिस्थितीच्या संदर्भात मार्क्स व आंबेडकर यांचे विचार परस्परपूर्वक मानून, क्रांतीच्या तत्त्वज्ञानाची मांडणी केली. सामाजिक परिवर्तनासाठी भौतिक बदल आवश्यक असतो. परंतु पूर्व युरोपातील कम्युनिस्ट राजवटीचा अंत, सोविएत रशियाचे विघटन, यातून भौतिक बदलाबरोबर मानसिक बदलही महत्त्वाचा असतो, याची त्यांना जाणीव होऊ लागली." [४] डॉ. कसबे हे दलित चळवळीमध्ये दीर्घकाळ असल्याने दलित चळवळीच्या फलश्रुतीचा विचार करता दलित चळवळीमध्ये कोणता बदल केला तर ती पुढे जाऊ शकते यासाठी त्यांनी 'आंबेडकर' आणि 'मार्क्स' समन्वय साधणारी उपायोजना सांगितली आहे. पदव्युत्तर परीक्षेसाठी रावसाहेबांना 'मार्क्सवाद' अभ्यासासाठी होता. त्यावेळीच्या राजकीय प्रभावामुळे काहीसे मार्क्सवादविरोधी होते. परंतु बाबासाहेबांच्या 'कास्ट इन इंडिया' या निबंधातील 'जात म्हणजे बंदिस्त वर्ग' किंवा 'संपूर्ण जगाचा इतिहास हा वर्ग संघर्षाचा इतिहास असल्याने भारत त्याला अपवाद नाही' अशी बाबासाहेबांची विधाने, तसेच बाबासाहेबांनी मार्क्स व बुद्ध यांची केलेली तुलना यामुळे ते मार्क्स, आंबेडकरांच्या तुलनेत वाचू लागले. मग बाबासहेबांचे लिखाण त्यांना मार्क्सवादाच्या छायेत कलेले लिखाण वाटू लागले व त्यांचा अशा प्रकारे मार्क्सवादाचा विरोध मग हळूहळू मावळू लागला. अशा प्रकारे डॉ. रावसाहेब कसबे यांनी मार्क्स आणि आंबेडकरी विचारांचे एकत्रीकरण करून एका अर्थाने नवीन प्रकारची मांडणी केली आणि चळवळीच्या दिशेने विचार केला तर डॉ. कसबे यांच्या मते या विचारांची अत्यंत आवश्यकता आहे असे असले तरी ते मुळात आंबेडकरवादीच आहेत असे दिसते. १९७१ साली महाड येथे झालेल्या बौद्ध साहित्य संमेलनात त्यांनी मार्क्स व आंबेडकर यांचा

समन्वयाचा विचार जाहीरपणे मांडला या सर्व घटनेचा संदर्भ मा. सुधारकर गायकवाड यांनी आपल्या 'डॉ. रावसाहेब कसबे: एक तत्त्वज्ञ' या पुस्तिकेत केला आहे.

रिपब्लिकन पक्षाची फाटाफूट झाल्याने राजकीय पोकळी भरून काढण्यासाठी व दलितांवरील अत्याचाराने निर्माण झालेली अस्थिरता नष्ट करण्यासाठी पँथर जोराने फोफावली. कम्युनिस्टने त्यांना मात्र पँथरचे नेतृत्व हे चूकीच्या दिशेने जाणारे वाटले, प्रतिस्पर्धी वाटले. कम्युनिस्टांनी व मार्क्सवादी चळवळीतील तरुणांनी आणि विचारवंतांनी पँथरची चळवळ उचलून धरली. वर्गलढा व वर्णलढा एकत्र लढण्याची विचारसरणी मांडली जाऊ लागली. यामुळे पँथर बिचकली. तिच्यात आंबेडकर विरूद्ध मार्क्सवाद असे दोन प्रवाह तयार झाले. मा. सुधारकर गायकवाड आपल्याच पुस्तिकेत पुढे असेही वर्णन करतात की, "रावसाहेबांनी मे—जून १९७५ च्या समाजप्रबोधन पत्रिकेत 'दलित चळवळीचे भवितव्य' हा लेख लिहून, दलितांचे आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठी स्वतंत्र असे आंबेडकरवादी अर्थशास्त्र बनवून, त्याकरिता मार्क्सवादी अर्थशास्त्र स्वीकारले पाहिजे असे प्रतिपादन केले. मे—जून १९७६ च्या पत्रिकेच्या अंकात 'डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतराचे स्वरूप' हा लेख लिहून त्यात व्यक्ती, समाज यांचे मार्क्सवादी दृष्टीने नाते तपासले. १९७५ च्या अस्मितादर्श दिवाळी अंकात त्यांनी आंबेडकरवादाची मांडणी करणारा 'आंबेडकरवाद आणि मराठी साहित्य' हा लेख लिहिला. दि. ४, ५, ६ डिसेंबर १९७६ रोजी नागपूरच्या डॉ. आंबेडकर अध्ययन मंडळाने डॉ. कसबे यांची तीन व्याख्याने आयोजित केली होती. त्यांचाच पुढे 'डॉ. आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना' हा ग्रंथ आला. तेव्हा शेवटच्या व्याख्यानात त्यांनी 'आंबेडकरांचे समाजशास्त्र व मार्क्सचे अर्थशास्त्र' यांचा सुरेख मेळ घालून चळवळी केल्या पाहिजेत असे प्रतिपादन केले होते. पुढे त्यांनी 'आंबेडकर आणि मार्क्स' यांच्या विचारांचा समन्वय करणारा ग्रंथच लिहिला.

६. डॉ. रावसाहेब कसबे यांनी 'मानव आणि धर्म चिंतन' (१९९६) लिहिले. तसेच १९९४ मध्ये हिंदू–मुस्लिम प्रश्न आणि सावरकरांचा हिंदू राष्ट्रवाद हा मोठा ग्रंथ लिहिला. या दोन्ही ग्रंथांमध्ये त्यांनी माणसाचाच विचार केलेला आहे. मानसशास्त्रीय पद्धत वापरून ते मानवी स्वभाव मार्क्स, फ्रॉइड, युंग व एरिक फ्रॉम यांच्या सहाय्याने समजून घेतात. मार्क्सने सुद्धा जैविक प्रेरणांतून एक गृहीतक काढले. ते म्हणजे माणसाचे अस्तित्व. परंतु माणसाचे अस्तित्व हे माणूस आपल्या जगण्यासाठी काय आणि कसे उत्पादन करतो यावर अवलंबून असते. डॉ. कसबे यांनी 'मानव आणि धर्मचिंतन'मध्ये सुद्धा मानवाने आपल्या जीवन अस्तित्वासाठी बदल करीत स्वत:ला घडविले. समाजात संस्था निर्माण केल्या. माणूस वर्गावर्गात विभागला गेला. वर्गानी समाजाची धारणा केली पण त्याचवेळी समाजात एका अंतर्विरोधालाही जन्माला घातले. मानवी समाजात निर्माण झालेले हे वर्गीय अंतर्विरोध यांना डॉ. कसबे हे 'इतिहासजन्म द्वैत' म्हणतात. याचा उल्लेख करताना ते पुढे असेही म्हणतात की, भारतातील जाती प्रश्नाच्या संदर्भात धर्माबाबत अशी भूमिका महत्त्वाची असते ती अशी, रावसाहेब जातीला चिकटलेले धर्माचे स्वरूप मान्य करतात. पण जाती या अंतिमत: आर्थिक विकास प्रक्रियेची निर्मिती असते ही डॉ. कसबे यांची भूमिका आहे. तसेच सामाजिक बदलाच्या गतीच्या मुळाशी मार्क्सवादात द्वंद्वात्मक भौतिकवाद असतो. 'आंबेडकर आणि मार्क्स' या ग्रंथात रावसाहेब कसबे म्हणतात, 'मार्क्सवादी चिंतनात या दृष्टीने विरोधी तत्त्वाच्या ऐक्याचा आणि संघर्षाचा सिद्धांत मांडलेला आहे.'

७. डॉ. रावसाहेब कसबे यांचे जीवन जसे मानसन्मानांनी, हारतुऱ्यांनी भरलेले आहे तसेच ते वादळांनीही भरलेले आहे. असे असले तरीही क्रांतीकारी परंपरेच्या लोकांनी जणू रावसाहेबांना आपले नायकच बनवले होते. 'झोत' हे पुस्तक लिहिल्यामुळे महाष्ट्राचे अवघे वैचारिक विश्व ढवळून निघाले होते तर 'आंबेडकर आणि मार्क्स' या वेगळयाच

विषयावरील ग्रंथामुळे वैचारिक वादळ निर्माण झाले होते. लेखक उत्तम कांबळे यांनी लिहिलेल्या व २००६ मध्ये सुगावा प्रकाशनाने प्रसिद्ध केलेल्या पुस्तकात लेखक म्हणतात, "रावसाहेब मार्क्सवादी आहेत, रावसाहेब आंबेडकरवादी आणि मार्क्सवादी आहेत, तर रावसाहेब आंबेडकरवादीच आहेत असे आपापल्या परीने सांगणारे आजही काही कमी नाहीत." उत्तम कांबळे यांनी जी मुलाखत घेतली त्या मुलाखतीमध्ये डॉ. कसबे यांना मार्क्सवादाविषयीचा जो प्रश्न विचारला त्याचे उत्तर त्यांनी पुढीलप्रमाणे स्वत:च्या भाषेत असे दिले की, "माझा सर्वात जास्त गोंधळ उडाला तो डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे 'कास्ट इन इंडिया', 'ॲनिहिलेशन ऑफ कास्ट' आणि 'कम्युनिस्ट मेनिफेस्टो' यांचे एकत्रित आणि तौलनिक वाचन करताना........ **मार्क्स साऱ्या जगाच्या इतिहासाकडे एका तटस्थ प्रज्ञावंतांच्या दृष्टीने पाहतो. अर्थात मेनिफेस्टोत भांडवलशाहीविरूद्ध तोही आक्रमक बनतोच. परंतु त्याची आक्रमकता भारतीय जातिसंस्थेने इथे वांझोटी कशी ठरविली याचे स्पष्टीकरण बाबासाहेबांच्या लिखानात सापडते. मार्क्स लिहित होते ते पटतही होते कारण भारतात जातीत वर्ग निर्माण होण्याची प्रक्रिया वेगात होती. भारतात भांडवशाही आकार घेत होती. मनातल्या या अनेक दिवसांच्या विचारसंघर्षातूनच डॉ. आंबेडकर आणि मार्क्स यांच्या एकत्रित विचारांची बैठक डोक्यात आकार घेऊ लागली. त्यात डॉ. आबेडकर आणि मार्क्स यांच्या समन्वयाचा विचार होता. १९६८–६९ ला महाड येथे बाबुराव बागुल यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या दलित साहित्य संमेलनातील परिसंवादात माझ्याकडून त्याचे सूतोवाच झाले आणि मी वादाच्या भोवऱ्यात सापडलो."**[५]

८. डॉ. रावसाहेब कसबे यांचे बालपण आंबेडकरी चळवळीत गेले. आंबेडकरी चळवळीचे संस्कार घेऊनच त्यांनी विचार मांडायला सुरूवात केली. त्यांचे फक्त दलित चळवळीशी सबंध आले नाहीत तर दलित्तेतर चळवळीशींही संबध आले. त्यांचा जातीबाहेरील समाजातही मोठा मित्र परिवार होता. आंबेडकरी साहित्य वाचत असताना

त्यांनी मार्क्सवरही टीका केली. बाबासाहेबांचे मार्क्वादावर केलेले लिखान फक्त मार्क्सला बुद्धाच्या शेजारी बसविण्यासाठी केले की काय? या दोघांचे ध्येय एकच कसे होते हे सिद्ध करण्यासाठी आणि ते प्राप्त करण्यासाठी त्यांनी वापरलेली साधने भिन्न कशी होती. हे स्पष्ट करण्यासाठी लिखान केले हे पाहताना, वाचताना डॉ कसबे यांना साम्यवाद आणि बौद्ध संघ यांवर केलेली तुलना गंमतीशीर वाटली. ते म्हणतात, “आंबेडकरांच्या बुद्ध आणि कार्ल मार्क्स यांच्या तुलनेमुळे मार्क्स आणि मार्क्सवादबद्दल किंवा बुद्ध आणि बौद्ध धर्माबद्दल त्यांच्या अनुयायांत आणि परस्परांत जे गैरसमज होते त्यांना मात्र धक्का बसला. बाबासाहेबांचा उद्देशही तोच होता.” बहुसंख्य तरुणांनीही युरोप खंडात मार्क्सला आपला मुक्तिदाता मानले होते. अशा मार्क्सबरोबर बाबासाहेबांना बुद्धाची तुलना करणे आवश्यक वाटत होते. यामुळेच डॉ. कसबे यांनी मार्क्स आणि आंबेडकर यांचा विचार एकत्रित केला. बाबासाहेबांचा अभ्यास हा माझ्या अस्तित्वाचा एकूण भाग होता असे डॉ. रावसाहेब कसबे सांगतात. यावरून डॉ. कसबे यांना ‘आंबेडकरवादी’ म्हणून राहण्यातच स्वाभिमान वाटतो. आंबेडकरवादी राहून मार्क्वादाचा अभ्यास करण्यास ते पुढे येतात. त्याही पुढे जावून ते दोन्ही विचारांशिवाय चळवळ पुढे जावूच शकत नाही. हे ठामपणे सांगतात.

९. मा. उत्तम कांबळे यांनी आपल्या ‘रावसाहेब कसबे यांचे क्रांतीकारी चिंतन’ या पुस्तकामध्ये डॉ. रावसाहेब कसबे यांची मुलाखत घेतली या मुलाखतीमध्ये त्यांनी विविध विषयांवर विविध प्रश्नांची चर्चा केली. त्यांनी मुलाखतीमध्ये शेवटचा प्रश्न विचारला की, ‘तुम्हाला मार्क्सवादी म्हणायचे की आंबेडकरवादी, की समाजवादी?’ या प्रश्नाचे उत्तर जे दिले ते अतिशय महत्त्वाचे वाटते. त्यामध्ये महत्त्वाचा भाग असा की, “खरे सांगायचे तर माझ्या दृष्टीने या दोन्हीही गोष्टी निरर्थक आहेत.........वास्तविक पाहता कोणीही माणूस पूर्णपणे मार्क्सवादी, आंबेडकरवादी किंवा समाजवादी असण्याची सुतराम

शक्यता नाही...... तुम्ही मार्क्सवादी असा, आंबेडकरवादी किंवा समाजवादी. तुम्ही जेव्हा एखादया वादाशी बांधिलकी स्वीकारता, तिच्या मुळाशी त्या वादासंबंधीचे तुमचे आकलन आणि त्यातून आकार पावलेली तुमची स्वत:ची भूमिका असली, तरच तुमच्या बांधीलकीला काही अर्थ असतो.....माझ्यासंबंधी बोलायचे ठरले, तर मी या सर्व वादाचा अभ्यासक आहे. त्यांच्यातील अनेक बाबीसंबधी माझी स्वत:ची अशी काही मते मी बनविलेली आहेत. ती माझ्या आजवरच्या लेखनात, भाषणात अभिव्यक्त झालेली आहेत. त्यांना तुम्ही चूक, बरोबर म्हणू शकतो. परंतु ती माझी मते असल्याने त्याची सर्वस्वी जबाबदारीही माझ्यावरच आहे." यावरून असे दिसते की 'आबेडकर' आणि 'मार्क्स' दोन्हीही विचार खूप मोठे आहेत, महत्त्वाचे आहेत, दोन्हींचेही महत्त्व तितकेच आहे, असे असले तरी डॉ. रावसाहेब कसबे यांच्या लिखानावरून विविध विषयांवर केलेल्या भाषणांवरून त्यांना 'आंबेडकरी' म्हटले तर ते अधिक योग्य आहे असे स्पष्ट करता येते.

१०. डॉ. रावसाहेब कसबे यांनी 'जात' आणि 'धर्म' म्हणजे 'पाया' आणि 'इमला' याचा विचार करताना, या दृष्टीकोनातून विचार करतात की जात ही भारतीय समाजाचा पाया आहे आणि शहरी भागातील कामगारांचे व्यक्तिगत जीवनाचे प्रश्न मुळी पायाशी संबंधित नसतात त्यांचे प्रश्न इमल्याशी म्हणजे धर्माशी संबंधीत असतात. ग्रामीण भागातले चित्र या उलट आहे. ते म्हणतात, "शहरातील दलित डाव्या चळवळीत भाग घेत नाहीत म्हणून डावी चळवळ खेडयातील दलितांकडे दुर्लक्ष करते आणि शहरातील दलित डाव्या चळवळीच्या विरूद्ध जातात म्हणून खेडयातील दलित चळवळीतील कार्याकर्त्याला उभेही करीत नाहीत असे हे एक दुष्टचक्र भेदण्याचे सामर्थ्य मार्क्सचे विचार आणि आंबेडकरांची दृष्टी यांच्या समन्वयी शक्तीतच आहे."[६] जातिसंस्थेच्या स्वरूपाच्या आकलनाबद्दल डॉ. कसबे यांचे मत महत्त्वाचे वाटते कारण त्यांनी त्यांचे जे मत मांडले

त्यात ते म्हणतात, “जाती म्हणजे श्रमिकांची हवाबंद विभागणी ही बाबासाहेबांची भूमिका आणि वंशपरंपेने झालेली श्रमविभागणी ही मार्क्सची भूमिका सारख्याच नव्हे तर एकच आहेत. याबरोबरच डॉ. आंबेडकर कार्ल मार्क्सचा ऐतिहासिक भौतिकवाद देखील पूर्णपणे नाकारताना कधीच दिसत नाहीत. इतिहासाच्या आर्थिक विश्लेषणाचा सिद्धांत म्हणजेच भौतिकवाद हा सत्य आहे. असेच त्यांचे म्हणणे होते. ते त्यांनी रसेलच्या ‘प्रिन्सिपल्स ऑफ सोशल रिकन्स्ट्रशन’ या ग्रंथावरील समीक्षा करताना मान्य केले आहे. पुढे डॉ. रावसाहेब कसबे म्हणतात की, आंबेडकर मार्क्वादाच्या छायेतून बाहेर पडणे शक्य नव्हते. तसेच भारतातील गरिबांची चळवळ मार्क्सवादी सांघटित करणारे असते तर त्याला आंबेडकरांचा विरोध असण्याचे कारणच नव्हते. कम्युनिस्टांना आंबेडकरांचा विरोध होता तो कम्युनिस्ट जातिसंस्थेचा विचारच करीत नाहीत. म्हणून तसेच आंबेडकर आयुष्यभर मार्क्वादाला पूरक असलेल्या कम्युनिस्ट विरोधी पर्यायाच्या शोधात होते. आंबेडकरांचे मन हे जातीचे चटके स्वत: भोगल्याशिवाय कळणारे मन नाही. म्हणूनच संस्थात्मक राजकारणात मग्न असलेल्या सुधारणावादी चळवळींना किवा राजकीय चळवळींना हे मन कळणे कठिण आहे. असे असले तरी भारतीय जातिसंस्थेच्या उगम विकासासंबंधी १९१६ साली केलेले पहिलेच मार्क्सवादी विश्लेषण असावे. कार्ल मार्क्स आणि मार्क्सवादाचे सुप्त आकर्षण मात्र आंबेडकरांच्या संपूर्ण जीवनात राहिले आहे. म्हणून ते म्हणतात आज आपल्यासमोर वर्गसमन्वयाच्या भूमिके शिवाय चळवळीचा विकास करता येणे अशक्य आहे. आज जो दलित चळवळी आणि कम्युनिस्ट, समाजवादी चळवळींसमोर जो अस्तित्वाचा प्रश्न उभा राहिला आहे. त्यात वास्तवाचे भान ठेवून ‘मार्क्स’ आणि ‘आंबेडकर’ विचारांचा समन्वयच परिवर्तनाकडे, विकासाकडे घेऊन जाईल. महाराष्ट्रातील जेष्ठ विचारवंत कॉ. रणजित परदेशी यांनी महाराष्ट्र राज्यशास्त्र आणि लोकप्रशासन परिषदेच्या १७ व्या अधिवेशनामध्ये पुणे येथे अध्यक्षपदावरून असे स्पष्ट केले की, आज

मार्क्सवाद–फुले–आंबेडकरवाद या विचारांची पुर्नमांडणी करणे आवश्यक आहे. कॉ. शरद पाटील यांनी देखील मार्क्स–फुले–आंबेडकरांच्या विचारांची तुलना केली. परंतु कॉ. शरद पाटलांच्या या विचारांचे गुरू डॉ. रावसाहेब कसबे हेच आहेत. पुढे त्यांनी ९ मार्च २००९ मध्ये मुलाखत देताना सांगितले की, “दलित चळवळीच्या विकासाचा विचार करताना वास्तवात मार्क्सवादाची जोड देण्याची आवश्यकता होती. त्यासाठीची थेअरी प्रथम डॉ. रावसाहेब कसबे यांनीच मांडली. आज प्रत्येक जातीमध्ये वर्ग निर्माण झाले आहेत. त्यामुळे जाती आणि वर्गाचे प्रश्न एकत्रित अभ्यासण्याची विचारसरणीची गरज आहे आणि ती उणिव डॉ. रावसाहेब कसबे यांच्या माध्यमातून पूर्णत्वास येत आहे.”

**सारांश–**

कार्ल मार्क्स आणि मार्क्सवादाचे सूप्त आकर्षण आंबेडकरांच्या संपूर्ण जीवनात भारतीय कम्युनिस्टांच्या विरोधात जाऊनही टवटवीत राहिले आहे कारण कम्युनिस्ट जातीसंस्थेचा विचारच करीत नाही. आंबेडकरवादी विचार भारतीय सामाजिक प्रश्न विशेषत: जातीयेतेचा प्रश्न सोडविण्यासाठी कसे उपयोगी ठरतात याविषयी डॉ. कसबे यांनी सविस्तर वर्णन आपल्या वेगवेगळ्या ग्रंथांत केलेले दिसून येते. परंतु या बरोबरच ते मार्क्सवादी विचारांकडे कसे पाहतात हेही या ठिकाणी स्पष्ट होते. आंबेडकरी विचारांना ‘मार्क्सवादी’ विचारांची जोड मिळाली तर सामाजिक स्थितीत परिवर्तन अपेक्षित आहे मार्क्सवाद हे सामाजिक परिवर्तनाचे विज्ञान आहेत. ते एका व्यक्तीला लावून त्याचे मूल्यमापन करणे गैर आहे. याबरोबरच आंबेडकर हे केवळ भारतीय दलितांचे नेते आहेत या भ्रमातून बाहेर आले पाहिजे. जात आणि वर्ग या मुद्दयांवरून आंबेडकरवाद आणि मार्क्सवाद यामध्ये विवाद आहे परंतु समन्वयी शक्तीत प्रचंड शक्ती आहे आणि या

शक्तीचा उपयोग केला तरच आंबेडकरी चळवळीला जातीच्या कोशातून बाहेर पडण्याचे सामर्थ्य येईल.

# संदर्भ टीपा


१. डॉ. कसबे रावसाहेब, **आंबेडकर आणि मार्क्स,** सुगावा प्रकाशन, दु. आ. नोंव्हेंबर २००६, पान. १०.

२. बेडकिहाळ किशोर (संकलन), **अकरावे विचारवेध संमेलन अध्यक्षीय भाषण, सुगावा प्रकाशन,** डिसेंबर २००३, पान ७५,७६.

३. डॉ. कसबे रावसाहेब, **धर्मः मानवी संस्कृती व विकास**, लोकवाङ्मय गृह, मुंबई, दु. आ. जुलै २००६, पान २२.

४. गायकवाड सुधाकर, **डॉ. रावसाहेब कसबेः एक तत्त्वज्ञ**, सुमेध प्रकाशन, पुणे, प्र.आ. २००७, पान ३.

५. कांबळे उत्तम, **रावसाहेब कसबे यांचे क्रांतीकारी चिंतन**, सुगावा प्रकाशन, पुणे, जून २००६, पान १९.

६. **उनि**, डॉ. कसबे रावसाहेब, पान. ३६१.

प्रकरण सहावे

# निष्कर्ष, सूचना व सारांश

# प्रकरण सहावे

# निष्कर्ष, सूचना व सारांश

## प्रस्तावना:—

डॉ. रावसाहेब कसबे हे आंबेडकरवादी की मार्क्सवादी असा प्रश्न वाचकांपुढे, चळवळीच्या कार्यकर्त्यांपुढे आणि साहित्यिकांपुढे उभा राहिला आणि याच प्रश्नावर विचार करून या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी संशोधन करावे यासाठी सदर प्रबंध लिहिण्याचे ठरविले आहे. बदललेल्या परिस्थितीमध्ये आपणास मार्क्स आणि आंबेडकरांच्या विचारांचा समन्वय घडवून आणावा लागेल यावर डॉ. रावसाहेब कसबे यांनी भर दिला आहे. आव्हाने पेलण्यासाठी फक्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कार्ल मार्क्सचे विचारच उपयुक्त होतील असे आवर्जून सांगितले.

डॉ. रावसाहेब कसबे हे अकोले तालुक्यातील औरंगपूर या अतिदुर्गम भागातील असून अहमदनगर जिल्हयातील हा आदिवासी भाग समजला जातो. रावसाहेबांचा जन्म दलित कुटुंबात झालेला असून ते लहानपणापासून चळवचळीमध्ये कार्यकर्ते म्हणून कार्य करत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर आधारित चळवळीचे कार्य करताना ते चळवळीमध्ये फक्त कार्य करणारा, Actor ची भूमिका बजावणारा एवढीच त्यांनी भूमिका बजावलेली नाही तर त्यांनी सामाजिक चळवळ केंद्रीभूत मानून त्या अनुषंगाने विविधांगी लिखान केले आहे म्हणजेच चळवळीला वैचारिक खाद्य पुरविण्याचे अत्यंत महत्त्वाचे काम डॉ. रावसाहेब कसबे यांनी केले आहे. त्यांनी १९७७ पासून लिखानास सुरूवात केली. त्यांचे पहिले पुस्तक 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना' असो अथवा

२००५ साली लिहिलेले 'धर्म: मानवी संस्कृती व विकास' ही पुस्तिका असो हे लिहित असताना त्यांच्यावर वाचकांची स्तुतीसुमने उधळली गेली तसेच प्रदीर्घ टीकाही झालेली दिसून येते. त्यांनी १९७८ मध्ये 'झोत' लिहून तर वेगळीच क्रांती केली. कारण या पुस्तकाच्या माध्यमातून त्यांनी R.S.S. ला अगदी रस्त्यावर आणले. पुढे या मंडळींनी 'झोत'ची होळी केले. त्यामुळे महाराष्ट्राला एका वेगव्या मार्गाने विचार विश्व पहायला मिळाले.

महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय चळवळींच्या चर्चेच्या अनुषंगाने विचार केल्याास असे दिसते की, डॉ. रावसाहेब कसबे 'झोत' लिहून पहिल्यांदा वादाच्या भोवऱ्यात सापडले. यानंतर त्यांनी १९८५ साली त्यांनी 'आंबेडकर आणि मार्क्स' लिहून त्यांनी चळवळीचा वेगव्या पद्धतीने अभ्यास करून आपले विचार मांडले. तत्कालीन सामाजिक स्थितीचा विचार केला तर मार्क्स बरोबर आंबेडकरांचे नाव घेण्याची हिंमत कोणी करत नव्हते. महाराष्ट्रामध्ये सर्वप्रथम कार्ल मार्क्स आणि आंबेडकरांना एकत्र आणण्याचे कार्य डॉ. कसबे यांनी केले. हे होत असताना डॉ. रावसाहेब कसबे हे आंबेडकरवादी की मार्क्सवादी असा प्रश्न वाचकांपुढे, चळवळीच्या कार्यकर्त्यांपुढे आणि साहित्यिकांपुढे उभा राहिला आणि याच प्रश्नावर विचार करून या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी संशोधन करावे यासाठी सदर प्रबंध लिहिण्याचे ठरविले आहे. डॉ. रावसाहेब कसबे यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा करून त्यांनी लिहिलेल्या छोटया पुस्तिकेपासून ते भल्यामोठया ग्रंथांपर्यतचा संदर्भ लक्षात घेऊन व डॉ. कसबेंवर झालेल्या लिखानावरून पुढील काही निष्कर्षापर्यंत पोहचता आले आहे.

## निष्कर्ष—

- **डॉ. रावसाहेब कसबे हे सर्वमान्य राजकीय विचारवंत आहेत.**

डॉ. रावसाहेब कसबे यांनी महाविद्यालयीन जीवन सुरू होण्यापूर्वीपासूनच विविध साहित्य वाचले होते. त्यात प्रामुख्याने मराठी ललित साहित्य, ह. ना. आपटे, नाथमाधव, खांडेकर, फडके, माडखोलकर, पेंडसे, अत्रे, कुसुमाग्रज, विभावरी शिरूरकर, पु. ल. देशपांडे इत्यादींचा उल्लेख करता येईल. आचार्य जावडेकरांचे 'गांधीवाद', डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे 'ॲनिहिलेशन ऑफ कास्ट' आणि कार्ल मार्क्स व फ्रेडरिक एंजल्सचे 'कम्युनिस्ट मेनिफेस्टो' या तीन पुस्तकांनी डॉ. कसबे यांना विशेष प्रभावित केले आहे. दया पवार, दादासाहेब रूपवते, प्राचार्य म. भि. चिटणीस, प्राचार्य म. वि. कौंडिण्य, डॉ. गंगाधर पानतावणे यांच्याशी डॉ. कसबे वेगवेगळ्या विषयांवर वेळोवेळी चर्चा करत असत. लहानपणापासून खूप शिकावे, खूप वाचावे याबरोबरच समाजसुधारणेची तळमळ त्यांच्याकडे प्रचंड मोठया प्रमाणात होती. त्यांनी अकोले जि. अहमदनगर येथे मॉडर्न हायस्कूलमध्ये असल्यापासून राजकीय धडे गिरवायला सुरूवात केली होती. 'जनरल सेक्रेटरी' झाल्यापासून ते 'जेष्ठ विचारावंता'पर्यंतचा त्यांचा प्रवास अत्यंत संघर्षमय राहिला आहे. अस्पृशांना मंदिर प्रवेश नव्हता. तत्कालीन परिस्थितीपासून त्यांना विविध सामाजिक घटनांची चिकित्सा करण्याची सवय होती. तसेच विविध क्षेत्रातील नामवंत, गाढे अभ्यासक, जेष्ठ विचारवंत यांच्या विचारांतील गहनता लक्षात घेऊन फिरकी घेण्याच्या खुमखुमीचा परिणाम आणि प्रभाव डॉ. कसबे यांच्या विचारांवर पडला आहे.

अहमदनगरला १९६५ साली झालेल्या बौद्ध साहित्य संमेलनामध्ये डॉ. रावसाहेब कसबे यांचे भाषण खूपच गाजले होते. वैचारिक विश्वात अतिशय आदराचे, दबदबा असलेले नाव जगाला माहित झाले ते 'झोत' लिहूनच. हा ग्रंथ लिहिल्याने सामाजिक

आणि राजकीय क्षेत्रात अत्यंत खळबळ उडाली. त्या पुस्तकाची होळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडून झाल्याने महाराष्ट्राचे अवघे वैचारिक क्षेत्र ढवळून निघाले.

'आंबेडकरवाद' आणि 'मार्क्सवाद' या दोन विचार प्रवाहामुळे राजकीय क्षेत्राला विशिष्ट प्रकारचे वळण मिळालेले आहे. संपूर्ण जगाला छेद देणारी मार्क्सवादी विचारसरणी ही आंबेडकरी विचारांतून अभ्यासण्याची गरज डॉ. रावसाहेब कसबे या विचारवंताला वाटली. शरद पाटील, नामदेव ढसाळ, यशवंत मनोहर, अर्जुन डांगळे यांनी आंबेडकर आणि मार्क्स यांना एकमेकांच्या जवळ आणण्यासाठी प्रयत्न केले. परंतु अशा प्रकारचे प्रयत्न सर्वप्रथम डॉ. रावसाहेब कसबे यांनीच केलेले आहेत. यामुळेच महाराष्ट्र शासनाबरोबरच बऱ्याच संस्थांनी डॉ. रावसाहेब कसबे यांना गौरविले आहे. कॉ. रणजित परदेशी यांच्या मुलाखती मधूनही डॉ. कसबे यांच्या समन्वयवादी विचारांना पाठिंबा मिळाला आहे. त्यांच्या मतेही आज दलित चळवळ आणि कम्युनिस्ट चळवळ यांनी जात आणि वर्गाचे प्रश्न हातात हात घालून सोडविले पाहिजेत असे स्पष्ट केले.

मे—जून १९७५ च्या समाजप्रबोधन पत्रिकेत त्यांनी 'दलित चळवळीचे भवितव्य' हा लेख लिहून दलितांचे आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठी आंबेडकरवादी ऐवजी मार्क्सवादी अर्थशास्त्र स्वीकारण्याची गरज आहे असे म्हटले. १९७६ च्या मे—जूनच्या अंकात 'आंबेडकरांच्या धर्मांतराचे स्वरूप' हा लेख लिहून व्यक्ती व समाज यांचे मार्क्सवादी दृष्टीने नाते तपासले. १९७५ च्या अस्मितादर्शच्या दिवाळी अंकात त्यांनी आंबेडकरवादाची मांडणी करणारा 'आंबेडकरवाद आणि मराठी साहित्य' हा लेख लिहिला. याबाबात मा. सुधाकर गायकवाड यांनी आपल्या 'डॉ. रावसाहेब एक मूल्यमापन' या पुस्तिकेत सविस्तर लिहिले आहे. माणसाने निर्माण केलेले त्याचे स्वत:चे विश्व आणि मानवाच्या बदलत्या रूपाचा शोध घेण्यासाठी त्यांनी 'मानव व धर्मचिंतन' लिहिले. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना' ते 'आंबेडकर आणि मार्क्स' या प्रवासात सामाजिक

परिवर्तनासाठी तात्त्विक व समाजशास्त्रीय अंगाने ते भौतिक बदलाचा वेध घेत होते. 'हिंदू–मुस्लीम प्रश्न आणि सावरकरांचा हिंदू राष्ट्रवाद'मध्ये त्यांनी प्रथमच वास्तवाकडे पाहण्याच्या आपल्या दृष्टीकोनातून बदल केला. सामाजिक संबंधातच माणसाने ज्या कृती केल्या त्यांची धर्मामध्ये परिणत झाली असे मार्क्सने गृहितक मांडले. डॉ. कसबे एरिक फॉमच्या सहाय्याने निसर्गातील प्राणीसृष्टीतील प्रत्येक प्राण्यात त्याच्या स्वतःच्या जीवन अस्तित्वाच्या सुरक्षितेची प्रेरणा ही सर्वाधिक प्रबळ मानतात. थोडक्यात रावसाहेब संपूर्ण मानवापासून व्यक्तिगत माणसाकडे झालेल्या प्रवासाचे वर्णन करतात. डॉ. रावसाहेब कसबे यांनी आपल्या लिखानात एका नवीन समाजाचे स्वप्न रंगविले आहे.

- **डॉ. रावसाहेब कसबे यांच्या विचारांवर आंबेडकरी विचारांचा प्रभाव आहे.**

१२ नोव्हेंबर १९४४ रोजी आंबेडकरी विचारांची पार्श्वभूमी असणाऱ्या दारिद्रयात जीवन जगणाऱ्या एका दलित कुटुंबात रावसाहेब कसबे यांचा जन्म झाला. १९५० च्या दरम्यान अकोले तालुक्यात मा. दादासाहेब रूपवते यांनी गावागावात आंबेडकरी चळवळ घेऊन जाण्याचे काम केले. भिम जयंतीलाच नव्हे तर कोणतेही अगदी लग्नाचे सुद्धा निमित्त करून दादासाहेब रूपवते चळवळीच्याद्वारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार घराघरात पोहचविण्याचे काम त्यांनी केले आहे. मेलेल्या जनावरांचे मांस तोडू नये असे निश्चित झाल्यानंतरही रावसाहेबांचे वडिल मांस तोडताना पकडले गेल्याने भोक पडलेला एक पैसा दंडही भरावा लागला आणि हे सर्व जवळून रावसाहेबांनी पाहिले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे पदव्युत्तर शिक्षण घेण्यासाठी डॉ. कसबे जेव्हा गेले खऱ्या अर्थाने तेव्हाच त्यांच्यातल्या 'आंबेडकरवादाची' दारे खुली झाली. याच ठिकाणी त्यांच्या विचारांना चालना मिळाली. त्याच्या मते आंबेडकरी चळवळीची सुरूवात येथेच झाली. पुढे अनेक विभूतींच्या सहवासात राहण्याची,

त्यांच्याबरोबर चर्चा करण्याची संधी त्यांना मिळाली. वय वर्ष २० असताना, एवढया कमी वयात डॉ. रावसाहेब कसबे हे अहमदनगर येथे भरलेल्या बौद्ध साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष होते. कवी कुसुमाग्रज हे उद्घाटक आणि कर्मवीर दादासाहेब गायकवाड हे प्रमुख पाहुणे असताना त्यांचे भाषण विशेष गाजले. डॉ. रावसाहेब कसबे यांनी व्यवहाराचे प्रतिबिंब आपल्या व्यवहारात उमटविले परंतु हे करताना उशीर झाला अशी खंत कॉ. किशोर ढमाले यांनी व्यक्त केली. व्यवहारातून मार्क्स–आंबेडकर समन्वयाचा विचार पुढे आला. कॉ. किशोर ढमाले असेही म्हणतात की, “व्यवहार विचाराला जन्म देते आणि विचार व्यवहाराला पुढे नेतो. डॉ. कसबे यांनी दलित प्रश्नांतून वर्गाचे प्रश्न काढले व कम्युनिस्ट चळवळीमध्ये जातीचे प्रश्न कसे महत्वाचे आहेत हे सांगितले. म्हणजेच या दोन्हीही चळवळीपुढे आरसा धरण्याचे काम सर्वप्रथम डॉ. रावसाहेब कसबे यांनीच केले. डॉ. कसबे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नंतरचे महाराष्ट्रातील एक महान विचारवंत आहेत.”

डॉ. बाबासाहेब आंबेडकर या अव्वल दर्जाच्या राजकीय विचारवंता संदर्भात फक्त महाराष्ट्र नव्हे किंवा फक्त भारत नव्हे तर देशी–परदेशी अभ्यासकांनी मोलाचे काम केलेले आहे. डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा वारसा घेऊन आपले वैचारिक कार्य महाराष्ट्रातील ज्या विचारवंत, लेखकांनी केलेले आहे त्या यादीमध्ये डॉ. रावसाहेब कसबे यांचे नाव पहिल्या क्रमांकावर घेतले गेले आहे. त्यांच्या साहित्यातील विचारांची मांडणी पाहिली तर आपणास पदोपदी ‘आंबेडकर विचार’च दिसून येतील. त्यामुळेच जरीही आख्खे आयुष्य दारिद्रयाच्या खाईत गेलेले असले तरी आंबेडकरी पार्श्वभूमी लाभल्यानेच देशाच्या वैचारिक क्षेत्रात अतिशय आदराचे आणि दबदबा असलेले विचारवंत म्हणून वेगळा ठसा उमटविला आहे. त्यांनी स्वत: अस्पृश्याचे चटके भोगलेले आहेत. जातिव्यवस्था अनुभवली आहे. आजही पाहिले तर जातिव्यवस्थेचा प्रश्न कळीचा बनला

आहे आणि जेथे जातिव्यवस्थेच्या प्रश्नाची चर्चा होते तेथे 'आंबेडकरवाद' येतोच. डॉ. कसबे यांनी अशा विविध प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी मार्क्सवादाबरोबरच आंबेडकर वादाचे योगदान महत्त्वाचे मानले आहे.

पुढारलेल्या समाजाला चळवळीचे मूल्यमापन करता आले पाहिजे. ते मूल्यमापन करता यावे यासाठी महात्मा फुले यांचा 'गुलामगिरी', 'सार्वजनिक सत्यधर्म', 'जातीसंस्थेचा उच्छेद', बाबासाहेबांचा 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' हे ग्रंथ अभ्यासावे लागतात. असे झाले तरच फुले आंबेडकरांच्या चळवळी नुसत्या विध्वंसक नव्हत्या तर नव्या समाजव्यवस्थेची, नव्या जीवनमूल्यांची स्वप्ने पाहणाऱ्या चळवळी होत्या याची जाणीव होईल. डॉ. रावसाहेब कसबे यांनी डॉ. आंबेडकरांचे कार्य कसे विविधांगी होते हेही पटवून दिले आहे. स्वातंत्र्योत्तर भारताची समाजव्यवस्था कोणत्या मूल्यावर उभी असावी, स्वतंत्र भारताची राज्यघटना कशी असावी यासंबंधी दृष्टी देणारे त्यांचे महत्त्वाचे राजकीय कार्य आहे. कामगारांचे प्रश्न कसे सोडवावे त्यासाठी कोणत्या चळवळी कराव्या लागतील त्यासाठी राजकीय पक्ष कसा असावा या आणि अशा विविध स्वरूपाच्या जटील सामाजिक व राजकीय प्रश्नांची चर्चा डॉ. बाबासाहेबांनी जी केली त्याचा उल्लेख आवर्जून डॉ. कसबे आपल्या केशव गोरे स्मारक ट्रस्ट प्रकाशनाद्वारे १९८३ साली प्रकाशित झालेल्या 'दलित चळवळीची वाटचाल' या पुस्तकात करतात. पुढे असेही म्हणतात, राजकारण समजून घ्यायचे असेल तर बाबासाहेबांना समजून घेतले पाहिजे. आज नेमकी राजकीय डावपेचांचा अर्थ लावण्यात आपण अपयशी ठरत आहोत. म्हणजेच डॉ. कसबे यांच्या मते राजकारणाचे सूत्र समजण्यासाठी 'आंबेडकरवाद' समजून घेण्याची गरज आहे.

- **डॉ. रावसाहेब कसबे यांच्या विचारांवर मार्क्सवादी विचारांचा प्रभाव पडला आहे.**

दिनांक २० मार्च २००९ रोजी मा. डॉ. रावसाहेब कसबे यांच्याशी प्रत्यक्ष केलेल्या चर्चेवरून, मुलाखतीवरून तसेच त्यांचे 'आंबेडकर आणि मार्क्स' या ग्रंथावरून

तसेच डॉ. रावसाहेब कसबेंविषयी ज्यांनी ज्यांनी अभ्यास केला उदा. मा. उत्तम कांबळे, मा. सुधाकर गायकवाड यांनी दिलेल्या दाखल्यांवरून अशा निष्कर्षापर्यंत येता येते की, डॉ. कसबें यांच्यावर ज्याप्रमाणे आंबेडकरवादाचा प्रभाव पडला होता तसाच प्रभाव मार्क्सवादी विचारांचाही पडला आहे. "झापडबंद वर्गवादाला डॉ. आंबेडकरांनी विरोध केला परंतु कम्युनिस्ट चळवळीने त्याकडे दुर्लक्ष केले. परिणामी दलित चळवळ मार्क्सवादाच्या जवळ गेली नाही. त्यामुळे कम्युनिस्टांनी देखील आंबेडकरवादाच्या विरोधात प्रचार सुरू केला. ब्राम्हणी कम्युनिस्टांनी मार्क्सवादी चळवळीमध्ये जातीचा प्रश्न येऊ दिला नाही. उलट त्यांना जातीयवादी ठरविले. कॉ. शरद पाटील हे त्याचे उदाहरण आहे." असे कॉ. किशोर ढमाले डॉ. रावसाहेब कसबे यांच्या विचाराला मार्क्सवादी विचारांचा प्रभाव कसा पडला याचे स्पष्टीकरण देताना सांगितले. डॉ. रावसाहेब कसबे यांच्या मते १९७०च्या दशकात दलित चळवळीला मार्क्सवादी नेतृत्व दिले. मार्क्सवादी चिंतनामध्ये जाती निर्मूलनाचा विचार नव्हता. त्यांना आर्थिक सत्ता आली की जाती संपतील तसेच समाजवादी समाजरचना आली की जातीसंस्था आपोआप नष्ट होतील. डॉ. कसबे म्हणतात की, समाजवाद आणावयाचा असेल तर सगळ्या जातीतले दलित एकत्र यावे लागतात. भारतात जातींमध्येच वर्ग निर्माण झाले आहेत. याबरोबरच असेही म्हणतात की, दलित चळवळ ही जाती अंतासाठी व मार्क्सवादी चळवळ ही दारिद्रयाचा अंत करणारी चळवळ आहे. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर सुद्धा मार्क्सवादावर एकदम हल्ला करत नाहीत त्यांच्या 'बुद्ध आणि मार्क्स' हा पेपर या दृष्टीने महत्त्वाचा आहे. मूळ मार्क्सवादाला डॉ. बाबासाहेबांचा फारसा विरोध नव्हता. एक काळ असा होता की दलितांचे प्रश्न फक्त डावेच सोडवू शकत होते. दलित समाजात मार्क्स आणि मार्क्सवादाबाबत चूकीच्या समजूती प्रसृत करण्यासाठी बाबासाहेबांच्या 'बौद्ध धम्म व साम्यवाद' या भाषणाचा संदर्भ मुक्तपणे घेण्यात येतो. मार्क्सवादयांनी देखील पूर्वग्रह मागे सारून बुद्धाच्या तत्त्वप्रणालीचा

अभ्यास केला. डॉ. रावसाहेब कसबेंनी आंबेडकरवादाच्या मांडणीसाठी जसे आपले योगदान दिले तसेच योगदान मार्क्सवादासाठी दिलेले आहे. डॉ. कसबेंनी महाविद्यालयीन शिक्षण घेत असतानासुद्धा मार्क्सवाद अभ्यासला आहे. कार्ल मार्क्सने ज्या अवस्थांचे वर्णन केले आहे त्या सर्व अवस्था डॉ. कसबे यांनी प्रत्यक्ष जीवन जगताना अनुभवल्या आहेत. साम्यवादाची सुरूवात या जगात पिळवणूक आहे या सिद्धांतापासून होते. तसेच आंबेडकरावादाची सुरूवात 'जाती' पासून होते. माकर्सवाद धर्माला अफूची गोळी मानतो याचे कारण धर्माचा सामान्य माणसांना अंधश्रद्धेत ठेवण्याचा, त्याची पिळवणूक करण्याचा विज्ञान आणि बुद्धीवादाविरूद्ध असलेल्या साऱ्या भूमिकांचा इतिहास समोर होता.

इतिहासाचे आकलन होण्याच्या दृष्टीने तसेच भविष्य घडविण्याच्या दृष्टीने जे परिस्थितीचे मूल्यमापन करणे आवश्यक असते त्याच्यासाठी मार्क्सवादी दृष्टीच्या उपयोगाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. डॉ. रावसाहेब कसबे याचे वर्णन करतात की, "कार्ल मार्क्स आणि मार्क्सवादाचे सुप्त आकर्षण आंबेडकरांच्या संपूर्ण जीवनात, भारतीय कम्युनिस्टांच्या विरोधात जाऊनही टवटवीत राहिले आहे." म्हणजेच मार्क्सवादाबाबतचे दृष्टीकोन लक्षात घेता आंधळ्या प्रचारकाच्या नजरेतून मूल्यमापन होऊ नये या अंगाने विचार करणे आवश्यक आहे. डॉ. रावसाहेब कसबे यांनी याच विचाराचा धागा पकडून आपले वैचारिक क्षेत्र प्रगल्भ केले आहे. माणसाला केंद्रबिंदू मानून त्यांनी आपल्या 'आंबेडकर आणि मार्क्स' या ग्रंथात दोन्ही महापुरुषांची चिकित्सा केली आहे. भारतातील माणसाने मार्क्सबद्दल आपले विचार एकदम घट्ट करून ठेवले आहेत ते असे की, मार्क्सवादाने जातीसंस्थेबद्दल मुळीच विचार केला नाही असे असले तरी डॉ. रावसाहेब कसबे म्हणतात की, या मंडळींच्या मनातील समज हे नुसते गैरसमज नाहीत तर ही त्यांनी सवतःच स्वतःची आणि पर्यायाने त्यांच्या चळवळीची करून घेतलेली अक्षम्य फसवणूक आहे. आंबेडकरांबरोबरच तत्कालीन परिस्थितीत कार्ल मार्क्स सुद्धा प्रागतिक

चळवळीतील तरुणांच्या, तरुण लेखक कवींच्या जिव्हाळ्याचे आणि आकर्षणाचे विषय होते व पाहता पाहता मार्क्सवादी तत्त्वज्ञानाला एक तृतीयांश जगाने वास्तवात आणले. डॉ. रावसाहेब कसबे म्हणतात, "डॉ. बाबसाहेब आंबेडकरांना व्यवहारात बुद्ध आणि मार्क्स यांच्यात मतभिन्नता दिसत होती. म्हणून त्यांनी साधनांची भिन्नता स्पष्ट केली आहे." दलित बहुजनांच्या दृष्टीने समाजवादी चळवळ कायम शहरी–ब्राम्हणी मध्यमवर्गीयच राहिली. भारतासाठी समाजवादाचा संदर्भ आर्थिक पेक्षा सामाजिकच अधिक आहे. डॉ. रावसाहेब कसबे मुलाखतीमध्ये असेही म्हणतात की, दलित पॅंथरसुद्धा उदयाला आली तेव्हा तिला डावी विचारसरणी स्वीकारावी लागली कारण दलितांचे प्रश्न त्या काळात फक्त डावे पक्ष किंवा मार्क्सवादी चळवळच सोडवू शकत होती. या पॅंथर्सला वैचारिक पाया मार्क्सवादी चळवळीने दिला म्हणून ती क्रांतिकारी चळवळ बनली. यावरून डॉ. रावसाहेब कसबे यांच्यावर मार्क्सवादी चळवळींचा मोठा प्रभाव पडला होता. तसेच जरीही आंबेडकरवादी चळवळीत डॉ. कसबे वाढले असले तरी त्यांची मार्क्सवादी विचारांशी जवळिक होतीच असे जेष्ठ विचारवंत मा. रणजित परदेशी डॉ. रावसाहेब कसबेंबद्दल सांगतात, प्राचार्य म. ना. कांबळे यांचेशी चर्चा करतानाही हेच जाणवले की जरीही डॉ. कसबे आंबेडकरवादी असले तरी सुरूवातीला प्रत्येकाला, मार्क्सवादी झाल्याशिवाय आंबेडकरवाद समजणार नाही. म्हणजेच डॉ. कसबेंवर आंबेडकरांच्या विचारांशी तुलना करता प्राचार्य म. ना. कांबळे यांच्या मते डॉ. रावसाहेब कसबे मार्क्सवादी अधिक आहेत.

- **डॉ. रावसाहेब कसबे यांच्या राजकीय विचारसरणीवर आंबेडकरवादी आणि मार्क्सवादी चळवळींचा प्रभाव दिसून येतो.**

डॉ. रावसाहेब कसबे यांचे बालपण आंबेडकरी चळवळीत गेले. चळवळीच्या संस्कारातूनच त्यांनी आपले लिखान केलेले आहे. दलितांच्या प्रागतिक चळवळीबाबतचे

विचार, चिकित्सक वृत्ती, जातीबाहेरील त्यांचा मोठा परिवार तसेच मार्क्सवादाबाबतचे मत. बाबासाहेब आंबेडकर मुळात समाजवादी समाजरचनेचा पुरस्कार करणारे नेते होते असे असले तरी लोकशाहीद्वारे या समाजरचनेची स्स्थापना व्हावी ही अपेक्षा होती या दृष्टीने डॉ. कसबे यांनी आपले लिखान आंबेडकरवादी मार्क्सवादी आणि मानवतावादी हेतूने केलेले आहे.

१९५६ च्या नंतर १९७० च्या दरम्यान भारतीय राजकारणात उजवे आणि डावे या राजकीय शक्तीतील संघर्षामुळे गोंधळाची स्थिती निर्माण झाली होती. या परिस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे साहित्य, विचार महत्त्वाचे मानले गेले आणि दलित आणि पुरोगामी संघटना आणि चळवळीशी महाराष्ट्रातील दलित संबंधित असल्याने डाव्या आणि उजव्या विचारसरणीवरील चर्चेला महत्त्व आले. दलित चळवळींचे नेतृत्व प्रस्थापितांच्या हातात गेल्याने चळवळीचा 'आत्मा' खऱ्या अर्थाने निघून गेला. यातून पुढे पॅंथर्सची निर्मिती झाल्याचे दिसते. मार्क्स आणि आंबेडकरांच्या विचारांचा अभ्यास यादृष्टीने अत्यंत महत्त्वाचा मानला गेला. डॉ. रावसाहेब कसबे यांचेवर ज्याप्रमाणे डॉ. आंबेडकरांच्या 'ॲनिहिलेशन ऑफ कास्ट' चा प्रभाव पडला तसाच प्रभाव 'कार्ल मार्क्स' व एंजल्सच्या 'कम्युनिस्ट मेनिफेस्टो' चाही प्रभाव पडलेला दिसून येतो.

कार्ल मार्क्स आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोन्ही युगपुरुषांचा कालावधी वेगळा असला, दोन्ही महापुरुषांचे विचार वेगवेगळ्या दिशांना जाणारे असले तरी या दोघांचा विचारांचा प्रभाव डॉ. रावसाहेब कसबे यांच्यावर पडून त्यांच्या एकत्रीकरणाची संकल्पना सांगतात. मा. कॉ. रणजित परदेशी यांची याविषयी मुलाखत घेतली त्यामध्ये त्यांनी सांगितले की, आज मार्क्सवादी विचार आणि आंबेडकरवादी विचार या वेगवेगळ्या दोन विचारांना एकत्र आणले पाहिजे आणि असा सर्वप्रथम विचार करणारा विचारवंत महाराष्ट्रामध्ये एकच होता तो म्हणजे फक्त डॉ. रावसाहेब कसबे.

कॉ. शरद पाटील यांनी मार्क्सवाद आणि आंबेडकरवाद यांची तुलना केली परंतु त्यांनी जे विचार किंवा तत्त्वज्ञान मांडले ते तत्त्वज्ञान डॉ. रावसाहेब कसबे यांनी जी मार्क्स—आंबेडकरांची तुलना केली त्यावरच आधारित आहे. म्हणजे दलित चळवळीला वास्तवाची जोड देण्यासाठी मार्क्स—आंबेडकर समन्वयाची आवश्यकता आहे. प्रा. रणजित परदेशी या थोर विचारवंताने असे विचार मांडले की तत्त्व आणि व्यवहार यात फरक आहे. 'मार्क्स—आंबेडकर' समन्वयाची मुळची संकल्पना डॉ. कसबे यांचीच आहे या Theory ला Philosophy च्या चौकटीत बसविण्याचे काम कॉ. शरद पाटील यांनी केले. आज प्रत्येक जातींमध्ये वर्ग निर्माण झालेले आहेत. जातींनी एकत्र आले पाहिजे. मार्क्सवादी चळवळीने दलितांच्या जातीचा प्रश्न इतिहासात हाताळला नाही. परिणामत: दलित आणि मार्क्सवाद यांचे सूत्र जमत नाही. कॉ. शरद पाटील यांच्या मते जातींच्या कप्प्यांना ब्राम्हण निमंत्रित करतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कार्ल मार्क्स यांनी जे विचार मांडले त्यात अनुक्रमे 'जात' आणि 'वर्ग' यांचा विचार केला गेला. हे दान्हीही विषय वादग्रस्त राहिले आहेत. त्यांचा विचार आधारभूत मानून अनेक संस्था, संघटना, राजकीय पक्ष निर्माण झालेले आहेत. आंबेडकर आणि मार्क्स यांचा एकत्रित विचार कर्मठ कम्युनिस्टांना आणि सनातनी दलितांना संतप्त करणारा विचार आहे. बहुतेक धर्मपीठांनी मार्क्सला बहिष्कृत मानले परंतु आंबेडकरांनी मार्क्सला बहिष्कृत मानले नाही. मार्क्सवर टीका केली परंतु त्यांचे वैचारिक आणि व्यावहारिक योगदानही मान्य केले. कम्युनिस्ट विरोधी वातावरणात राहूनही डॉ. कसबे यांनी मार्क्सवादाकडे चिकित्सक वृत्तीने पाहिले आहे. दोन्ही विचारांच्या समन्वयाच्या दृष्टीकोनातून डॉ. रावसाहेब कसबेंनी आपल्या विचार विश्वाचा पाया व्यापक केला.

१९७१ साली महाडच्या बौद्ध साहित्य संमेलनामध्ये डॉ. रावसाहेब कसबेंनी आंबेडकर आणि मार्क्स यांचा एकत्रित विचार करणे आवश्यक आहे असे विचार सर्व प्रथम मांडले. याचा परिपाक म्हणूनच त्यांचे १८८५ साली 'आंबेडकर आणि मार्क्स'ची पहिली आवृत्ती आली आणि २००६ मध्ये नवीन प्रस्तावनेसह दुसरी आवृत्ती बाहेर आली. म्हणजेच मार्क्स–आंबेडरवादी विचारांच्या एकत्रीकरणाबाबत डॉ. रावसाहेब कसबेंनी १९७१ पासून उघडपणे भूमिका मांडायला सुरूवात केली. डॉ. कसबेंनी विचारवेध संमेलनाचे अध्यक्ष असताना आपल्या भाषणात त्यांनी मार्क्सवादी–आंबेडकरवादी विचारसरणी स्वीकारणाऱ्या सर्व चळवळींचा एकत्रित विचार केलेला आहे.

फेब्रुवारी २००९ मध्ये तीन दिवस 'दलित चळवळीचे स्वरूप' या विषयावरील चर्चेमध्ये डॉ. रावसाहेब कसबे यांनी पुन्हा एकदा दलित चळवळीचा विचार करावयाचा असेल तर मार्क्सवादाला वगळून चालणार नाही असे विचार मांडले. डावी विचारसरणी आणि आंबेडकरवादी विचारसरणी एकत्र आणण्यासाठी प्रयत्न व्हायला हवे आहेत तरच जागतिकीकरणाच्या रेटयात चळवळ टिकून राहील. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार हे समतावादी असून समताधिष्ठित सामाजिक पुनर्रचना हाच डॉ. कसबेंच्या विचारांचा केंद्रबिंदू आहे. त्यांनी महाराष्ट्राची तसेच भारताच्या सामाजिक परिस्थितीच्या संदर्भात मार्क्स आणि आंबेडकर यांचे विचार परस्परपूरक मानून क्रांतीच्या तत्त्वज्ञानाची मांडणी केली. "जागतिकीकरणामध्ये आज भारतात आंबेडकर–मार्क्स समन्वयाशिवाय कुणालाही क्रांती करता येणार नाही. जागतिकीकरणाच्या रेटयात जातीव्यवस्था व वर्गव्यवस्थेचे प्रश्न अधिक गंभीर बनले आहेत. हे वास्तव ओळखून डॉ. कसबे यांनी समन्वयवादी विचार मांडले आहेत. त्यांच्या एकूणच साहित्यातून ते समन्वयवादीच आहेत हे सिद्ध होते. विद्यार्थीदशेत मात्र ते आंबेडकरवादी होते परंतु आज त्यांच्या जीवनाचे सूत्र समन्वयवादीच राहिले आहेत." म्हणजेच आंबेडकरवादी चळवळीतूनच ते समन्वयाच्या वैश्विक सूत्रापर्यंत

पोहोचले आहेत असे स्पष्ट मत कॉ. किशोर ढमाले यांनी आपल्या मुलाखतीमध्ये व्यक्त केले.

- **डॉ. रावसाहेब कसबे हे आंबेडकरवादी आहेत.**

आंबेडकरवाद आणि मार्क्सवाद यांचे संयुक्तीकरण असणारे विचारवंत महाराष्ट्रामध्ये मोजकेच आहेत. या सर्वांमध्ये डॉ. रावसाहेब कसबे यांचे नाव प्रथम घेतले जाते. थोर विचारवंत डॉ. रावसाहेब कसबे हे स्वतः दलित कुटुंबातील असून दलित म्हणून जे सामाजिक चटके भोगावे लागतात ते त्यांनी, त्यांच्या कुटुंबाने भोगलेले आहेत. त्यांच्या बालपणापासून आजूबाजूला मा. दादासाहेब रूपवते यांच्यासारख्या दलित कार्यकर्त्याने दलित चळवळीला वेगळेपण, अनुकूल वळण देण्याचा चंग बांधला होता. या चळवळीची पार्श्वभूमी डॉ. कसबे यांना लाभली. चळवळीचे बाळकडू त्यांना तेथेच मिळाले. त्यामुळेच एवढया कमी वयामध्ये १९६५ साली बौद्ध साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष होण्याचा मान त्यांना मिळाला व २० व्या वर्षी त्यांनी संमेलनात केलेले भाषण गाजले. आंबेडकरी विचारांची कळकळ असल्यानेच त्यांना वैचारिक क्षेत्रात दबदबा असलेले नाव कमावता आले. त्यांनी जेव्हा 'झोत' लिहिले त्याचवेळी त्यांचे नाव आख्ख्या जगाला माहित झाले.

आज अनेक महापुरुषांच्या नावाने वेगवेगळे विचार घेऊन अनेक विचारसरणी निर्माण झालेल्या आहेत. परंतु एकावेळी वेगवेगळ्या दोन विचारसरणींना एकत्र आणून त्याचा फायदा आपल्या दलित चळवळीला करून देणारे विचारवंत अगदी मोजकेच आहेत. डॉ. कसबे यांचे आंबेडकरी विचारांना जसे योगदान लाभले तसे मार्क्सवादी विचारांनाही मोठे योगदान लाभलेले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कार्ल मार्क्स या दोन्हीही महापुरुषांना प्रमाण मानून परस्परांपासून वेगवेगळे दोन प्रवाह निर्माण झाले, दोन वेगवेगळ्या चळवळी निर्माण झाल्या, दोन्ही चळवळींचे उद्दिष्ट वेगवेगळे झाले असे

असले तरी आज मात्र दोन्हीही चळवळी आपापल्या विचारसरणीशी कट्टर नाहीत, कडव्या नाहीत. कारण डॉ. रावसाहेब कसबे यांच्यासारख्या विचारवंतांनी दोन्ही चळवळीतील दरी कमी केली. यामुळे अनेक पुरस्कारही पटकाविले आहेत.

सद्य स्थितीचा विचार करता जातीचा प्रश्न कळीचा बनला आहे. जेथे जातीच्या प्रश्नाची चर्चा होते तेथे आंबेडकरवाद येतो. आंबेडकरवादी दृष्टीकोनातून जातीचा प्रश्न महत्त्वाचा होताच परंतु मार्क्सवादाने सुद्धा यात कोणती भूमिका घ्यावी याविषयी डॉ. कसबे यांनी विचार मांडले आणि ते सर्वमान्य झाले. कॉ. शरद पाटील यांनी त्या विचाराला साचेबंद केले. तत्त्वज्ञानाच्या आराखडयात १९७७ साली त्यांनी आपला वैचारिक प्रवास सुरू केला. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना' हे पुस्तक लिहून. त्यांनतर 'झोत', 'दलित चळवळीची वाटचाल', 'आंबेडकर आणि मार्क्सवाद' १९८९ मध्ये 'आंबेडकरवाद तत्त्व आणि व्यवहार' लिहिले. म्हणजे १९६० पर्यंतचा त्यांचा वैचारिक प्रवास आंबेडकरी विचरांना आधारभूत मानून झाला. नंतरच्या काळात मात्र त्यांच्या विचारांचा आधार कम्युनिस्ट विचारसरणीत सापडतो आणि तिसऱ्या टप्प्यात आंबेडकरवादी, मार्क्सवादी विचार मांडून झाल्यानंतर दोन्ही विचारांचा समन्वय मांडण्यास सुरूवात केली. त्यामुळे त्यांची मोठी टीकाही झाली. सर्वसामान्य कार्यर्त्यापुढे, दलित चळवळीतील प्रत्येक कार्यर्त्यापुढे असा प्रश्न पडला की कोणाचे नेतृत्व स्वीकारावे? डॉ. कसबे यांनी जेव्हा मार्क्सवादाचे उघडपणे समर्थन केले व त्याला आंबेडकरवादाशी जोडले त्यावेळी ते मार्क्सवादी असल्याची टीका झाली. त्या टीकेला तोंड दयावे लागले. मात्र ते असे म्हणतात की, या वादांतून स्वत:ला वजा केले तर काहीच शिल्लक राहत नाही. कोणताही माणूस शंभर टक्के मार्क्सवादी अथवा शंभर टक्के आंबेडकरवादी असू शकत नाही. ज्याच्या त्याच्या कुवतीप्रमाणे त्याला आंबेडकरवाद आणि मार्क्सवाद समजेल. आकलन जसे होईल तसे तो कृती करेल. डॉ. आंबेडकरांनी मार्क्सवादाला

अंमित: डायरेक्ट विरोध केलेला नाही. सगळ्या दलितांनी एकत्र येऊन समाजवादी समाजरचना निर्माण केली तर जातीसंस्था आपोआप नष्ट होईल. असे म्हटले जाते की जातीचा प्रश्न सोडवायला गेला तर वर्ग प्रबळ होतात परंतु डॉ. रावसाहेब कसबे यांनी मुलाखतीत एका प्रश्नाला उत्तर देताना असे सांगितले की, जाती अंताची चळवळ करणारी दलित चळवळ आणि दारिद्रयाचा अंत करणारी मार्क्सवादी चळवळ या एकमेकांच्या जवळ आल्या पाहिजेत व जात आणि वर्गाचा लढा पुढे नेला पाहिजे.

वरील सर्व विचार मांडले ते दलित चळवळीच्या उन्नतीसाठी, विकासासाठीच. त्यांनी आंबेडकरवादाला मूलभूत मानून दलितांच्या प्रश्नांची चर्चा केली आणि दलितांमध्ये असणारे प्रश्न, दलित चळवळीमध्ये येणारे अडथळे मार्क्सवादी तत्त्वज्ञानाचा आधार घेऊन कसे सोडविता येतील याविषयी विचार मांडले म्हणून ते मूलत: आंबेडकरवादीच आहे असा निष्कर्ष काढता येतो. त्यांचे एकूणच लिखान पाहिले तर आंबेडकरी विचारांनाच आधारभूत मानले आहे. दलित समाज, दलित चळवळी, यबाबतची वस्तूस्थिती लक्षात घेऊनच विविध प्रश्नांची चर्चा, विश्लेषण डॉ. रावसाहेब कसबे यांनी केले. जातीचा प्रश्न मूलभूत मानून चिंतन केले आणि जातिनिर्मूलनासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जो लढा दिला, कार्यक्रम दिला त्याचेच समर्थन डॉ. रावसाहेब कसबे यांनी केलेले आहे. मार्क्सवादी विचारांचा आधार घेऊन अंतिमत: आंबेडकरवादाचे उद्दिष्ट साध्य करण्याचेच त्यांचे प्रयत्न आहेत. कॉ. रणजित परदेशी यांनीही वरील मताला पाठिंबा दिला तसेच प्राचार्य म.ना.कांबळे यांनीही आपल्या मुलाखतीत सांगितले की, आंबेडकरवादी असल्याशिवाय भारतात मार्क्सवादी होता येत नाही यावरून असे स्पष्ट होते की त्यांच्या मते डॉ. कसबे मार्क्सवादी असले तरी सर्वप्रथम ते आंबेडकरवादीच आहेत.

## सूचना—

१. भारतीय दलित चळवळींचे दर दहा वर्षांनी अवलोकन होणे आवश्यक आहे. हे करताना शुद्ध आंबेडकरवादी किंवा शुद्ध मार्क्सवादी विचारसरणीतून करण्याऐवजी समन्वयाच्या भूमिकेतून करणे आवश्यक आहे.

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक स्वतंत्र राजनीतीचे निर्माते आहेत. या दृष्टीकोनातून पाहिले तर आजच्या जागतिकीकरणाच्या वातावरणात सकारणात्मक, आत्मनिर्भर, राजनीती जन्माला यावी लागेल. या अनुषंगाने मार्क्स—आंबेडकर समन्वयवादी विचारांकडे पाहता येईल.

३. आज ज्यांना आपण दलित जाती म्हणतो त्यात अनेक वर्ग तयार होत आहेत. या देशात वर्ग व जाती यांची सांगड घालणे आवश्यक आहे. म्हणजे वर्गीय व जातीय राजकारणाची सांगड घातल्याखेरीज चळवळ यशस्वी होणार नाही. या दृष्टीने डॉ. रावसाहेब कसबे यांच्या विचारांचे मूल्यमापन व्हावे.

४. मार्क्सवादी विचारांने आंबेडकरवादी विचारांना आणि आंबेडकरवादी विचारांनी मार्क्सवादी विचारांना दोष देत बसण्यापेक्षा आपापल्या 'सेल्फ ऑडिट' करणे आवश्यक आहे. यातून पुर्नमांडणी आणखी स्पष्ट व्हावी.

५. जनतेच्या इच्छेच्या कक्षेच्या बाहेरील धोरणे जागतिकीकरणात आहेत. हे एक मोठे आव्हान असून हे पेलण्यासाठी आंबेडकरवाद आणि मार्क्सवाद किती उपयोगी पडणार आहे. हे या निमित्ताने पुन्हा एकदा तपासण्याची आवश्यकता आहे.

६. 'मार्क्स—आंबेडकरवादी' विश्लेषण पद्धती भारताच्या वर्गलक्षी राजकीय अर्थशास्त्राला जातलक्षी राजकीय अर्थशास्त्राची जोड देते आणि नव्या आर्थिक धोरणातून पुढे आलेल्या आर्थिक—राजकीय प्रक्रियांचा सम्यक वेध घेण्यासाठी

साधने पुरविते. ही पार्श्वभूमी लक्षात घेऊन ध्येयधोरणांवर प्रभाव गाजविणाऱ्या वर्गीय–जातीय शक्तींचा वेध घेण्यास भारतीय 'व्यवस्था' सज्ज राहू शकेल का? याबाबतचा वेध घेता येईल.

७. आधुनिक राजकीय विश्लेषणातील समाजशास्त्रीय वास्तवदर्शी सिद्धांताची जोड भारतीय लोकशाही क्रांतीच्या आदर्शवादाशी 'मार्क्स–आंबेडकर' करतो. जातीय अंताच्या लोकशाही क्रांतीचा सिद्धातांच्या पायाभरणीसाठी समन्वयवादी विचार उपयुक्त पडू शकतो का हे पडताळून पाहण्याची आवश्यकता आहे.

८. नवसंशोधकांना डॉ. रावसाहेब कसबे यांच्या विचारांमुळे नवी चालना मिळते. संशोधकांनी या नवविचाराकडे अनुकूल दृष्टीने पाहावे व त्या विचारांची प्रत्यक्ष समाजात अंमलबजावणी करावी.

९. व्यवहारातून 'मार्क्स–आंबेडकर समन्वयवादी' विचार पुढे आला आणि समन्वयाच्या विचारांतून व्यवहाराला वेगळी चालना मिळाली. त्यामुळे डॉ. रावसाहेब कसबेंच्या विचाराला एक विचारसरणी म्हणून मान्यता मिळाली.

१०. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यानंतर दलित जातीचे प्रश्न एका वेगळया विचार प्रवाहाआधारे सोडविणारे 'आंबेडकरवादी विचारवंत' म्हणून डॉ. रावसाहेब कसबे यांना अधिमान्यता मिळावी.

## सारांश

**पहिल्या प्रकरणामध्ये** प्रास्ताविक व विषयप्रवेश याचे तसेच या संशोधनाच्या समस्या, उद्दिष्टे, मर्यादा, महत्व, गृहितके, संशोधन पद्धती, संशोधन साहित्याचा आढावा तसेच प्रकरणांचे नियोजन कसे केले आहे याबाबतचे विश्लेषण करण्यात आलेले आहे. निरीक्षण पद्धत आणि मुलाखत तंत्राचा वापर संशोधन प्रकल्पासाठी केला आहे. माहितीचा

प्राथमिक स्त्रोत (Primary data) आणि द्वितीय स्त्रोत (Secondary data) म्हणून त्यांनी लिहिलेली पुस्तके, त्यांची स्वत:ची पुस्तके, मुलाखत आणि इतर सामाजिक कार्यकर्ते, विचारवंत व त्यांच्यावर लिहिलेली पुस्तके यांचा संदर्भ घेतला आहे.

**प्रकरण दोनमध्ये** डॉ. रावसाहेब कसबे यांच्या साहित्याचा परिचय देण्यात आला आहे. परिचयामध्ये जीवनपरिचय, एक विचारवंत आणि समाजसुधारक म्हणून परिचय, त्यांच्या वैचारिक भूमिकेवर पडलेला प्रभाव, महाराष्ट्रातील सामाजिक चळवळी आणि राजकीय विचारसरणीचा प्रडलेला प्रभाव, डॉ. कसबे यांचा वैचारिक प्रवास आणि वैचारिक बैठक, कालक्रमाने केलेले लिखान, लिखानास विविध संस्थातर्फे मिळालेले ग्रंथ पुरस्कार, विविध पुरस्कार, तसेच विविध ठिकाणी भूषविलेले अध्यक्षपद या उपघटकांचे विश्लेषण केले आहे. महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात जातीव्यवस्थेचा प्रश्न कळीचा बनला आहे आणि जेथे जातीव्यवस्थेच्या प्रश्नांची चर्चा होते तेथे ‘आंबेडकरवाद’ येतो. डॉ. रावसाहेब कसबेंनी अशा विविध प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी मार्क्सवाद, आंबेडकरवाद इत्यादी विचारसरणींचा आधार घेतला आहे. प्रामुख्याने या निमित्ताने आंबेडकर विरूद्ध मार्क्सवाद अशी वैचारिक संघर्षाची सुरूवात जेथे जेथे आपणांस पहावयास मिळते तेथे डॉ. रावसाहेब कसबे यांनी मांडलेली भूमिका अभ्यासण्यास संधी मिळते. आजच्या काळात महाराष्ट्राबरोबरच भारतात सुद्धा ‘आंबेडकर’ आणि ‘मार्क्स’ यांची चिकित्सा टाळता न येण्याजोगी निकड जाणवते आहे. ती या दृष्टीकोणातून डॉ. रावसाहेब कसबे यांनी आपले विविध ग्रंथ लिहून, चळवळीस वैचारिक खाद्य पुरवून विशद केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कार्ल मार्क्स, महात्मा फुले यांच्याच तत्त्वज्ञानात डॉ. कसबेंच्या मतांची पाळेमुळे आढळतात. यावरून आपणास डॉ. रावसाहेब कसबे हे अभ्यासक, विश्लेषक आणि समाजसुधारक कसे आहेत याचा परिचय होतो.

डॉ. रावसाहेब कसबेंनी आपल्या लिखानात मार्क्स आणि आंबेडकर यांच्यातील दरी कमी करण्याचे अत्यंत महत्त्वाचे काम केले आहे. डॉ. रावसाहेब कसबे यांनी विविध ग्रंथांतून मांडलेले विचार हे प्रागतिक असल्यामुळे प्रागतिक चळवळीतील कार्यकर्त्यांना मार्गदर्शक तर ठरतातच परंतु आपणास अंतर्मुख बनवितात.

**प्रकरण तीन** मध्ये दलित चळवळीच्या निमित्ताने महाराष्ट्रात जे नेतृत्व निर्माण झाले त्यात त्यांनी तरुणांना सामावून घेण्यात फारसे यश मिळविले नाही. ज्या नेतृत्वाने 'जाती' ऐवजी 'वर्ग' व्यवस्था स्वीकारली. त्या त्या नेतृत्वाला 'मार्क्सवादी' ठरविण्यात आले. रिपब्लिकन पक्ष आणि दलित पॅंथर यांच्या अंतर्गतच जात आणि वर्ग यावरून मतभेद निर्माण झाले होते. साधारणत: १९६६–६७ पर्यंत कार्ल मार्क्सचे नाव घेणे दलित समाजात आंबेडकरी विचार मानणारे एका अर्थाने पाप समजत होते. परंतु १९७० नंतरच्या सामाजिक घडामोडींमुळे आंबेडकरांबरोबरच मार्क्सचे नाव घेण्याबाबतची चर्चा सुरू होण्यास अनुकूल परिस्थिती निर्माण झाली. १५ नोव्हेंबर १९५६ पासून जागतिक बौद्ध भ्रातृसंघाची चौथी परिषद काठमांडू येथे सुरू झाली होती. बाबासाहेब आंबेडकर या परिषदेला एक प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते. २० नोव्हेंबर १९५६ रोजी दुपारच्या सत्रात बाबासाहेब 'बौद्ध धर्मातील अहिंसा' या विषयावर भाषण देणारे होते. दलित समाजात मार्क्स आणि मार्क्सवादाबाबत चूकीच्या समजूती प्रसारित करण्यासाठी या भाषणाचा संदर्भ मुक्तपणे देण्यात येतो.

डॉ. रावसाहेब कसबे आंबेडकरी विचारधारेतून मार्क्सकडे कसे पाहतात यासंबंधी कार्ल मार्क्स ज्याला गरिबांची पिळवणूक म्हणतो त्या संबंधी बुद्धांची भूमिका काय? बुद्धाने धर्माचा जो इमला उभा केला आहे त्याचा मूलाधार काय आहे? बुद्धानेसुद्धा "या जगात दु:ख आहे" असे मान्य केले आहे. परंतु त्यांनी पिळवणूक शब्द वापरला नाही. डॉ. बााबसाहेब आंबेडकरांनी आपल्या तत्त्वज्ञानातून 'पिळवणूक' म्हणजेच 'दु:ख' आहे हे

स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे 'जाती'चा राक्षस राजकीय, आर्थिक सुधारणा करूच देणार नाही. त्याचा पूर्ण नि:पात केल्याशिवाय ते अशक्य आहे. असे विश्लेषण डॉ. आंबेडकर करतात भारतातील माणसाने मार्क्सबद्दल आपले विचार एकदम घट्ट करून ठेवले आहेत ते असे की, मार्क्सवादाने जातिसंस्थेबद्दल मुळीच विचार केलेला नाही. असे असले तरी डॉ. रावसाहेब कसबे म्हणतात की, या मंडळींच्या मनातील समज हे नुसते गैरसमज नाहीत तर ही त्यांनी स्वत:च स्वत:ची आणि पर्यायाने त्यांच्या चळवळीची करून घेतलेली अक्षम्य फसवणूक आहे. 'दास कॅपिटल' मध्येही याबाबतचे जवळजवळ पन्नास संदर्भ दिलेले आहेत.

**प्रकरण चार** मध्ये मार्क्सवादी तत्त्वज्ञानाचा उहापोह करण्यात आला आहे व मार्क्सवादी दृष्टीकोनातून आंबेडकरवादी चळवळीकडे पाहिले आहे. संपर्ण मानवी विकासक्रमाचा इतिहास हा माणसांनी आपल्या कृतीने आपल्या जीवन अस्तित्वाला पोषक ठरेल अशा रीतीने, निसर्गात केलेल्या बदलांचा तपशील आहे. मानव हा प्राणीसृष्टीपासून त्यांच्यात असलेल्या जाणीवेमुळे, धर्मामुळे किंवा अन्य कोणत्याही कारणामुळे वेगळा आहे असे आपण म्हणू शकतो. 'कॅपिटल'पर्यंतच्या लिखानात 'माणूस' हा त्याच्या स्वत:च्या इतिहासाचा आणि स्वत:चाही निर्माता आहे हेच मुख्य सूत्र आहे. जगातले दु:ख, दैन्य दूर करण्यासाठी प्रयत्नशील असणारे कार्यकर्ते, सुधारक, संत महात्मे व कम्युनिस्ट या सर्वांचे ध्येय एकच आहे मार्क्सच्या तत्त्वचिंतनाची सुरूवातच वास्तवातील माणसापासून झाली.. मुळात कोणतेही तत्त्वज्ञान रूक्ष वा निरस नसते तर त्यांच्या मांडणीवर बरेच काही अवलंबून असते

आंबेडकरी चळवळीने जे जे प्रश्न लढयासाठी घेतले त्या लढयात त्यावेळी कम्युनिस्ट उतरले नाहीत. कम्युनिस्टांच्या नाकर्तेपणाचाच हा परिणाम आहे. झापडबंद वर्गवादाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विरोध केला पण कम्युनिस्टांनी त्याकडे दुर्लक्ष

केले त्यामुळे कम्युनिस्ट चळवळ ही कुंठित झाली व आंबेडकरवादाच्या विरोधात प्रचार सुरू केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्नही असेच होते. कारण समाजातील जातीयता रद्द करण्यासाठी, जातीसंस्थेचे उच्चाटन करण्यासाठीचे ध्येय ठरविले होते. कनिष्ठ जाती वरिष्ठ जातीच्या जाचाला कंटाळले होते, व्यथित झाले होते. ही जातीयता संपवून संपूर्ण भारत आणि जग समानतेच्या पायावर उभे करून आदर्श बनवायचे होते यासाठी पिळवणूक नाहीशी करायची असल्याने अनेक सामाजिक आंदोलने उभी केली होती. कार्ल मार्क्सचा लढा वर्गाचा आहे आणि डॉ. बाबासाहेबांचा लढा जातीचा आहे डॉ. रावसाहेब कसबे मार्क्सवाद आणि आंबेडकरवाद या विषयचीचे चिंतन करतात. त्यादृष्टीने आपणास त्यांचे नवीन प्रस्तावनेसह लिहिलेले पुस्तक 'आंबेडकर आणि मार्क्स' अभ्यासणे आवश्यक होते. सदर पुस्तकातील विभाग तीन मध्ये डॉ. रावसाहेब कसबे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची साम्यवादासंबंधीची भूमिका आणि मार्क्सवादाची ओळख विशद केली आहे. हे लिखान मार्क्सवादी चळवळीचे डॉ. आंबेडकर आणि आंबेडकरवादी चळवळीविषयीचे मत अजमावून पाहण्यासाठी उपयुक्त ठरते.

**प्रकरण पाच** मध्ये डॉ. रावसाहेब कसबे यांच्या साहित्यातील मार्क्स–आंबेडकर समन्वय या विषयीचा उल्लेख आहे. याच प्रकरणात त्यांच्या साहित्यावर कार्ल मार्क्सचा प्रभाव व डॉ. आंबेडकरांचा प्रभाव कसा पडला आणि या दोन्ही विचारांचा समन्वय कसा झाला यांचे सविस्तर स्पष्टीकरण करण्यात आले आहे. भारतीय समाजव्यवस्था जातीबरोबर वर्गावरही आधारित आहे यामुळे दोन्ही विचारांच्या समन्वयाची आवश्यकता आहेच डॉ. रावसाहेब कसबे यांच्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित 'ॲनिहिलेशन ऑफ कास्ट', कार्ल मार्क्स व एंजल्सचे 'कम्युनिस्ट मेनिफेस्टो' यांचा विशेष प्रभााव पडला. आंबेडकरवादी प्रवाहाबरोबर डॉ. कसबे यांनी मार्क्सवादी विचार प्रवाहालाही मोठे योगदान दिलेले आहे. व्यवहारातून मार्क्स–आंबेडकर समन्वयाचा विचार पुढे आला आणि

समन्वयाच्या विचारातून व्यवहाराला चालना मिळाली. मार्क्स—आंबेडकर समन्वय विचारामध्ये अमूलाग्र बदल झाला असे म्हणता येत नाही. कारण डॉ. कसबे यांनी समन्वयाचा विचार १९७८ सालाच्या अगोदर मांडावयास हवा होता. तरीही आजच्या काळात वास्तवाला तोंड देताना डॉ. कसबेंचे विचार अत्यंत उपयुक्त वाटतात. समन्वयातूनच मार्क्सवादामुळे आंबेडकरवादाला वैश्विक स्वरूप प्राप्त झाले. आंबेडकर आणि मार्क्स यांचा एकत्रित विचार कर्मठ कम्युनिस्टांना आणि सनातनी दलितांना संतप्त करणारा आहे. परतु डॉ. रावसाहेब कसबे यांच्या मते हे दोघेही पूर्ण कर्मठ किंवा पूर्ण सनातनी राहिलेले नाहीत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मार्क्सला बहिष्कृत मानले नाही. मार्क्सवर टीका केली परंतु त्यांचे वैचारिक आणि व्यावहारिक योगदानही मान्य केले. चीनच्या आक्रमणानंतर डॉ. कसबे हे चिकित्सक पद्धतीने मार्क्सवादाकडे आकर्षित झाले. कॉ. शरद पाटलांनी मार्क्सवाद – फुले – आंबेडकरवादाची मांडणी केली. डॉ. रावसाहेब कसबे यांनी १ ऑगस्ट १९८५ रोजी 'आंबेडकर आणि मार्क्स' हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथाची दुसरी आवृत्ती १२ नोव्हेंबर २००६ रोजी प्रकाशित झाली. त्यात प्रास्ताविकाची नव्याने भर टाकली आहे. याचा परिणाम आंबेडकरांचे विचार कार्ल मार्क्सच्या विचारांबरोबर जोडण्यासाठी, सांगण्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण झाली. मार्क्सवादापेक्षा बौद्धधर्माचे श्रेष्ठत्व डॉ. आंबेडकर सांगतात. पण ते सिद्ध होण्यासाठी मार्क्सवादाच्या उद्दिष्टांच्या कसोटयांवर त्याला कसे उतरावे लागेल हेही ते स्पष्ट करतात.

प्रकरण सहा नंतर संदर्भसूची दिलेली असून तीन परिशिष्टे जोडलेली आहेत. परिशिष्टांमध्ये डॉ. रावसाहेब कसबे यांचा परिचय, त्यांनी कालक्रमाने केलेले लिखान तसेच त्यांना व त्यांच्या लिखनाला मिळालेले पुरस्कार व छायाचित्रासह मुलाखत मुद्रित केलेली आहे.

# संदर्भसूची

# संदर्भसूची


- Dr. Babasaheb Ambedkar, **Buddha and His Dhamma**, P.E. Society, Bombay, 2nd edition, 1974.
- Dr. Babasaheb Ambedkar, **Writing and Speeches**, vol. 2, Govt. of Maharashtra, Bombay.
- Florence Elliott and Michael Summerskill, **A Dictionary of Politics**, Penguin Books, London, 1957.
- Keer Dhanjay, **Dr. Ambedkar Life and Mission**, Popular, Bombay, 3rd edition, 1971.
- Karl Marx & Engles **F., On Religion,** Progressive Publishers, Moscow, 1976.
- अफनास्येव वि., **मार्क्सवादी दर्शन,** दिल्ली, तिसरी आवृत्ती, १९७७.
- डॉ. आंबेडकर बाबासाहेब, अनु. डॉ. गांजरे, **बुद्ध की कार्ल मार्क्स?,** अशोक प्रकाशन, नागपूर १९९४.
- डॉ. आंबेडकर बाबासाहेब, **मुक्ती कोन पथे?,** सुमेध प्रकाशन, पुणे २००६.
- डॉ. आंबेडकर बाबासाहेब, **माझी आत्मकथा**, मिलिंद प्रकाशन, वर्धा, २००५.

- डॉ. आंबेडकर बाबासाहेब, आचार्य भगत सूर्यकांत (संपा.), **अस्पृश्य मूळचे कोण आणि ते अस्पृश्य कसे बनले?,** मिलिंद प्रकाशन, वर्धा, २००६.
- डॉ. आंबेडकर बाबासाहेब, **मुक्ती कोन पथे? अर्थात अस्पृश्यांच्या मुक्तीचा जाहीरनामा**, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर.
- डॉ. आंबेडकर बाबासाहेब, तळवटकर घन:श्याम, प्राचार्य म. भि. चिटणीस (अनु. ), **भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म**, सद्धम्मादित्य प्रकाशन, केळझर.
- डॉ. आंबेडकर बाबासाहेब, राम आणि कृष्ण (अनु.), **रिडल्स इन हिंदूइझम** (मराठी अनुवाद), अशोक प्रकाशन, नागपूर.
- **डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे रेल्वे कामगार परिषदेतील अध्यक्षीय भाषण,** सुमेध प्रकाशन, पुणे, २००५.
- डॉ. आंबेडकर बाबासाहेब, **व्हू वेअर दि शूद्राज.**
- एजाज अहमद, अनु. डॉ. रणसुभे सूर्यनारायण, **मार्क्सवादाचे आजच्या काळातील महत्त्व**, लोकवाङ्मय गृह, मुंबई, दुसरी आवृत्ती, जुलै १९९८.
- एमिल बर्न्स, सरला कारखानीस, **मार्क्सवाद म्हणजे काय,** लोकवाङ्मय गृह, मुंबई,नववी आवृत्ती २००८.
- डॉ. कसबे रावसाहेब, **डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे समाजवादविषयक चिंतन**, डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, १९८३.

- डॉ. कसबेकर विजय (संपा.), **राजकीय तत्वप्रणाली सिद्धांत आणि व्यवहार,** रावसाहेब शिंदे षटयब्दीपूर्ती गौरवग्रंथ समिती, १९८९.
- डॉ. कसबे रावसाहेब, डॉ. खरे विजय (संपा.), **आरक्षण: वास्तव आणि विपर्यास**, पुणे विद्यापीठ, पुणे, डिसें. २००८.
- डॉ. कसबे रावसाहेब, डॉ. खरे विजय (संपा.), **मा. कांशीराम यांचे जीवनकार्य**, पुणे विद्यापीठ, पुणे.
- कार्ल मार्क्स व फ्रेडरिक एंगल्स, **कम्युनिस्ट जाहीरनामा**, लोकवाङ्मय गृह, मुंबई, दुसरी आवृत्ती, जुलै १९९८.
- कुबेर वा. ना., **आधुनिक भारताचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर**, माहिती व नभोवाणी मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली, जुलै १९८५.
- कोसंबी धर्मानंद, **बुद्ध, धर्म आणि संघ**, रघुवंशी प्रकाशन, मुंबई.
- कोसंबी धर्मानंद, **हिंदी संस्कृती आणि अहिंसा**, मुंबई, १९३५.
- खरात शंकरराव (संपा.), **डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रे**, मे. १९९०.
- खैरमोडे चां.भ., खैरमोडे गायकवाड द्वारकाबाई (अनु.), **डॉ. भिमराव रामजी आंबेडकर अस्पृश्यांचा उध्दारक,** सुगावा प्रकाशन, पुणे.
- खैरमोडे चां. भ., **डॉ. भिमराव रामजी आंबेडकर यांचे चरित्र,** खंड ३, प्रताप प्रकाशन, मुंबई, १९६४.
- खैरमोडे चांगदेव, **डॉ. बाबासाहेब आंबेडकर**, चरित्र खंड ३.

- गडकरी जयंत, **मार्क्सने सांगितलेला मार्क्सवाद आणि जागतिकीकरण,** सुगावा प्रकाशन, पुणे, मार्च २००८.
- गणवीर रत्नाकर (संपा.), **बहिष्कृत भारतातील अग्रलेख**, रत्नमित्रा, भुसावळ.
- गांजरे मा. फ. (संपा.), **बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे**, खंड १, प्रज्ञा प्रकाशन, नागपूर.
- गोखले प्रदीप, **विषमतेचा मनू,** सुगावा प्रकाशन, पुणे, तिसरी आवृत्ती, २००५.
- चनाना देवराज, **प्राचीन भारतातील गुलामगिरी**, लोकवाङ्मय गृह, मुंबई.
- जोशी न. म. (भाषांतर), **Riddles In Hinduism,** राजेश प्रकाशन, पुणे.
- जोसेफ स्तालिन, अनु. देशपांडे शं. वा., **लेनिनवादाची मूलतत्त्वे**, जनशक्ती, मुंबई.
- डोळस अविनाश, **आंबेडकरी चळवळ—परिवर्तनाचे संदर्भ**, सुगावा प्रकाशन, पुणे.
- ढसाळ नामदेव, **आंबेडकरी चळवळ आणि सोशॅलिस्ट—कम्युनिस्ट**, आंबेडकर प्रबोधिनी, मुंबई, १९८१.
- अनु. तुळपुळे वसंत, **लेनिन मार्क्सचे सिद्धांत**, प्रकाशन, मुंबई, १९६३
- देव विजय, **राजकीय विश्लेषण कोश**, दास्ताने रामचंद्र आणि कं., पुणे, १९९७.
- अनु. देशपांडे शं. वा. व मोकाशी उमाकांत, **एंगेल्स (समाजसत्तावादः मनोराज्यमय आणि शास्त्रीय)**, प्रगती प्रकाशन, मॉस्को.
- पंडित नलीनि, **स्वातंत्र्योत्तर काळातील दलितांचा प्रश्न**, साधना प्रकाशन, पुणे.

- परदेशी प्रतिमा, **योद्धा जनसत्याग्रही दादासाहेब गायकवाड,** दिग्नाग प्रकाशन, पुणे, २००२.
- परदेशी प्रतिमा, **डॉ. आंबेडकर आणि स्त्रीमुक्ती**, दिग्नाग प्रकाशन, पुणे, डिसें. २००३.
- परांजपे सुहास, **दास कापिटाल सुबोध परिचय,** समाजविज्ञान ग्रंथालय, पुणे, १९८४.
- पळशीकर सुहास, **जात व महाराष्ट्रातील सत्ताकारण**, सुगावा प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती.
- कॉ. पाटील शरद, **मार्क्सवाद—फुले—आंबेडकरवाद**, सुगावा प्रकाशन.
- पाध्ये प्रभाकर, **मानव आणि मार्क्स**, श्रीविद्या प्रकाशन, पुणे.
- बगाडे उमेश, **महाराष्ट्रातील प्रबोधन आणि वर्गजातिप्रभुत्व**, सुगावा प्रकाशन, पुणे.
- बावडेकर चं. वि., **आधुनिक कम्युनिझम**, मॅजेस्टिक बुक स्टॉल, १९५७.
- बेडकिहाळ किशोर (संकलन), विचारवेध संमेलन अध्यक्षीय भाषण, खंड १, सुगावा प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती २००२.
- भदन्त आनंद कौसल्यायन, **बौद्ध धर्म और मार्क्सवाद**, बल्लारपूर, १९७३.
- मार्क्स—एंजल्स, **कम्युनिस्टांचा जाहीरनामा**, विदेशी भाषा प्रकाशन गृह, मॉस्को.

- रूपवते दा. ता., **रिपब्लिकन ऐक्य– कथा कुणाची, व्यथा कुणा**, साधना प्रकाशन, पुणे.
- ललन जयप्रकाश, म्हमाने अनिल (अनु.), **बाबुश्किन– क्रांतिकारक कामगार योद्धा जननायक**, निर्मिती विचारमंच, कोल्हापूर, २००८.
- व्होरा राजेंद्र, पळशीकर सुहास (संपा.), **राज्यशास्त्र कोश**, दास्ताने रामचंद्र आणि कं., पुणे.
- **सद्यस्थितीचा वेध– पुढील वाटचालीची दिशा,** लाल निशान प्रकाशन, यशवंतराव चव्हाण, मुंबई.
- स्तालिन जोसेफ, देशपांडे शं.वा. (अनु.), **लेनिनवादाची मूलतत्वे, मार्क्सवाद** कम्युनिस्ट पक्ष मुंबई.
- सावंत प्रसाद, **मार्क्सवादाची गोष्ट,** भाग १, पुरोगामी मंडळ, मुंबई, मे २००७.

## नियतकालिके

- डॉ. कसबे रावसाहेब, आंबेडकरांच्या धर्मांतराची फलश्रुती, **सत्यशोधक संघटक,** अंक ५९ वा, नोव्हेंबर २००६.
- डॉ. कसबे रावसाहेब, दलित चळवळीचे भवितव्य, **समाज प्रबोधन पत्रिका**, मे–जून १९७५.

- डॉ. कसबे रावसाहेब, आंबेडकरवाद आणि मराठी साहित्य, **अस्मितादर्श दिवाळी अंक**, १९७५.
- डॉ. कसबे रावसाहेब, डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतराचे स्वरूप, **समाजप्रबोधन पत्रिका,** मे—जून१९७६.
- साखळकर एकनाथ, डॉ. रावसाहेब कसबे यांच्या हिंदू—मुस्लिम प्रश्न आणि सावरकरांचा हिंदूराष्ट्रवाद, **महाराष्ट्र टाइम्स**, १० सप्टेंबर १९९५.

# परिशिष्टे

# परिशिष्ट १

## डॉ. रावसाहेब कसबे यांचा परिचय

**नाव**:— रावसाहेब राणोजी कसबे

**जन्मदिनांक**:— १२ नोव्हेंबर १९४४

**शैक्षणिक पात्रता**:— एम.ए., पीएच.डी.

**पदस्थान:—** • **प्रपाठक—** पोस्ट ग्रज्युएट ॲन्ड रिसर्च सेंटर डिपार्टमेंट ऑफ पॉलिटिक्स ॲन्ड पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन, संगमनेर कॉलेज, संगमनेर (१९७३—२००४)

• **अध्यक्ष**— अ. अखिल भारतीय दलित साहित्य संमेलन सोलापूर (१९८७)

ब. विचारवेध संमेलन, लातूर (१९९४)

क. धनंजयराव गाडगीळ प्रतिष्ठान (१९९५ पासून)

ड. बंधुत्व साहित्य संमेलन, पुणे (२००१)

• **उपप्राचार्य**— संगमनेर महाविद्यालय, संगमनेर (१९९० ते १९९४)

• **संचालक**— भारतीय जीवन बीमा निगम (२००१ ते २००३)

• **सदस्य—** अ. सिनेट (राज्यपाल प्रतिनिधी), पुणे विद्यापीठ, पुणे

ब. प्रौढ शिक्षण समिती, महाराष्ट्र राज्य (१९८१)

क. युथ वेलफेअर कमिटी, महाराष्ट्र राज्य (१९८१)

ड. अॅकॅडमिक स्टाफ सिलेक्शन कमिटी, यशवंतराव
चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
(१९९० ते १९९५)

इ. साहित्य संस्कृती मंडळ महाराष्ट्र राज्य
(१९९२ते १९९४), (२००० पासून)

ई. चेअर प्रोफेसर– भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर
अध्यासन केंद्र, पुणे विद्यापीठ, पुणे (२००७ पासून)

## पुरस्कार

- आदर्श शिक्षक पुरस्कार, जिल्हा परिषद, अहमदनगर (१९९१)
- जीवन गौरव पुरस्कार, युगांतर प्रतिष्ठान, नाशिक (१९९९)
- सत्यशोधक दिनकरराव जावळकर पुरस्कार, पुणे (२०००)
- नारायण मेघाजी लोखंडे पुरस्कार, पुणे (२०००)
- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर केंद्र पुरस्कार, दलित साहित्य अकॅडमी, न्यू दिल्ली (२०००)

## ग्रंथास मिळालेले पुरस्कार

**आंबेडकर आणि मार्क्स**, सुगावा प्रकाशन, पुणे (१९८५)

- प्रियदर्शनी अकॅडमी, मुंबई (१९८५)
- महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे (१९८६)

  महाराष्ट्र शासन, (१९८६)

**हिंदू मुस्लिम प्रश्न आणि सावरकरांचा हिंदू राष्ट्र,** सुगावा प्रकाशन, पुणे (१९९४)

- महाराष्ट्र फौंडेशन यू.एस.ए. आणि मुंबई (१९९५)
- एम.बी.चिटणीस पुरस्कार, मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद (१९९५)
- एस.एन.जोशी पुरस्कार, मराठवाडा साहित्य परिषद, पुणे (१९९५)

**मानव आणि धर्मचिंतन**, सुगावा प्रकाशन, पुणे (१९९६)

- आर.बी.जोशी पुरस्कार, आंबेडकर अकॅडमी, सातारा (१९९६)

**आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना,** सुगावा प्रकाशन, पुणे (१९७८)

**झोत**

- कन्नड, तेलगु आणि हिंदी भाषेत भाषांतर

**प्रकाशित झालेल्या पुस्तिका**

- दलित साहित्याची वाटचाल, गोरे ट्रस्ट मुंबई (१९८२)
- आंबेडकरवाद सिद्धांत आणि व्यवहार, सुगावा प्रकाशन (१९८९)
- कन्नड भाषेत भाषांतर व प्रकाशित (१९९०)
- डॉ. आंबेडकर आणि भारतीय लोकशाही, यशवंतराव चव्हाण मुक्त

विद्यापीठ, नाशिक, प्रस्तव प्रकाशन नाशिक, (१९९३)

- समाजवादी चळवळीसमोरील आव्हाने, पी. पी. एच. मुंबई (१९९७)

**संपादित ग्रंथ**

- शेती आणि सहकार, शेतकरी संघ, संगमनेर (१९८४)
- इक्वॅलिटी जिनीसिस, प्रॅक्टीस ॲन्ड फयुचर (मराठी), दादासाहेब रूपवते प्रतिष्ठान, मुंबई (२०००)

# परिशिष्ट २

डॉ. रावसाहेब कसबे यांनी कालक्रमाने केलेले लिखानः—

- **डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना**, सुगावा प्रकाशन, पुणे, १९७७.
- **झोत,** जनबोध प्रकाशन, पुणे, १९७८.
- **दलित चळवळीची वाटचाल**, केशव गोरे स्मारक ट्रस्ट, मुंबई, १९८३.
- **आंबेडकर आणि मार्क्स,** सुगावा प्रकाशन, पुणे, १९८५.
- **आंबेडकरवाद— तत्त्व आणि व्यवहार**, सुगावा प्रकाशन, पुणे, १९८९.
- **हिंदू—मुस्लिम प्रश्न आणि सावरकरांचा हिंदूराष्ट्रवाद,** सुगावा प्रकाशन, पुणे, १९९४.
- **मानव आणि धर्म चिंतन**, सुगावा प्रकाशन, पुणे, १९९६.
- **रिपब्लिकन पक्ष ऐक्य, वास्तव आणि भवितव्य,** सुगावा प्रकाशन, पुणे, १९९८.
- **शिक्षणाची आव्हाने**, सुगावा प्रकाशन, पुणे, २००२.
- **मराठी भाषेच्या उज्ज्वल भवितव्यासाठी,** सुगावा प्रकाशन, पुणे, २००३.
- **धर्मः मानवी संस्कृती व विकास,** सुगावा प्रकाशन, पुणे, २००५.
- अप्रकाशित—**कुंठित धर्मग्रंथ विरूद्ध प्रवाही मानवी जीवन**

  या बरोबरच अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पिरिऑडिकल्समधून आणि अनेक वर्तमानपत्रातून विविध विषयांवर अनेक लेख लिहिलेले आहेत.

- पीएच. डी. चा विषय

**The Role of Political Philosophy of Dr. Ambedkar in his religious conversion Movement**

## डॉ. रावसाहेब कसबे यांच्यावरील प्रकाशित झालेली पुस्तके

- कांबळे उत्तम, **“रावसाहेब कसबे यांचे क्रांतिकारी चिंतन”**, सुगावा प्रकाशन, पुणे, जून २००६.
- गायकवाड सुधाकर, **“डॉ. रावसाहेब कसबे एक मूल्यमापन”** सुमेध प्रकाशन, पुणे, डिसेंबर २००७.

## डॉ. रावसाहेब कसबे यांच्या लिखानास विविध संस्थांतर्फे मिळालेले ग्रंथ पुरस्कारः—

- महाराष्ट्र साहित्य परिषद— ग्रंथ पुरस्कार
- महाराष्ट्र शासन— ग्रंथ पुरस्कार
- महाराष्ट्र फौंडेशन पुरस्कार
- मराठवाडा साहित्य परिषद— ग्रंथ पुरस्कार
- आंबेडकर अकादमी— ग्रंथ पुरस्कार

## डॉ. रावसाहेब कसबे यांना मिळालेले पुरस्कार

- युगांतर प्रतिष्ठानचा जीवनगौरव पुरस्कार — नाशिक
- नारायण मेघाजी लोखंडे पुरस्कार —पुणे
- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार — नवी दिल्ली

### डॉ. रावसाहेब कसबे यांनी विविध ठिकाणी भूषविलेले अध्यक्षपद

- १९८७ अखील भारतीय दलित साहित्य संमेलनाचे अध्यक्ष
- १९९४ विचारवेध संमेलनाचे अध्यक्ष
- २००१ बंधुता साहित्य संमेलन, पुणे येथे पार पडलेल्या संमेलनाचे अध्यक्ष
- २००७ सत्यशोधक साहित्य संमेलनाचे अध्यक्ष



डॉ. रावसाहेब कसबे यांची मुलाखत घेताना प्रा. संजय गायकवाड

# परिशिष्ट ३

## डॉ. रावसाहेब कसबे यांची मुलाखत



**डॉ. रावसाहेब कसबे**

**डॉ. कसबे:** सुधाकर गायकवाड यांची नुकतीच प्रसिद्ध झालेली पुस्तिका मिळाली का?

—— होय, त्यांची पुस्तिका वाचली. खूप चांगली आहे. थोडक्यात पण चांगली पुस्तिका आहे.

**डॉ.कसबे:** तुझा विषय चांगला आहे मला आवडला. तुझ्या गाईडची काय प्रतिक्रिया आहे?

—— माझ्या संशोधनामध्ये मला काही समस्या आहेत. मी आपले सर्व साहित्य वाचले. परंतु तरीही काही गोष्टी मी आपल्याबाबत समजण्यासाठी कमी पडतो आहे असे सारखे वाटते. आजच्या आपल्या चर्चेतून मी आपल्या वैचारिक भूमिकेविषयी गोंधळतो, त्याविषयी मला आपल्याला जाणून घ्यावयाचे आहे.

उत्तम कांबळेंना जी आपण मुलाखत दिली त्यात शेवटच्या प्रश्नाचे उत्तर आपण दिले होते की कोणताही माणूस पूर्णपणे मार्क्सवादी, पूर्णपणे आंबेडकरवादी अथवा पूर्णपणे समाजवादी नसतो तर आज चळवळींमध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्यापुढे असा प्रश्न पडलेला आहे की, आपण मांडणी केली ती नेमकी मार्क्सवादी दृष्टीकोनातून केली की आंबेडकरवादाच्या दृष्टीकोनातून केली. आपण नेमकी कोणत्या दृष्टीकोनातून मांडणी केली?

**डॉ.कसबे:** तुला माहित आहे का, समजा मी एक माणूस आहे आणि तू एक माणूस आहे. उत्तम कांबळे एक माणूस आहे तर तू आंबेडकर वाचला तर तुझी आंबेडकरांकडे बघण्याची दृष्टी वेगळी, माझी वेगळी, त्यांची वेगळी. मार्क्सवादाकडे बघण्याची दृष्टी तुझीपण वेगळी, माझी पण वेगळी आणि त्यांचीपण वेगळी. त्यामुळे कुठल्याही वादाकडे माणूस जो बघतो तो स्वत:च्या दृष्टीने बघत असतो. त्यामध्ये तो जो वाद, मी अमूकवादी आहे असे म्हणतो तेव्हा तो स्वत:चाच वादी असतो कारण स्वत:च्या दृष्टीने त्याने त्याच्याकडे बघितलेले असते. किंवा त्या वादातून स्वत:ला जर वजा केले तर काहीच शिल्लक राहत नाही. त्यामुळे असा कुठलाही माणूस १०० टक्के मार्क्सवादी असू शकत नाही अगर आंबेडकरवादी असू शकत नाही. त्याला आंबेडकरवाद

जसा समजला त्याच्या क्षमतेप्रमाणे, त्याच्या विचाराप्रमाणे तो राहतो. एखाद्याला जास्त समजून घेण्याची कुवत असेल त्याला वेगळा आंबेडकरवाद समजेल. त्यामुळे याचा आंबेडकरवाद, त्याचा आंबेडकरवाद हे काही कामाचे नाही जगातला कुठलाही माणूस कुठल्याही विशिष्ट वादाशी शंभर टक्के सहमत नसतो. त्याला आकलन कसे होते यावर हे अअवलंबून असते. तेव्हा तुम्ही मला काही कुठल्या वादामध्ये बसवू नका. मी, मी आहे. मला माझेच राहू दया. तुम्ही कशाला आंबेडकवाद किंवा मार्क्सवादी म्हणता. या सर्व वादांकडे मी माझ्या दृष्टीने बघितले आहे आणि म्हणून मला माझी स्वत:ची दृष्टी आहे या वादाकडे बघण्याची. एखाद्या महापुरुषाला जाणीवपूर्वक बदनाम करणे बरोबर नाही. आज जे आंबेडकरांचे नाव घेतात मग ते खरंच आंबेडकरवादी आहेत काय? त्यांचे तत्त्व आणि व्यवहार पूर्णपणे वेगळे असतात ते त्यांच्या पद्धतीने समजून घेतात. म्हणून त्याला ज्याच्या त्याच्या पद्धतीने समजू दयाव्यात हया सगळया गोष्टी असा त्याचा अर्थ आहे.

—— १९६० ते ७० च्या दशकात जी मांडणी झाली त्यात दलित चळवळ आणि मार्क्सवादी चळवळ हया स्वतंत्रपणे चालत होत्या आणि त्यामध्ये त्या स्वतंत्रपणे का चालत होत्या? त्याची काही कारणे आहेत का?

**डॉ.कसबे:** भारतामध्ये जाती आहेत. आंबेडकरी चळवळ ही जाती निर्मूलनाला प्राधान्य देणारी चळवळ आहे. त्या काळात आणि मार्क्सवादी चळवळ ही गरिबीच्या निर्मूलनासाठी होती. समाजवाद स्थापणारी चळवळ होती. तुलनेने आंबेडकरी चळवळ ही जाती नष्ट करण्यासाठीची होती. जाती निर्मूलनाला प्राधान्य देणारी ही चळवळ आहे. म्हणून जातीला प्राधान्य देणारी चळवळ एका बाजूला आणि गरिबीला प्राधान्य देणारी चळवळ एका बाजूला अशा दोन चळवळी आहेत.

त्यात स्वतंत्रपणे विचार मांडले गेले. मार्क्सवादी चिंतनामध्ये जातीचा विचार नव्हता त्यांना असे वाटते की, आर्थिक समता आली की जाती संपतील. परंतु बाबासाहेबांचे म्हणणे असे होते की आर्थिक समता आली तरी जाती नष्ट होत नाहीत. जातीव्यवस्था नष्ट होण्यासाठी काही खास प्रयत्न करायचे आणि खास प्रयत्न कोणते करायचे तर बाबासाहेबांनी त्याचा एक कार्यक्रम दिला होता. एक तर अंतरजातीय विवाह करा. दुसरी गोष्ट जो धर्म जाती संस्था शिकवितो त्याच्यापासून दूर रहा. आणि तिसरी गोष्ट या देशाची जी पूनर्वाटपाची स्थिती आहे जमिनी मालकांकडून काढून घ्या व जे कसतात त्यांच्यात तिचे वाटप करा.

—— परंतु सुरूवातीला मार्क्सवादी चळवळीने जातीचा प्रश्न घेतलाच नाही याबद्दल थोडेसे सांगा.

**डॉ.कसबे:** त्यांच्याकडे असे होते की समाजवादी समाजरचना आली की जाती संस्था आपोआप नष्ट होणार आणि म्हणून ते त्या पद्धतीने काम करत असत. जाती नष्ट न करता तुम्ही समाजवाद कसा आणू शकता असा त्यावेळी प्रश्न विचारला जात होता आणि समाजवाद आणण्यासाठी तुम्हाला सगळ्या जातीतले दलित एकत्र यावे लागतात आणि भारतामध्ये तर दलितच एकमेकांशी भांडतात. तुम्ही क्रांती करू शकणार नाही. भारतात जातींमध्येच वर्ग निर्माण झाले आहेत. ही अवस्था नष्ट होण्यासाठी वरीष्ठ वर्ग काय प्रयत्न करीत होता?

—— दलित चळवळीचे वर्गीय शोषणाकडे दुर्लक्ष का झाले आहे?

**डॉ.कसबे:** ते तर आहे ना. तुम्ही जातीच्या मागे लागलात तर वर्ग प्रबळ होतात. दरिद्री/गरिबी हटवायचा कार्यक्रम घेतला तो यासाठीच. माझे म्हणणे असे होते

जाती अंताची चळवळ करणारी दलित चळवळ आणि दारिद्र्याचा अंत करणारी मार्क्सवादी चळवळ या एकमेकांच्या जवळ आल्या पाहिजेत व जातीचा आणि वर्गाचा लढा पुढे नेला पाहिजे. तो एकत्रित प्रयत्न व्हायला पाहिजे.

—— सुरूवातीला डॉ. बाबसाहेब आंबेडकरांनी मार्क्सवादाला विरोध का केला होता?

**डॉ.कसबे:** असे काही नाही. बाबासाहेब सांगायचे की मार्क्सवाद जातीचा विचर करत नाही. एकढेच, ते काही डायरेक्ट हल्ला मार्क्सवादावर करत नाहीत. त्यांचे बुद्ध आणि मार्क्स नावाचा जो पेपर आहे त्यामध्ये त्यांनी बुद्ध आणि मार्क्सची तुलनाच केली होती आणि त्यांच्यात साम्य काय काय आहे हेही दाखविले आहे आणि त्यांच्या विरोध कुठे कुठे आहे हेही दाखविले आहे. मूळ मार्क्सवादाला बाबासाहेबांचा फारसा काही विरोध नव्हता. या सर्व गोष्टींचा समाजशास्त्रीय विचार करायला हवा.

—— दलित पॅंथर्सच्या चळवळीविषयी आपले काय मत आहे?

**डॉ.कसबे:** दलित पॅंथर्सची जी चळवळ आहे ना त्यावेळी रिपब्लिकन पक्षाचे नेतृत्व जे प्रस्थापित झालेले होते. हे प्रस्थापित नेतृत्व सामाजिक अन्यायाविषयी काही बोलत नव्हते कारण ते प्रस्थापित व्यवस्थेचा एक भाग बनून गेले होते. कॉंग्रेसची युती झाली होती. त्यावेळी प्रस्थापित नेतृत्वाविरूद्ध हा विद्रोह होता. तरुण मुलांचा म्हणजे दलित नेते प्रस्थापित झाले होते. अन्याय, अत्याचार वाढत होते. याला तोंड देण्यासाठी तरुण नेतृत्व दलित पॅंथर्सच्या निमित्ताने पुढे आले होते.

——— दलित पॅंथर्स ही डाव्या विचारसरणीकडे का झुकलेली होती?

**डॉ.कसबे**: होय, ती डाव्या विचारसरणीकडे झुकणे साहजिकच होते याचे कारण असे की, दलितांचे प्रश्न हे फक्त डावेच सोडवू शकत होते म्हणून ती डाव्या बाजूला झुकणे अपेक्षितच होते. त्या चळवळीला त्या काळात आंबेडकरवादीही होते आणि मार्क्सवादी पण होते पण तिला Ideological ground लागते ते या चळवळीला न मिळाल्यामुळे आणि प्रस्थापितांचा हस्तक्षेप या दोन्ही गोष्टी पॅथर्सच्या बाबतीत झाल्या तरीही दलित पॅथर्स ही क्रांतीकारी चळवळ होती.

—— आदरणीय शरद पाटील यांनी जी तुलना केली, त्यांच्या विचारांत आणि आपल्या विचारांत मूलभूत फरक काय आहे?

**डॉ.कसबे**: मार्क्स आणि आंबेडकर समन्वयाबाबतचा माझा विचार मी १९७० सालापासून मांडत आहे. माझ्यापेक्षा वयाने लहान असले तरी रावसाहेब माझे गुरू आहेत असे शरद पाटील म्हणतात. महाडपासून या विचाराला चालना मिळाली. 'झोत'नंतर शरद पाटील यांना वाटले की या विचारात निश्चित वेगळेपण आहे नंतर त्यांनी त्याबाबतच्या Philosophy ची मांडणी केली.

——— शरद पाटील आणि तुम्ही केलेली मांडणी यात कोणता फरक आहे?

**डॉ.कसबे**: काही नाही. त्यांनी Philosophical मांडणी केली, त्याचा विस्तार केला. त्यांना ते सूत्र समजले व माडणी केली. त्यांना त्या विचारांचे आकलन झाले व त्याचेच त्यांनी विस्तारीकरण केले. ते विचार त्यांचे आहेत त्यामुळे त्यांना मार्क्सवादी म्हणायचे की आंबेडकरवादी हे एवढे महत्त्वाचे नाही.

——— महाडला तुम्ही जो मार्क्स—आंबेडकर समन्वयाचा विचार मांडला त्यावेळी जर विरोधामुळे मांडता आला नसता तर तुम्ही तो मांडण्याचे नियोजन केले असते का?

**डॉ.कसबे:** विरोध गृहित धरूनच मांडणी केली. मी कधी कोणाच्या विरोधला जुमानले नाही. आंबेडकरवादाच्या, मार्क्सवाद्याच्या तसेच आर.आर.एस.वाल्याच्या विरोधालाही कधी जुमानले नाही. जे मला वास्तव जाणवले ते मी मांडत राहिलो.

—— जागतिकीकरणामध्ये हा जो समन्वयाचा विचार मांडला जातो तो किती मर्यादेपर्यंत टिकून राहिल व जागतिकीकरणातील दलित चळवळीचे समन्वयाचे धोरण स्वीकारल्याने परिणाम काय जाणवतील?

**डॉ.कसबे:** जागतिकीकरणामुळे सगव्या जुन्या चळवळी मोडकळीस येतात. त्यामुळे चळवळींमध्ये राजकारण आले आहे. त्यात कोणतीही चळवळ, दलित चळवळ सुद्धा अपवाद नाही. राजकारणीसुद्धा चळवळी करतात.

——— चळवळीतील गटाच्या राजकारणामुळे उद्देश साध्य होईल का?

**डॉ.कसबे:** राजकारण सगळीकडेच आहे. गट तर सगळीकडे आहेत. मोठया लोकांचे दिसून येत नाही एवढाच फरक आहे. मार्क्सवाद्यांच्या चळवळीने जातीचा प्रश्न घेतला नाही तसे आहेच की. मार्क्सवादी चळवळ आज आर्थिक प्रश्नाची चर्चा करायला लागली आणि आजची आंबेडकरवादी चळवळ सुद्धा आर्थिक प्रश्नांची चर्चा करत आहे. जात आणि वर्ग यामुळे निर्माण होणारे प्रश्न दोन्ही चळवळीने एकत्र येऊन सोडविले पाहिजेत

——— तुमचा प्रवास दलित कुटुंबापासून ते जेष्ठ विचारवंत असण्यापर्यंतचा. यात कधी आंबेडकरवाद तर कधी मार्क्सवादाकडे प्रवास झाला ते कसे?

**डॉ.कसबे:** असे नसते. कोणी कोणाकडे जात नाही. कोणी कोणाकडे येत नाही. माणूस हा स्वतः स्वतःला घडवित असतो. आंबेडकरवाद किवा मार्क्सवाद समजून स्वतःची जडणघडण होते. यातूनच माणूस घडत असतो.

——— मार्क्सवादामध्ये स्त्रियांच्या प्रश्नांची चर्चा कुठे दिसत नाही याचे कारण काय?

**डॉ.कसबे**: जाती आणि वर्गाचेच प्रश्न इतके गहन आहेत की बाकी प्रश्न मागे पडले.

——— आपले सध्या आणखी नवीन काही लेखन चालू आहे का? असेल तर कोणते?

**डॉ.कसबे:** होय."कुंठित धर्मग्रंथ विरूद्ध प्रवाही मानवी जीवन" असे त्या ग्रंथाचे नाव आहे.

——— आपल्या पुढील साहित्यिक कारकिर्दीसाठी हार्दिक शुभेच्छा.